◆ ऑगस्ट २००६
◆ वर्ष सहावे
◆ अंक आठवा

# मेहता मराठी ग्रंथजगत

संपादक : सुनील मेहता

कार्यकारी संपादक : शंकर सारडा

संपादन साहाय्य : अनिरुद्ध पाटील

अंकाची किंमत १५ रु.

वार्षिक वर्गणी मनीऑर्डरने पाठवावी.

प्रसिद्धी दरमहा १५ तारखेस

— अनुक्रमणिका —

| | |
|---|---|
| **संपादकीय** - | ४ |
| **साहित्यवार्ता** | |
| **दखल** | ८ |
| **पुस्तक परिचय** | |
| **दोन ध्रुव** : भाऊसाहेब खांडेकर | ३२ |
| **प्रतिद्वंद्वी** : आशा बगे | ४२ |
| **वेरूळलेण्यातील शिल्प वैभव** : राधिका टिपरे | ५२ |
| **माझे माझ्यापाशी काही नाही : ओशो** : अनु. भारती पांडे | ५८ |
| **चला जाणून घेऊ या! चालणे** : अनु. मोतिया बसर्गेकर | ६३ |
| **दीपयोजना** | ६८ |
| **साधंसुधं** : प्रमोदिनी वडके-कवळे | ७४ |
| **पुरस्कार** | ८४ |
| **वाचकांचा प्रतिसाद** | ८७ |
| **श्रद्धांजली** | ९० |
| **बालनगरी** | ९४ |

मांडणी-अक्षरजुळणी : *मेहता पब्लिशिंग हाऊस*

संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड, टेलिफोनभवनसमोर, पुणे-३०.
फोन : २४४७६९२४ फॅक्स :०२०-४४७५४६२
Email - mehpubl@vsnl.com
Website - mehtapublishinghouse.com

**वार्षिक वर्गणी १०० रु. तीन वर्षांची २००रु. पाच वर्षांची ३००रु.**
**३ व ५ वर्षासाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट !**
**वर्गणी मनीऑर्डरने किंवा ड्राफ्टने पाठवावी. ड्राफ्ट 'मेहता मराठी ग्रंथजगत'या नावे असावा.**

*या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.*

# संपादकीय

## चर्चासत्रातले आत्मचिंतन

नवी दिल्ली येथे मध्यंतरी हिंदुस्थान टाइम्सतर्फे तीन दिवसांचा 'किताब फेस्ट' आयोजित करण्यात आला होता. त्याला भारतीय लेखकांप्रमाणेच परदेशी लेखकही उपस्थित होते. 'टोकयो कॅन्सल्ड'चे लेखक राणा दासगुप्ता, अमित चौधरी, शशी थरूर या भारतीय लेखकांबरोबर 'मॅप्स फॉर लॉस्ट लव्हर्स'ची लेखिका नदीम अस्लम, लंडनमध्ये वास्तव्य करणारी कराचीमध्ये जन्मलेली विल्यम डलरीम्पल, अफगाणिस्तान स्थित रोरी स्टुअर्ट या सध्या विदेशात राहणाऱ्या आशियाई लेखकांचाही समावेश होता. या तीन दिवसाच्या किताब फेस्टमध्ये या सर्व लेखकांनी वेगवेगळे विचार मांडले. नव्या लेखकांपुढची आंतरराष्ट्रीय आव्हाने कशा प्रकारची आहेत, याची थोडीशी चुणूक त्यामुळे दिसते. स्त्रियांचे लेखन, लघुनियतकालिके, दक्षिण आशियाई डिआस्पोरा आणि जागतिकीकरण, सद्य:कालीन राजकारणातील स्खलनशीलता आणि सत्य असे अनेक विषय चर्चेसाठी घेण्यात आले. ब्रिटिश पार्लमेंटच्या सदस्य क्लेअर शॉर्ट यांनी म्हटले, ''जग हे अधिक मवाळ व्हायला हवे. त्यासाठी आपल्याला कल्पनांचे आणि पुस्तकांचे नवे स्फुरण आवश्यक आहे. जे लोक पुस्तके वाचतात त्यांनी विचार करायला हवा. युक्तिवाद करायला हवा. नव्या कल्पना मांडल्या गेल्या पाहिजेत. त्यावर कडाडून चर्चा व्हायला हव्या.

राणा दासगुप्ता यांनी लेखकाच्या भूमिकेबद्दल बोलताना म्हटले, ''काल्पनिक फँटसी जगाबद्दल चिंतन-मनन हे आजच्या लेखकाचे उदरनिर्वाहाचे साधन आहे. आज वेगवेगळ्या प्रकारच्या फँटसीजची निर्मिती होत आहे आणि या फँटसी म्हणजे आजच्या जगातील समस्यांवरील उतारा म्हणून किंवा भाष्य म्हणून काम करून, वर्तमानकाळाचे शक्य तसे शुद्धीकरण करण्याचा प्रयत्न करतात. अशा वेळी समाजाला व जगाला आपण कशाप्रकारे आपले योगदान देऊ शकतो, या विषयी प्रतिभाशाली कलावंत आणि विचारवंत यांच्यात चिंतन-मनन व संवाद होण्याची गरज आहे. त्यासाठी अशा प्रकारची वाङ्मयीन चर्चासत्रे होणे महत्त्वाचे आहे. प्रेरणादायक आहे.''

रोरी स्टुअर्ट यांच्या मते अशा कार्यक्रमांमुळे आजच्या लेखकांना आपल्या वाचकांना भेटण्याची आणि ऐकण्याची संधी मिळते; विचारांची देवाणघेवाण



होते. आपापली मते तपासून घेता येतात.

राहुल बोस यांनी अशा अनेक व्यासपीठांची गरज आहे असे प्रतिपादन करीत म्हटले, भारतात आज अनेक देश वसत आहेत असे वाटते. प्रत्येक समाज स्वत:चे वेगळेपण हिरीरीने मांडण्यास पुढे सरसावला आहे. दैवदुर्विलासाची गोष्ट म्हणजे याचवेळी भारतीय व्यापार उद्योगाची आणि माहिती तंत्रज्ञानाची जागतिकीकरणाच्या दिशेने घोडदौड चालू आहे. परंतु नवनिर्मितीच्या क्षेत्रात मात्र आपण अजून मागे पडत आहोत.


'वासफिरी' नावाचे चौमासिक गेली २२ वर्षे 'राउटलेज' या प्रकाशन संस्थेतर्फे 'सुशीला नास्ता' या प्रकाशित करीत आहेत. कराची हे त्यांचे जन्मस्थान; पण सध्या वास्तव्य इंग्लंडमध्ये आहे. आर्टस् कौन्सिलच्या सहाय्याने त्यांनी १९८४ साली हे नियतकालिक सुरू केले. प्रवासी; पर्यटक या अर्थाच्या सफारी शब्दावरून त्यांनी या नियतकालिकाला वासफिरी हे नाव दिले. सांस्कृतिक देशांतर, वाङ्मयीन व कलात्मक मुशाफिरी करणाऱ्या लेखक-कवी कलावंतांचे एक व्यासपीठ म्हणून हे नियतकालिक काम करते. नव्या-जुन्या लेखकांचे साहित्य प्रकाशात आणते. मायभूमीपासून दूर देशातील वास्तव्यात कलावंत म्हणून होणारी घुसमट, सांस्कृतिक सामाजिक दुरावा कलाकृतीत मांडण्याची निकड भासते, त्याचप्रमाणे आज धूसर होत चाललेल्या आधुनिक देशांच्या संकुचित सीमारेषांच्या पलीकडे जाऊन भाषेच्या सामर्थ्याचा वापर वेगवेगळ्या संस्कृतींच्या अभिसरणाच्या प्रक्रियेला चालना देण्यासाठी कल्पनाशक्तीला जोरदार उड्डाणे करण्यास प्रेरित केले पाहिजे. 'वासफिरी' हे नियतकालिक म्हणजे जागतिक वाङ्मयीन कॅफे नसून त्याचे स्वरूप जगाचे नव्या मार्गाद्वारे आकलन-वाचन करण्याचे, व्यामिश्र इतिहासाच्या अभिव्यक्तीचे आणि उत्क्रांतीचे आलेखन करण्यासाठी एक भौतिक अवकाश असे आहे. आपल्या मायभूमीपासून दूर आलेल्या स्थलांतरित लेखककवींच्या प्रतिभेला अवसर देऊन, त्यांना इंग्लिश साहित्याच्या मुख्य प्रवाहात आणून सोडण्याचे काम वासफिरी या नियतकालिकाने चालवले आहे. अनिता देसाई, विक्रम सेठ, नयनतारा सहगल, आमेर हुसेन, तबिश खैर, मॅगी गी, रोमेश गुणशेकर, मायकेल ओंडात्जे, अर्ल लव्हलेस (त्रिनिदाद) वगैरे लेखकांचे आरंभीचे साहित्य या नियतकालिकानेच उचलून धरले. न्यूझीलंडची कवी व इतिहासकार 'डायना ब्रिज' हिचे वसाहतवादी श्वेतवर्णीय ख्रिश्चनांच्या न्यूझीलंडमधील प्रभाव-वर्चस्वाचे अंतर्मुख होऊन विश्लेषण करणारे लेखनही या नियतकालिकात आलेले आहे. श्वेतवर्णीयांचे जग आणि कृष्णवर्णीयांचे संघर्ष याचीही अनेकविध अंत:सूत्रे या लेखनातून वेगवेगळ्या तऱ्हेने आविष्कृत होत असतात.

शी ॲड्स गॉड टू एव्हरीस्टोन
ॲन आयडिया न्यू टू मी

हू मेक्स म्युझियम्स ऑफ हर टेम्पल्स
अँड टेक्स गॉड आऊट ऑफ स्टॅच्यूज
टू बेटर वरशिप स्टोन.

ही हंपीवरील डायना ब्रिजने लिहिलेली कविता तिच्या भारतभेटीतील नवजाणिवांची निदर्शक आहे.

अर्ल लव्हलेसनेही या नियतकालिकात आपली भूमिका मांडताना म्हटले होते, ''या जगात आपला जन्म होतो हे खरे नाही. जगातल्या एखाद्या स्थळी, एखाद्या घरात आपला जन्म होतो आणि एक संस्कृती, एक धर्म, एक सामाजिक परिसर, एक कालबद्ध जीवनशैली हे सर्व आपल्याला चिकटते. त्याच विशिष्ट दृष्टिकोनातून जगाला आपण आपले योगदान करू शकतो.'' आपले मूळचे संदर्भ अखेरपर्यंत सोबत करीत राहतात, हे खरेच आहे. आपले रूटस् शोधत राहणे हेच आपल्या जगण्याचे उद्दिष्ट त्यामुळे ठरते.







औषधाविना आरोग्याचे गणित हसत-खेळत जाणून घेण्यासाठी व्यक्तिगत संग्रही असलेच पाहिजे असे मार्गदर्शक पुस्तक

**औषधाविना आरोग्य**

**डॉ. रमा मराठे । डॉ. रवि मराठे**

**२००रुपये पोस्टेज २५ रु.**

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**




# वाचकांना आवाहन

वाचकमित्रहो,

आपल्याच अखंड प्रेमामुळे 'मेहता मराठी ग्रंथजगत' हे वाङ्मयीन मासिक चांगलेच लोकप्रिय होत आहे. या मासिकाची सभासद संख्या दिवसेंदिवस वाढतच असून, सदर मासिक इंटरनेटवरही उपलब्ध असल्याने जगभरातील मराठी वाचकांनीही याची उत्स्फूर्त नोंद घेतली आहे. आपल्या या भक्कम पाठिंब्यामुळे मराठी ग्रंथप्रसार चळवळीस नक्कीच हातभार लागेल असा विश्वास वाटतो.

आपणास माहिती आहेच, 'मेहता मराठी ग्रंथजगत'चा दिवाळी अंकही वैविध्यपूर्ण सदरांनी युक्त असतो. साहित्याच्या अनुषंगाने येणाऱ्या विषयांसोबतच इतर क्षेत्रातील अनेक माहितीपूर्ण तसेच मार्गदर्शक लेख या विशेषांकामधून मांडले जातात. 'वाचकमित्रांचा प्रत्यक्ष सहभाग' हे या विशेषांकाचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य होय. यानुसारच आगामी दिवाळी अंकासाठी आम्ही वाचकांसाठी एक खास लेखनस्पर्धा आयोजित केली आहे. 'आम्ही रसिक वाचक' असा सार्थ अभिमान बाळगणाऱ्या वाचकांसाठी ही खास स्पर्धा आहे.

'माझा वाचनप्रवास' या विषयावर आपण आपले अनुभव १५०० शब्दांत कळवायचे आहेत.

- **अनेक वर्षे मनात रेंगाळलेले पुस्तक कोणते?**
- **एखाद्या वाचक चळवळीत सहभाग घेता का?**
- **कोणत्या पुस्तकांनी/लेखकांनी झपाटून टाकले?**
- **साहित्यातील वेगवेगळ्या प्रवाहांचा आस्वाद घेतला का? की फक्त आवडणारी पुस्तकेच वाचली?**
- **वाचक म्हणून आपली काही खास भूमिका राहिली आहे का?**

अशा विविध मुद्द्यांवर आधारित लेख **२० ऑगस्टपर्यंत** 'मेहता मराठी ग्रंथजगत'च्या पत्त्यावर पाठवावेत ही विनंती, सर्वोत्तम पाच लेखांना अंकात प्रसिद्ध केले जाईल, याची नोंद घ्यावी.

**संपादक**
**मेहता मराठी ग्रंथजगत**

# साहित्यवार्ता

### * कालिदासावर कादंबरी

''कालिदास हा शृंगाराचा भोक्ता जरूर होता; पण त्याला अभिप्रेत असलेली प्रेमकल्पना उदात्त होती, कालिदासाला निव्वळ शृंगारप्रधान कवी म्हणणे त्याच्यावर अन्याय केल्यासारखे होईल,'' असे निरीक्षण ज्येष्ठ साहित्यिक प्राचार्य राम शेवाळकर यांनी नोंदविले.

महाकवी कालिदासाच्या जीवनावर मंगला मिरासदार यांनी लिहिलेल्या 'मी... कालिदास' या कादंबरीचे प्रकाशन कालिदासदिनाचे औचित्य साधून ज्येष्ठ संगणकतज्ज्ञ डॉ. विजय भटकर यांच्या हस्ते झाले, त्यानंतर प्राचार्य शेवाळकर अध्यक्षस्थानावरून बोलत होते. व्यासपीठावर ज्येष्ठ कथाकार प्रा. द. मा. मिरासदार, डॉ. सुनीता आफळे, स्नेहल प्रकाशनचे आदित्य घाटपांडे होते. प्राचार्य शेवाळकर म्हणाले, ''प्रस्तुत कादंबरी कालिदासाचे चरित्र नाही; कारण त्याच्याविषयी फार थोडी माहिती उपलब्ध आहे. त्यामुळेच कादंबरीचा मार्ग चोखाळण्याशिवाय मिरासदार यांच्यापुढे अन्य पर्याय नव्हता. काळ आणि इतिहास मौन असतात; त्यामुळे ऐतिहासिक कादंबरी लिहिणे अवघड असते. कालिदासाबद्दलच्या काही आख्यायिका तर हास्यास्पद आहेत. कालिदास ओळखायचा; तो त्याच्या साहित्यावरून, या दंकथांवरून नाही. मिरासदार यांनी भासावरही अशीच कादंबरी लिहावी.''

डॉ. भटकर म्हणाले, ''संगणक काव्य किंवा विनोद करू शकेल का, हे सध्याच्या संगणकतज्ज्ञांसमोरील आव्हान आहे. त्यादृष्टीने 'मॉडेल' विकसित करण्याचे काम सुरू आहे. संस्कृत ही संगणकाची भाषा बनली; तर नवी पिढी संस्कृत शिकेल. एकविसाव्या शतकात संस्कृतचे अशाप्रकारे पुनरुज्जीवन होणार, यात शंका नाही. अर्थात, संगणक हा मानवी बुद्धिमत्तेची बरोबरी कधीच करू शकणार नाही, हे स्पष्ट झाले आहे.'' मिरासदार, आफळे यांनीही मनोगत व्यक्त केले.

### * 'आहार, विहार, आचार ही जीवनाची चतु:सूत्री'

सकस आहार, नियमित व्यायाम आणि अंतर्बाह्य स्वच्छता यांमुळे प्रकृती चांगली ठेवता येते, त्यासाठी कोणताही खर्च येत नसल्याचे ज्येष्ठ वैद्यक डॉ. ह. वि. सरदेसाई यांनी सांगितले. हैदराबाद मुक्ती संग्रामातील सेनानी स्व. पानकुंवर फिरोदिया यांच्या १९ व्या स्मृतिदिनानिमित्त 'मानवी जीवनाची लांबी,



रुंदी व खोली' या विषयावर डॉ. सरदेसाई यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

डॉ. सरदेसाई म्हणाले, ''माणसाच्या आहार, विहार, आचार आणि विचारावर त्याची प्रकृती अवलंबून असते. त्यात दोष निर्माण झाल्यास त्याचा परिणाम त्याच्या शरीरावर होतो. आजचे आजार हे त्याच्या बिघडलेल्या जीवनशैलीचे परिणाम आहे. सकस चौरस आहार, विहारातून माणसाला आयुष्याची लांबी, रुंदी मिळू शकते. आयुष्याला खोली विचारातून प्राप्त होते. ध्यान ही मनाच्या जाणिवेची स्थिती आहे. त्यामुळे माणसाच्या जीवनाला लांबी, रुंदी आणि खोली प्राप्त होते.

डॉ. सरदेसाई यांनी श्रोत्यांना आपला आहार कसा असावा याचे महत्त्व रोचक उदाहरणे देऊन पटवून दिले. ते म्हणाले, की शाकाहारी व्यक्तींच्या आहारात दूध हे अतिशय आवश्यक आहे. दूधात व्हिटॅमिन बी-१२ हे जीवनसत्त्व असते. ते फक्त प्राणिजन्य पदार्थांत असल्यामुळे शाकाहारी लोकांनी दूध अवश्य घ्यावे. ज्यांना दूध पचत नाही, त्यांनी दूधाचे दही करून त्याचे सेवन करावे.

डॉ. जयश्री फिरोदिया यांनी डॉ. सरदेसाई यांचा परिचय करून दिला. कांतिलाल चुत्तर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

### * भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्था– वय वर्षे ९०

प्राच्यविद्येचे जनक रामकृष्ण गोपाळ भांडारकर यांच्या नावे सुरू झालेल्या भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेने सहा जुलै रोजी नव्वदीत प्रवेश केला. संस्थेचे यापुढचे 'नवतीचे दशक' सर्वार्थाने भरभराटीचे करण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष आणि ज्येष्ठ संगणकतज्ज्ञ डॉ. विजय भटकर यांनी १० कोटी रुपयांची योजना आखली आहे. याशिवाय महाभारताच्या चिकित्सित पाठाचे इंग्रजीकरण करण्याचा संकल्पही संस्थेने सोडला आहे.

इंटरनेट आणि माहिती तंत्रज्ञानाच्या मदतीने भटकर यांनी भांडारकर संस्थेचा तोंडावळा पूर्ण आधुनिक आणि कॉम्प्युटराइज्ड करण्याचे यापूर्वीच जाहीर केले होते. या कामात मुंबईतले उद्योजक नानिक रुपानी आणि प्रल्हाद छाब्रिया यांच्यासारख्या दानशूर उद्योजकांचाही संस्थेच्या सल्लागार समितीत समावेश करण्यात आला आहे. तसेच संस्थेची एक लाख दहा हजारांहून अधिक ग्रंथ असणारे ग्रंथालय अत्याधुनिक करण्यात येत आहे.

महाभारताच्या चिकित्सित पाठांच्या सूचीनंतर त्यावरील उपसंहाराचे काम होईल; पण जगभरातील इतर भाषांमध्ये पोहोचण्यासाठी महाभारताचे इंग्रजीत भाषांतर होणे ही आजची खरी गरज आहे. त्याकडेच संस्था अधिक लक्ष देणार आहे. याशिवाय नानिक रुपानी यांच्या मदतीने कौटिल्य अर्थशास्त्रावरही एक नवा प्रकल्प तयार होतो आहे, असे डॉ. मा. गो. धडफळे यांनी सांगितले. सिंधी भाषा आणि सिंधी संस्कृती यांचे खास असे अभ्यासकेंद्र भांडारकरमध्ये सुरू करण्याचा

विचार आहे. 'हिंदुस्थान' हे नाव 'सिंधुस्थान' या शब्दापासून आले, असे सांगून धडफळे म्हणाले की, फाळणीवेळी पूर्ण सिंध प्रांत भारतापासून तुटला. पण त्या संस्कृतीची नाळ मात्र अतूट राहिली आहे. यासाठी हे दोन प्रकल्प या दशकात पूर्ण झाले तरी निश्चित संपन्न असे योगदान संस्थेने केले याचे समाधान लाभेल.

याशिवाय छत्रपती संभाजी महाराजांचे 'बुधभूषण' हे संस्कृत काव्य १९२६ मध्ये डॉ. ह. दा. वेलणकर यांनी संपादित केले होते. त्याचे इंग्रजी भाषांतरही लवकरच प्रकाशित करण्याची योजना आखण्यात आली आहे, असे कोषप्रमुख आणि संस्कृतज्ज्ञ पं. वसंत गाडगीळ यांनी सांगितले.

### * चिनी भाषा शिका थेट मराठीतून

रोटरी क्लब पुणे, पाषाणच्या 'व्होकेशनल एक्सलन्स ॲवॉर्ड' विजेत्या आणि अपंगत्वावर मात करणाऱ्या प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ डॉ. विद्या पित्रे सध्या मराठीसह भारतीय भाषांमधून चिनी शिकवण्याचा प्रकल्प तयार करत आहेत. यासाठी चिनी भाषा शिकवण्याची पद्धत तसेच तज्ज्ञांच्या मदतीने सॉफ्टवेअरही तयार करण्याची त्यांची धडपड आहे!

ऑस्टोजेनिसिस इंपेर्फेक्टा या दुर्धर व्याधीला डॉ. पित्रे बालपणापासून खंबीर तोंड देत आहेत. गोखले अर्थशास्त्र आणि राज्यशास्त्र संस्थेत पीएच.डी. केल्यानंतर सध्या रिझर्व बँकेच्या कृषी बँकिंग विभागाच्या सल्लागार म्हणून काम करणाऱ्या विद्या केवळ व्हिलचेअरवरूनच वावरू शकतात.

दिवंगत मैत्रीण डॉ. ज्योत्स्ना कमल यांच्याबरोबर 'मराठीतून चिनी शिका' या प्रयोगाची सुरुवात झाल्याचे डॉ. पित्रे सांगतात.

या प्रकल्पाची संकल्पना मुंबईतील इंडियन चायना चेंबर्स ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्रीजला आवडली आहे, असे सांगून डॉ. पित्रे म्हणाल्या की, यामुळे इंग्रजीशिवाय चिनी भाषा शिकून त्यामध्ये करिअर करणाऱ्या कोणालाही ती शिकता येईल. ही कल्पना चीनमधील भारताचे माजी राजदूत वा. गो. परांजपे यांनी काही महिन्यांपूर्वी लिहिलेल्या लेखातून सुचली, असेही डॉ. पित्रे आवर्जून सांगतात.

### * नानासाहेब गोरे यांचे चरित्र

''नानासाहेब गोरे हे सर्वार्थाने विचारपीठाचे वारकरी होते. त्यांचे महान कार्य पुस्तकरूपाने मांडण्याचा स्तुत्य प्रयत्न प्रा. प्रधानसरांनी केला,'' असे मत राज्य साहित्य-संस्कृती मंडळाचे अध्यक्ष मधु मंगेश कर्णिक यांनी व्यक्त केले.

दिवंगत समाजवादी नेते नानासाहेब गोरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त एस. एम. जोशी समाजवादी प्रबोधिनी आणि नानासाहेब गोरे अकादमी यांनी संयुक्तपणे आयोजित केलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी किशोर पवार होते. व्यासपीठावर महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष डॉ. गं. ना. जोगळेकर, प्रा. सदानंद वर्दे होते. कार्यक्रमात ज्येष्ठ समाजवादी नेते प्रा. ग. प्र. प्रधान यांनी लिहिलेल्या 'महाराष्ट्राचे शिल्पकार- ना. ग. गोरे' या पुस्तकाचे प्रकाशन कर्णिक यांच्या हस्ते झाले.

कर्णिक म्हणाले, ''प्रधानसरांचे नानांवर अटळ प्रेम आणि श्रद्धा होती. नानासाहेबांवरील पुस्तक सरांनी लिहावे, हा अमृतकांचन योग आहे. नानांच्या विचारांनी भारलेल्या पिढीचे आम्ही वारसदार आहोत.''

''नानासाहेब गोरे यांचे साहित्य' या विषयावर बोलताना डॉ. जोगळेकर म्हणाले, ''नानासाहेब गोरे यांचे लिखाण विविधतापूर्ण, रोचक आणि संदेश देणारे होते. नव्या पिढीला नवा विचार देण्याच्या त्यांच्या प्रयत्नामुळे त्यांचे बहुतांशी लेखन कालबाह्य झालेले नाही. राजकीय नेता बनले नसते; तर नानासाहेब उत्तम लेखक झाले असते. एम. एम. जोशी यांच्याशी तात्त्विक संघर्ष उद्‌भवल्यानंतर नानासाहेब स्वत:चे वेगळेपण दाखवून देत असत.

शहरी, मध्यमवर्गीयांना आवडणारी अशी नानासाहेबांची बौद्धिक भेट होती. नाना हे कारणापुरते अल्प लिहिणाऱ्यांपैकी नव्हते. राजकीय नेता म्हणून त्यांना स्वत:च्या लिखाणाचा गौरव नको असे. साहित्याच्या आदानप्रदानात रमलेला हा नेता संमेलनाध्यक्ष व्हायला हवा होता.'' असे जोगळेकर म्हणाले.

### * मुलांसाठी हॉकिंग लिहिणार पुस्तक!

लहान मुलांना कळेल अशा सोप्या भाषेत लिहिणं ही कला तशी फार थोड्यांना अवगत असते. त्यातच मुलांसाठी विज्ञानविषयक लेखन करणे व त्यांना कुठलीही संकल्पना सोप्या भाषेत समजावून देणे, यासाठी गमतीजमतीची जोड देणे आवश्यक असते. मुलांसाठी आनंदाची बातमी म्हणजे प्रसिद्ध भौतिकशास्त्रज्ञ स्टीफन हॉकिंग हे स्वत: मुलांसाठी विज्ञानाचे पुस्तक लिहिणार आहेत. हे पुस्तक वेगळेच असणार आहे. त्याला डूब असेल ती हॅरी पॉटरसारख्या पुस्तकांच्या शैलीची, पण हॅरी पॉटर करतो तशी कुठलीही जादू मात्र त्यात असणार नाही. मुलांना सैद्धांतिक भौतिकशास्त्र अधिक रंजक पद्धतीने समजावून सांगणारे हे पुस्तक हातोहात खपेल यात शंका नाही. प्रोफेसर हॉकिंग यांचे 'अ ब्रिफ हिस्टरी ऑफ टाईम' हे पुस्तक बेस्ट सेलरच्या यादीत आहे. त्याचे मराठीत भाषांतरही झाले आहे. विश्वरचनाशास्त्र, बिगबँग थिअरी (महास्फोट सिद्धांत) व कृष्ण विवरे अशा अनेक विषयांवर या पुस्तकात चर्चा करण्यात आली आहे. हॉकिंग यांची कन्या ल्युसी हिने सांगितले की, माझा मुलगा आठ वर्षांचा आहे. त्याच्यासारख्या अनेक मुलांसाठी डॅडी पुस्तक लिहिणार आहेत. हे पुस्तक गोष्टीरूपात असेल व रंजक पद्धतीने विश्वाची कोडी त्यात उलगडून दाखवली जातील. प्रोफेसर हॉकिंग हे केंब्रिज विद्यापीठात गणिताचे प्राध्यापक असून 'अ ब्रिफ हिस्टरी ऑफ टाईम' या १९८८ मध्ये प्रसिद्ध झालेल्या पुस्तकाच्या १ कोटी प्रती खपल्या आहेत.

## * सिंधूताई कानेटकर या समर्पित पतिव्रता : डॉ. लागू

सिंधूताई कानेटकर या आयुष्यभर समर्पित पतिव्रता जीवन जगल्यामुळे आपण एका प्रतिभावान साहित्यिक लेखिकेला मुकलो, असे मत ज्येष्ठ अभिनेते डॉ. श्रीराम लागू यांनी व्यक्त केले.

पॉप्युलर प्रकाशन आणि साधना साप्ताहिक यांच्या सहयोगाने आयोजित 'पॉप्युलर साहित्य-साधना' या साहित्यिक कार्यक्रमात सिंधू वसंत कानेटकर यांनी लिहिलेल्या 'साथसोबत' या पुस्तकाचे प्रकाशन प्रसिद्ध अभिनेत्री दीपा लागू यांच्या हस्ते झाले. त्यावेळी डॉ. लागू बोलत होते. प्रा. वीणा देव, पॉप्युलर प्रकाशनचे रामदास भटकळ आदी उपस्थित होते.

डॉ. लागू पुढे म्हणाले की, कानेटकरांच्या नाटकात काम करता करता त्यांच्या कुटुंबीयांशी आपला स्नेह जुळला. १९५७ पासून मी त्यांच्याकडे जात होतो. तथापि, तेव्हा कधीही सिंधूताईंमधील विलक्षण प्रतिभावान महिलेची ओळख झाली नव्हती. 'सखाराम बाईंडर'वरून निर्माण झालेला वाद. त्याबाबतची वैचारिक मतभिन्नता आणि त्यातून वसंतराव व आपल्यात निर्माण झालेले गैरसमज केवळ सिंधूताईंनी केलेल्या समर्थ मध्यस्थीमुळे दूर झाले. त्यांच्यामुळेच वसंतरावांशी असलेली आपली मैत्री अबाधित राहिली, असेही डॉ. लागू यांनी या वेळी स्पष्ट केले.

वसंतरावांवर त्यांचे अतिशय प्रेम होते. वसंतरावांना लिखाणासाठीही त्या खूप मदत करीत असत. वसंतराव एकावेळी चार-चार नाटकांचे लिखाण करीत. त्यामुळे कधी कधी ते एखाद्या नाटकात लिखाणात ते भलत्याच पात्राचा शोध घेण्याचा प्रयत्न करीत. त्यावेळी सिंधूताई नेमकेपणाने ते लिखाण त्यांच्यापुढे ठेवत असत, अशी आठवणही डॉ. लागू यांनी सांगितली.

सिंधूताईंचे लेखनकौशल्य पाहिल्यावर त्यांनी वयाच्या सत्तरीनंतर लेखनास सुरुवात केली हे खरेच वाटत नाही, असे सांगून वीणा देव यांनी सिंधूताई कानेटकर यांच्या लेखनातील विविध वैशिष्ट्ये स्पष्ट केली. 'साथसंगत' या पुस्तकातील काही निवडक उताऱ्यांचे अभिवाचन देव यांनी केले.

निशांत जोगी आणि अरुण कानेटकर यांचीही भाषणे झाली. रामदास भटकळ यांनी प्रास्ताविक करून आभार मानले.

## * 'कविता पानोपानी'च्या व्हिसीडीचे प्रकाशन

गेली वीस वर्षांहून अधिक काळ लोकप्रिय ठरलेल्या 'कविता पानोपानी'च्या 'व्हीसीडी' आणि 'डीव्हीडी'चे प्रकाशन ज्येष्ठ रंगकर्मी डॉ. श्रीराम लागू आणि ज्येष्ठ संगीतकार यशवंत देव यांच्या हस्ते झाले. व्यासपीठावर ज्येष्ठ अभिनेते श्रीकांत मोघे, प्रसिद्ध छायालेखक देबू देवधर, 'प्रोग्रेसिव्ह ड्रामॅटिक असोसिएशन'चे सचिव शशिकांत कुलकर्णी होते.



'सुधीर हे कवितेचे अर्थ समजावून देणाऱ्यांपैकी आहेत, ते गायकीचा अहंकार मिरवीत नाहीत,'' अशा शब्दांत मोघे यांचे कौतुक करून देव म्हणाले, ''गीतकार हा मुळात कवी असावा लागतो. मोघे हे यापैकी एक आहेत. तिन्ही मितींहून निराळी अशी त्यांची स्वत:ची एक मिती आहे. त्यांच्या गीतांच्या चाली माझ्या हृदयात स्थिरावल्या आहेत.''

मोघे म्हणाले, ''पहिल्या काही प्रयोगांमध्ये मी 'परफॉर्मर'चा सावधपणा बाळगला. 'कविता पानोपानी' हा कवितांचा, संगीताचा आणि नादाचा कार्यक्रम आहेच; पण त्याहीपेक्षा तो लयीचा प्रवास आहे. 'व्हीसीडी' प्रकाशित झाल्यामुळे मी एका परीने कार्यक्रमातून मानसिक पातळीवर मुक्त झालो आहे. आता नवीन काहीतरी शोधणार आहे.'' डॉ. लागू यांनी 'कवितांचा हा रंगमंचीय आविष्कार आणखी तीस वर्षे सुरू ठेवावा,' अशी अपेक्षा व्यक्त केली.

श्रीकांत मोघे म्हणाले, की सुधीरने वडिलांचा वारसा समर्थपणे पुढे नेला.

## * रणजित देसाईंचा 'राजा रविवर्मा' पडद्यावर

'मंगल पांडे'च्या अपयशाने खचून न जाता दिग्दर्शक केतन मेहता आता नव्या बिग बजेटची स्क्रिप्ट लिहीत आहेत. या चित्रपटाचे नाव आहे 'कलर्स ऑफ पॅशन'. याचा विषय मराठी मनाला जवळचा वाटेल. कारण रणजित देसाईंच्या 'राजा रविवर्मा' या कादंबरीवरून याची कथा घेतली आहे. हा चित्रपट इंडो-फ्रेंच-जर्मन प्रोजेक्ट असून यातले कलाकार ब्रिटिश असतील; पण प्रमुख भूमिकेत कोण असेल, यावर मेहता मौन पाळतात. तरी ऐश्वर्या राय प्रमुख भूमिकेत असेल, अशी खबर आहे!

मेहतांनी दहा वर्षांपूर्वीच रणजित देसाईंच्या वारसदारांकडून कादंबरीवर चित्रपटकथा करण्याचे हक्क विकत घेतले आहेत.

आत्तापर्यंत समाजाने बदलांना कधी लगेच मान्यता दिली नाही. उलट नवी दिशा दाखवणाऱ्या विचारवंतांना शिक्षा देण्यात धन्यता मानली. राजा रविवर्म्याची प्रसिद्धी आणि चित्रकलेच्या दैवी देणगीने त्यांच्या आयुष्यात अनेक वादळे आणली. विश्वामित्राची तपश्चर्या भंग करणाऱ्या मेनकेचे विभ्रम दाखवणाऱ्या चित्रासाठी त्यांच्यावर खटला भरण्यात आला. कलाकाराला आविष्कार स्वातंत्र्य असावे, या मुद्द्यावर त्यांनी हा खटला जिंकला. १८४८-१९०६ या कालखंडातील या कलासक्त राजाने केतन मेहतांवर मोहिनी घातली. मेहतांना त्यांच्या जीवनाचा घटनाक्रम, चित्रकलेची पॅशन आणि ते सादर करण्याची बोल्ड शैली आजची वाटते. आजच्या पिढीला अपील होणारी वाटते. म्हणूनच काही वर्षांपूर्वी वाचलेल्या या कादंबरीवर त्यांनी चित्रपट बनवायचं ठरवलं. राजा रविवर्मा यांनी मळवली येथे प्रेसही सुरू केला होता. तेथे छापलेली त्यांची चित्रे मग घराघरात, देवघरात आणि दिवाणखान्यात गेली.

राजा रविवर्मा केरळमध्ये जन्मले तरी काही काळ महाराष्ट्रात राहिले. त्यांच्या चित्रातल्या स्त्रियांची केशभूषा आणि वेषभूषेवर अस्सल मराठी ठसा होता. आता मेहता त्यांच्या 'कलर्स ऑफ पॅशन'मधून मराठी संस्कृतीचा रंग कसा दाखवतात, हे लवकरच कळेल!

*** सुनीताबाईंच्या 'मनातलं अवकाश'**

पतिराज सिद्धहस्त लेखक... वयाच्या साठीपर्यंत सहचारिणी या शब्दाचा अर्थ तंतोतंत अमलात आणण्यात गुंग राहिल्याने त्यानंतर लिहिलेल्या अक्षरांना मुद्रण यंत्राचा पहिला स्पर्श झालेला... लेखक म्हणून मिरवत बसण्यापेक्षा मनातले सारे काही शब्दबद्ध करण्याचा खटाटोप करत राहणेच अधिक आवडे...

महाराष्ट्राचं लाडकं व्यक्तिमत्त्व असलेल्या पु. ल. देशपांडे यांच्या सहाव्या स्मृतिदिनी त्यांच्या पत्नी सुनीताबाई यांनी त्यांचे स्मरण अनोख्या पद्धतीने केले. सुनीताबाईंनी लिहिलेल्या 'मनातलं अवकाश' या नव्या पुस्तकाचं प्रकाशन झालं. कोणत्याही समारंभाविना प्रकाशित झालेल्या या पुस्तकाच्या प्रती मौज प्रकाशनगृह तर्फे राज्यात सर्वत्र उपलब्ध करण्यात आल्या.

एखाद्या लेखिकेने, लेखक असलेल्या आपल्या पतीला त्यांच्या स्मृतिदिनी दिलेली ही वेगळी भेट आहे. 'मनातलं अवकाश' हे सुनीताबाईंच्या लेखांचे संकलन आहे. त्यात विविध प्रसंगी लिहिलेल्या वेगवेगळ्या विषयांवरील लेखांचा समावेश आहे.

पुलंच्या स्मृतिदिनी अनेक व्यक्तींनी सुनीताबाईंना दूरध्वनी करून त्यांची विचारपूस केली.

आशय सांस्कृतिकतर्फे पुण्यातील पाथफाईंडर येथे पु. ल. आणि सुनीताबाई यांनी सादर केलेल्या कविवर्य बा. भ. बोरकर यांच्या कविता वाचनाच्या कार्यक्रमाची व्हिडिओफीत दाखवण्यात आली.

*** 'फुटपायरीचा सम्राट'!**

विजय तेंडुलकरांनी सुमारे २५ वर्षांपूर्वी लिहिलेल्या, पण प्रकाशित होण्यापूर्वीच हरवलेल्या 'फुटपायरीचा सम्राट' या नाटकाचे हस्तलिखित सापडले असून लवकरच नाट्यरसिकांना पुस्तकरूपात वाचायला मिळणार आहे!

'समग्र तेंडुलकर' काढणारे पॉप्युलर प्रकाशनच हे नाटक पुस्तकरूपाने काढत आहे. १९७५ ते ८० च्या सुमारास या नाटकाची संहिता तेंडुलकरांनी शाहीर साबळे यांना दिली होती. त्यांनी केलेले काही प्रयोग रसिक, तसेच समीक्षकांच्या पसंतीसह पडले होते. मात्र, त्यानंतर रंगकर्मींना हे नाटक पुन्हा करण्याची इच्छा झाली, तेव्हा तिची संहिता तेंडुलकर किंवा साबळे यांच्यापैकी कुणाकडेच उपलब्ध नव्हती.

बरीच वर्षे शोध घेतल्यानंतर तेंडुलकरांनी ते नाटक हरवले असल्याचे सांगितले.



तसेच, पुन्हा ते लिहिण्यासही असमर्थता दर्शविली होती. तेंडुलकरांनी ऐन भरात असताना लिहिलेल्या या नाटकाला रसिक कायमचे मुकणार, असे वाटू लागले होते. मात्र, पॉप्युलर प्रकाशनने नेटाने या नाटकाचा शोध घ्यायला सुरुवात केली. अखेर बरीच शोधाशोध केल्यानंतर 'फुटपायरीचा सम्राट' सापडले ते साबळे यांच्याकडेच, असे प्रकाशक रामदास भटकळ यांनी सांगितले.

*** तर तो कवी खुशमस्कऱ्या विदूषक : पाडगावकर**

मनोरंजन ही कवितेची प्राथमिक अट आहे. परंतु, कवी त्या ठिकाणीच थांबला तर तो माणूस समजू शकणार नाही आणि त्याला जर माणूस समजला नाही तर तो कवी केवळ खुशमस्कऱ्या विदूषक ठरेल, असे प्रतिपादन ज्येष्ठ कवी मंगेश पाडगावकर यांनी केले.

दूरर्शनवरील वृत्तनिवेदिका, चित्रकार आणि विविध कार्यक्रमांचे सूत्रसंचालन अशा अनेक भूमिकांतून घराघरात पोहोचलेल्या स्वाती पाटणकर यांच्या 'निखळ' या कवितासंग्रहाचे प्रकाशन पाडगावकर यांच्या हस्ते झाले. त्या वेळी ते बोलत होते. संगणतज्ज्ञ डॉ. विजय भटकर हे या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रख्यात भावगीतगायक अरुण दाते होते. पाडगावकर पुढे म्हणाले, की कलात्मक अभिरुची अर्थपूर्ण होण्यासाठी मनोरंजन ही प्राथमिक अट आहे. परंतु, कला ही त्याच्याही पुढची गोष्ट आहे. कोणतीही कला मग ती चित्रकला असो, संगीत असो वा कविता, माणसाचा शोध घेणे हे त्यांचे महत्त्वाचे काम आहे.

विजय भटकर यांनी 'संगणक कविता करू शकतो का?' हा विषय त्यांच्या भाषणातून मांडला. ते म्हणाले, ''चिरंतन साहित्य हे काव्यातूनच निर्माण झाले आहे. काव्य ही त्यामुळेच एक महत्त्वाची अभिव्यक्ती आहे. संगणकावरही अशा तऱ्हेचे प्रयोग करण्यात येत आहेत. त्याला संवेदना येतील का? तो काव्य करू शकेल का? अशा शक्यतांचा शोध या विषयातील तज्ज्ञ घेत आहेत.

अरुण दाते म्हणाले, ''स्वातीला कवितेचा स्पर्श असल्याचे मला नेहमी जाणवायचे. माझ्याबरोबर ती गेली नऊ वर्षे शुक्रताराचा कार्यक्रम करते. त्या दरम्यान तिचे कवयित्रीचे हृदय जाणवत असे. कवितेचे गाणेच मी जन्मभर गात आल्याने स्वातीच्या कविता मला जवळच्या वाटतात.''

स्वाती पाटणकर आपल्या मनोगतात म्हणाल्या, की बऱ्याच वर्षांपासून मी कविता लिहिते. का लिहिते ते कळत नव्हते. त्यांचा संग्रह होईल असेही कधी वाटले नव्हते. परंतु, आज माझा कवितासंग्रह प्रकाशित होतो, हा माझ्यासाठी भाग्याचा क्षण आहे.

प्रारंभी पद्मगंधा प्रकाशनाचे अरुण जाखडे यांनी प्रास्ताविक केले. स्मिता गवाणकर यांनी सूत्रसंचालन केले, तर 'संवाद'चे सुनील महाजन यांनी आभार मानले.

## * 'सिलिकॉन व्हॅली'तून उमटतोय मराठी आवाज

'सिलिकॉन व्हॅली'त सध्या चक्क मराठी आवाज घुमतो आहे. 'त्या तिथे पलीकडे, तिकडे माझिया प्रियेचे झोपडे' पासून 'इंद्रायणी काठी देवाची आळंदी' पर्यंतच्या गाण्यांना अमेरिकन तंत्रज्ञानाचा बाज लाभला आहे. हा आवाज म्हणजे अमेरिकेत सध्या कौतुकाचा विषय बनला आहे. मराठी माणसे. अमेरिकेत एकत्र आली आणि त्यांनी सुरू केला आहे 'इंटरनेट रेडिओ'.

या नव्याने सुरू झालेल्या नभोवाणीने अख्खे जग व्यापले आहे. ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंडपासून टोकियो, सोलपर्यंत आणि ओटावापासून सिंगापूरपर्यंत जिथे जिथे मराठी माणूस आहे, तिथे तिथे ही 'नभोवाणी' लोकप्रिय होते आहे. जगभरातून त्यांना 'ई-मेल्स' धडाधड येऊ लागल्या आहेत आणि आपल्या 'फर्माईशी' कळवण्यात येऊ लागल्या आहेत. मिलिंद गोखले, मधुरा गोखले, अतुल वैद्य आणि विद्या वैद्य हे चौघे आपले काम सांभाळून या 'इप्रसारणा'चे व्यवस्थापन पाहतात. गंमत म्हणजे संपूर्ण महिन्याचा कार्यक्रम त्यांच्याकडे तयार आहे. 'हा कार्यक्रम काही अपरिहार्य कारणास्तव आम्ही ऐकवू शकत नाही,' अशी कोणतीही सबब इथे ऐकवली जात नाही.

कॅलिफोनिर्याचा 'बे एरिया' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सिलिकॉन व्हॅलीच्या (सॅन जोस) जवळ असणाऱ्या फ्रेमाँटमधून हा कार्यक्रम सादर केला जातो. इंटरनेट माध्यमातून नभोवाणीचे कार्यक्रम सादर करणारे अनेकजण अमेरिकेसह अन्य देशांत आहेत. उदाहरणार्थ, इंग्लंडमध्ये असणारा सबरस रेडिओ. त्यावर हिंदी कार्यक्रम प्रामुख्याने सादर केले जातात. मराठीत होणारे आणि मराठी कलाकरांना प्राधान्य देणारे हे एकमेव मराठी केंद्र आहे. मराठी भाषेची ध्वजा पाचही खंडांमध्ये फडकत ठेवायचा आपला उद्देश आहे आणि त्यात गेल्या काही दिवसांत आपल्याला यश आल्याचे मिलिंद गोखले म्हणाले.

## * विद्यार्थ्यांनी मूलभूत संशोधनाकडे वळावे : डॉ. माशेलकर

''संशोधन आणि विकासक्षेत्रात (आर अँड डी) काम करणाऱ्या शास्त्रज्ञांची संख्या वाढविण्याचे आव्हान देशापुढे आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांनी मूलभूत विज्ञानाकडे वळले पाहिजे. मूलभूत विज्ञानाकडे वळणाऱ्या विद्यार्थीसंख्येत वाढ झाली नाही; तर भारताचे भवितव्य धोक्यात येईल,'' असा इशारा ज्येष्ठ वैज्ञानिक आणि 'सीएसआयआर'चे महासंचालक डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी दिला.

डॉ. विश्वास मेहेंदळे यांनी लिहिलेल्या 'आपले वैज्ञानिक' पुस्तकाचे प्रकाशन डॉ. माशेलकर यांच्या हस्ते झाले. व्यासपीठावर 'वनराई'चे अध्यक्ष मोहन धारिया, ज्येष्ठ पत्रकार विजय कुवळेकर आणि 'अनुबंध प्रकाशन'चे अनिल कुलकर्णी होते. ''डॉ. मेहेंदळे यांनी रेखाटलेली वैज्ञानिकांची व्यक्तिचित्रे अन्य भारतीय भाषांमध्ये उपलब्ध व्हावीत.'' अशी अपेक्षा व्यक्त करून डॉ. माशेलकर म्हणाले, ''देशाला सध्या 'आर अँड डी' क्षेत्रात २० लाख संशोधकांची गरज आहे. प्रत्यक्षात सध्या एक लाख ६० हजार इतकेच संशोधक या क्षेत्रात कार्यरत आहेत. युगात टिकून रहायचे; तर ही संख्या वाढली पाहिजे. अर्थात स्पर्धेतील मूल्यमापनापेक्षा वैज्ञानिकाने देशाकरिता काम केले, हे महत्त्वाचे आहे. नव्या पिढीसमोर आदर्श ठेवण्याच्या दृष्टीने 'आपले वैज्ञानिक'सारख्या पुस्तकांची गरज आहे.'' कुवळेकर, मेहेंदळे यांनीही मनोगत व्यक्त केले. धारिया यांनी अध्यक्षीय समारोप केला.

कार्यक्रमापूर्वी पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. वि. ग. भिडे यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. प्रा. मिलिंद जोशी यांनी सूत्रसंचालन केले.

## * मृण्मयी पुरस्काराचे वितरण

''आप्पांमुळेच मला निसर्गवाचनासाठी आवश्यक असलेली दृष्टी प्राप्त झाली. निसर्गलेखक म्हणून मला मिळालेल्या मान्यतेचे रहस्य गोनीदांच्या पाच वर्षांच्या सहवासात दडलेले आहे,'' असे प्रांजळ प्रतिपादन साहित्य संमेलनाध्यक्ष मारुती चितमपल्ली यांनी केले.

गोनीदांच्या ९१ व्या जन्मदिनी त्यांच्या कुटुंबीयांतर्फे दिल्या जाणाऱ्या सोळाव्या 'मृण्मयी पुरस्कारा'चे वितरण चितमपल्ली यांच्या हस्ते झाले. प्रसिद्ध दीर्घकथाकार भारत सासणे यांना 'मृण्मयी', तर उढेवाडी परिसरातील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते मुकुंद गोंधळेकर यांना 'नीरा गोपाल' पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

व्यासपीठावर ज्येष्ठ कथाकार आशा बगे, गोनीदांच्या कन्या प्रा. वीणा आणि प्रा. विजय देव उपस्थित होते. चितमपल्ली म्हणाले, ''वनाधिकाऱ्याचा अभ्यासक्रम झाडे तोडणारे अधिकारी निर्माण करणारा आहे. मी मात्र मर्मज्ञ दृष्टीने जंगल जाणून घेत राहिलो. आप्पांच्या नजरेतून मी मावळातील गडकिल्ले पाहिले.''

बगे म्हणाल्या, ''आप्पांनी मराठीजनांना ज्ञानेश्वरीचे खोल संस्कार असलेली भाषा दिली, नि:संग माणसे दिली. त्या माणसांची गूढ जीवने, त्यांच्यातील नाती गोनीदांनी आपल्यापुढे ठेवली.

आप्पांचे संस्कार रुजू शकतील अशी मनोभूमी त्या काळच्या समाजात होती. सासणेंसारख्या लेखकांचा काळ तितका सरळ नाही. म्हणूनच की काय, सासणेंच्या लेखनात गुंतागुंत आहे. आजचे युग नकाराचे आहे. अविश्वासाच्या भरड भूमीमध्ये सासणे कथाबीज रुजवतायत.''

सासणे म्हणाले, ''मी आणि माझ्या समकालीन लेखकांसमोर गोनीदा वगळता दुसरे कोणतेही मॉडेल नव्हते. 'रूहानी' आणि 'रूमानी' अशा दोन्ही प्रकारचे सौंदर्य शोधणारे गोनीदा सूफी परंपरेशी साधर्म्य कसे सांगतात, यावर संशोधन झाले पाहिजे.''

कार्यक्रमात 'वाघरू', 'त्या तिथे रुखातळी' आणि 'स्मरणे गोनीदांची' या कादंबऱ्यांचे प्रकाशन बगे यांच्या हस्ते झाले. प्रा. वीणा देव यांनी आभार मानले. मृणाल कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले.

### * डॉ. ह. वि. सरदेसाई यांचे पुस्तक

ज्येष्ठ वैद्यकीय तज्ज्ञ ह. वि. सरदेसाई यांचे 'आरोग्य सर्वांसाठी' हे पुस्तक नुकतेच प्रकाशित झाले.

सर्वांना स्वास्थ लाभावे, अशी प्रार्थना भारतीय संस्कृतीत वेदकाळापासून केली जात आहे. 'सर्वेपि सुखिनः सन्तु सर्वे सन्तु निरामयः' या प्रार्थनेचा पाठपुरावा करणारे एक सदर डॉ. सरदेसाई यांनी दै. सकाळच्या 'फॅमिली डॉक्टर' पुरवणीत लिहिले होते. या लेखमालिकेतील लेखांचा थोडा विस्तार करून 'आरोग्य सर्वांसाठी' हे पुस्तक सकाळ पेपर्स लिमिटेडतर्फे प्रकाशित झाले.

'पुण्याचे ग्रामवैद्य' असे अभिमानस्थान प्राप्त करणारे डॉ. सरदेसाई 'जीवनशैली'विषयी सातत्याने चिंतन करतात. लेखन व व्याख्याने यांतून हे चिंतन समाजापर्यंत पोहोचवतात. या चिंतनाचाच पुढचा सुंदर भाग म्हणून ते सर्वांनाच 'संपूर्ण आरोग्य' कसे लाभू शकेल, याविषयीचे विचार या नव्या पुस्तकात मांडलेले आहेत.

एखाद्या व्यक्तीच्या आजारपणात फक्त शारीरिक आरोग्याला महत्त्व दिले जाते. त्या दृष्टीनेच उपचारही केले जातात. पण मानसिक, बौद्धिक व आध्यात्मिक तयारी असेल, तर शारीरिक आरोग्य सुस्थितीत राहते, असे डॉ. सरदेसाई यांनी या नव्या पुस्तकात सांगितले आहे. 'संपूर्ण आरोग्या'साठी प्रकृतीचा या सर्व अंगांनी विचार व्हायला हवा, असे ते आपल्या प्रदीर्घ अनुभवाने बजावतात.

सकस आहार, व्यायामाची गरज, स्वच्छता, विकारांचे निदान व प्रतिबंधन, मनाची प्रसन्नता, मनाची शुद्धता, श्रद्धेची शक्ती, योग आणि ध्यान, सामाजिक प्रकृती, आत्मीयता व प्रेमाची रूपे, प्राणायाम असे वेगवेगळे सत्तावीस मुद्दे डॉ. सरदेसाई यांनी येथे मांडले आहेत. शारीरिक अनारोग्यामागे मानसिक आरोग्यातील बिघाड, आध्यात्मिक कमतरता, डळमळीत श्रद्धा अशी साखळी असू शकते. ही साखळी जोडून उपचार करण्याची गरज डॉ. सरदेसाई यांनी या पुस्तकात आग्रहाने सांगितली आहे.

### * जपानी आणि मराठी भाषेमध्ये साधर्म्य

जपानी भाषा आणि मराठी भाषेमध्ये कमालीचे साधर्म्य असून, व्याकरणातील विभक्ती प्रत्यय, बऱ्याचशा म्हणीही सारख्या आहेत.

गरवारे महाविद्यालयातील केमिस्ट्री विभागाचे व जपानी भाषा विभागाचे प्रमुख डॉ. हरी दामले यांनी जपानी व मराठी भाषेबाबत काही निष्कर्ष काढले



आहेत. 'भिंतीला कान असतात' ही मराठीतील म्हण जपानी भाषेत 'खाबेनी मिमी आरी' अशा प्रकारे वापरली जाते. कर्ता, कर्म व क्रियापद ही आपली वाक्यरचना जपानी भाषेतही असल्याने जपानी व मराठीचे प्रेम अधिक दृढ होणे गरजेचे आहे.

जपानी भाषेला स्वतंत्र लिपी आहे. जपानी शिकण्यासाठी इंग्रजी भाषेचा आधार घ्यावा लागत नाही. जपानी लोकांच्या तंत्रज्ञानाप्रमाणेच जपानी भाषाही मराठी भाषा वगळता इतर भाषांमध्ये वेगळी आहे, असे दामले यांनी सांगितले.

जपानमध्ये भारतीय भाषा व जपानी भाषा जाणणाऱ्या व्यक्तींना प्रचंड मागणी आहे. मात्र आपल्याकडे जपानी भाषा शिकणाऱ्यांमध्ये तेवढी उत्सुकता नाही. महर्षी कर्वे शिक्षण संस्थेच्या शाळेमध्ये पाचवीपासूनच परकीय भाषा शिकवण्यास या वर्षीपासून सुरुवात झाली. यामध्ये जपानी भाषेचाही समावेश करण्यात आला आहे.

जपानी भाषा माध्यमिक शिक्षण घेत असतानाच शिकवली गेली तर अवघ्या थोड्या कालावधीत मुले चांगल्या प्रकारे शिकू शकतील. तरुणांमध्ये अमेरिकेमध्ये जाण्याविषयी असणारी उत्सुकता अधिक आहे. जपानी भाषा जर चांगल्या प्रकारे आली तर तरुणांना व्यवसायासाठी जपानचे दालन मोठ्या प्रमाणात खुले होईल, असे दामले यांनी सांगितले.

जपानी भाषेची लिपी वेगळी असल्याने ही शिकण्यासाठी थोडी अवघड आहे. मात्र एकदा ही लिपी कळली तर शिकणे फार सोपे होते. जपानी भाषा चांगल्या प्रकारे जाणणाऱ्यांची मराठीमध्ये वानवा आहे. जपानी भाषेतील पुस्तकांचे इंग्रजी भाषेत भाषांतर झाल्यानंतर आपण ते मराठीत भाषांतर करतो. जर मराठी लेखकाने जपानी भाषा अवगत केली, तर जपानी वाङ्मय मराठीमध्ये आणण्यासाठी त्याचा उपयोग मोठ्या प्रमाणात होईल. जपानमध्ये इंग्रजी भाषा वापरण्याचे प्रमाण अत्यंत कमी आहे. त्यामुळे जपानी भाषा जर मराठीतून मोठ्या प्रमाणात शिकवली गेली, तर विद्यार्थ्यांचा भाषेचा ओढाही निर्माण होईल आणि एक परकीय भाषा सहज शिकता आल्याचे समाधानही मिळेल, असे दामले म्हणाले.

### * झपाटलेला लेखक... गलबललेले चाहते

जी. ए. कुलकर्णी... त्यांच्या लेखनाची भूल ज्यांच्या मनात अजूनही रुंजी घालते अशा अभिजन वाचकांच्या गर्दीत त्यांचा ८३ वा जन्मदिन सोमवारी साजरा झाला. आयुष्यभर सार्वजनिक जीवनापासून फटकून राहिलेल्या या माणसाला जी गोष्ट आवडत नव्हती तीच आपण करीत असल्याचे भान असूनही एस. एम. जोशी सभागृहातील सायंकाळ त्यांच्या आठवणीने गलबलून गेली. शोकात्म माणूस आणि शोकात्म जीवन याचे आकर्षण असणारा हा लेखक माणूस म्हणून कसा होतो याचे विविध पदर यानिमित्ताने त्यांच्या वाचकांना अनुभवायला मिळाले.

जीएंच्या जन्मदिनाचे औचित्य साधून मौज प्रकाशनने प्रकाशित केलेल्या

त्यांच्या निवडक पत्रांच्या तिसऱ्या आणि चौथ्या खंडाचे प्रकाशन यावेळी ज्येष्ठ समीक्षक प्रा. रा. ग. जाधव यांच्या हस्ते झाले. मौज, आशय सांस्कृतिक आणि संयुक्तपणे आयोजित केलेला हा कार्यक्रम जीए प्रेमींसाठी मेजवानी होती, हे खचाखच भरलेल्या सभागृहावरून दिसून येत होते. 'आशय'चे विरेंद्र चित्राव आणि सतीश जकातदार, मौजच्या मोनिका गजेंद्रगडकर आणि डॉ. अरुणा ढेरे व्यासपीठावर उपस्थित होत्या.

तिसऱ्या व चौथ्या खंडाचे संपादन डॉ. सु. रा. चुनेकर यांनी केले आहे. ते म्हणााले, ''या खंडामध्ये 'जी.एं.'नी ३६ लोकांना लिहिलेली पत्रे समाविष्ट आहेत. त्यात प्रामुख्याने जयवंत दळवी, माधव आचवल, मंगेश पाडगावकर, विजया राजाध्यक्ष, म. द. हातकणंगलेकर आदींचा समावेश आहे. मराठीचे अभ्यासक आणि 'जी. ए.' प्रेमी विजय पाडगळकर यांनी या खंडांना प्रस्तावना लिहिली आहे. 'जी.एं'चे वेगळ्या पद्धतीचे मूल्यमापन करण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे. हा पत्रव्यवहार प्रकाशित करण्यामागे 'जी.एं.'ची वाङ्मयीन दृष्टी कळावी, हा हेतू आहे. या पत्रांना वाङ्मयीन मोल आहे. त्यातून गूढ भासणाऱ्या 'जी.एं.'च्या अधिक जवळ पोहोचणे वाचकांना शक्य होईल. पहिल्या दोन खंडांत छायाचित्रे नव्हती. या खंडांत मात्र 'जी.एं.'ची काही छायाचित्रे पाहावयास मिळतील.''

जीएंच्या लेखनाचे दाखले देत देत सूत्रसंचालन करणाऱ्या अरुणा ढेरे यांनी त्यांच्या लेखनाची तशीच अनाहूत चाहूल शेवटपर्यंत जागती ठेवली. रा. ग. जाधव यांनी त्यांच्या खास 'जाधवशैलीत' चिमटे घेत जीए लेखक म्हणून कसे होते हे सांगितले. जीएंसारखा लेखक वाचकांना नाही तर समीक्षकांना प्रॉब्लेम करतो, अशी स्पष्टोक्ती देऊन त्यांची पत्रे म्हणजे रानभूल असून ती वाचकांना भारावून टाकतात. हे पत्रांचे खंड लोकप्रिय ठरले तर सर्व लेखक लांबलचक पत्रे लिहीत राहतील, असे सांगायलाही ते विसरले नाहीत.

हा झपाटलेला माणूस वाचकांना झपाटून टाकतो. त्यामुळेच ही झपाटलेली पत्रे आहेत. जीवनमूल्ये, कलामूल्ये, सौंदर्यमूल्ये, साहित्यमूल्ये पत्रांमधून सापडतात. चारित्र्याकडून चरित्राकडे किती जाता येते याला मर्यादा आहेत. सर्वच निष्कर्ष काढता येत नाहीत आणि तेच मोठ्या प्रतिभावंताचे लक्षण असल्याचे प्रा. जाधव यांनी सांगितले.

गजानन परांजपे आणि ज्योती सुभाष यांनी केलेल्या जीएंच्या कथावाचनाने कार्यक्रमास रंगत आणली. क्रांती कानडे यांनी जीएंवर दिग्दर्शित केलेला लघुपट दाखवण्यात आला आणि सर्व माहोल जीएमय होऊन गेला.

जीएंनी काढलेल्या चित्रांचे प्रदर्शनही यावेळी सभागृहात लावण्यात आले होते. त्यामधूनही चित्रकार जीएंचेच नव्हे, तर लेखक आणि मनस्वी व्यक्तीच्या आयुष्याचेही कंगोरे उलगडले.



## * आगरकरांचा विवेकवाद दुर्लक्षित- भाई वैद्य

''आगरकरांच्या सामाजिक सुधारणांबद्दल सतत बोलले जाते. पण त्यांनी सांगितलेला विवेकवाद दुर्लक्षित राहतो,'' असे मत ज्येष्ठ समाजवादी नेते भाई वैद्य यांनी व्यक्त केले.

समाजसुधारक गोपाळ गणेश आगरकर यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त त्यांच्या निवडक ११ लेखांचा संग्रह प्रकाशित झाला, त्या वेळी वैद्य अध्यक्षस्थानावरून बोलत होते. व्यासपीठावर शिवाजी विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. अशोक चौसाळकर, ज्येष्ठ समीक्षक प्रा. पुष्पा भावे, प्रकाशक अरुण पारगावकर, डॉ. द. दि. पुंडे होते. कार्यक्रमात 'महाराष्ट्रातील जातिसंस्थाविषयक विचार' या प्रा. यशवंत सुमंत आणि डॉ. द. दि. पुंडे यांनी संपादित केलेल्या ग्रंथाची पुनर्मुद्रित आवृत्तीही प्रकाशित करण्यात आली.

वैद्य म्हणाले, ''आगरकरांचा इहवाद, बुद्धिनिष्ठा, सामाजिक विचार यांवर बरेच काम झाले. विवेकवादावर पं. नेहरू, कॉ. डांगे, एम. एन. रॉय, नानासाहेब गोरे, आदींनी लिहिले. मात्र, आगरकरांच्या विवेकवादाच्या मांडणीवर पुरेसा विचार झाला नाही. त्यांच्या मांडणीला कोणी प्रवक्ता नाही, ही उणीव दूर व्हावी.''

भावे म्हणाल्या, ''राष्ट्रवाद केवळ नकाशावरच्या रेषांचा नको. आरक्षणाचा मुद्दा डॉ. आंबेडकर यांच्याही आधी स्वातंत्र्य चळवळीत मांडला गेला होता आणि त्यास राष्ट्रीय काँग्रेसची मान्यता होती.'' डॉ. चौसाळकर म्हणाले, ''वैचारिक सामर्थ्याचे प्रतीक असलेली आगरकरांइतकी सकस मांडणी एकोणिसाव्या शतकात अन्य कोणीच केली नाही. त्यांचे विचार आजही सयुक्तिक आहेत.''

## * प्राचार्य शिवाजीराव भोसले- वय वर्षे ८०

ओघवत्या आणि प्रासादिक वक्तृत्वाने महाराष्ट्रातील समाजमनाचा ठाव घेणारे प्राचार्य शिवाजीराव भोसले यांचे 'वाग्वैभव' लवकरच इंटरनेटवरील संकेतस्थळाच्या (वेबसाइट) माध्यमातून जगभर पोहोचणार आहे. तसेच, त्यांच्या निवडक व्याख्यानांचे संकलन असलेला 'बंधुभगिनींनो' हा दोन खंडांमधील ग्रंथही प्रकाशित करण्यात येणार आहे.

प्रा. भोसले यांनी १५ जुलै रोजी ऐंशीव्या वर्षात पदार्पण केले. त्यानिमित्त त्यांच्या स्नेहीजनांनी वर्षभर विविध उपक्रम आयोजिण्याचे ठरविले आहे. त्याअंतर्गत प्रा. भोसले यांच्या कर्तृत्वाचा सुगंध जगभर पसरावा या उद्देशाने हे संकेतस्थळ विकसित करण्यात येत आहे, अशी माहिती प्रा. मिलिंद जोशी यांनी दिली. www.pracharya.com या संकेतस्थळावर प्राचार्यांचे अल्पचरित्र, कार्याचा परिचय, साहित्याची माहिती, व्याख्यानांच्या ध्वनिफिती आणि सीडींची माहिती मिळेल; तसेच ऑनलाइन नोंदणीही करता येईल. त्यांची दुर्मिळ छायाचित्रेही त्यावर असतील.

प्रा. भोसले यांनी आजवर हजारो ठिकाणी असंख्य व्याख्यानांच्या रूपाने लोकजागर घडविला. त्यातील निवडक व्याख्याने दोन भागांत संकलित करून ग्रंथरूपाने प्रकाशित करण्यात येणार आहेत. पहिल्या भागात शिवछत्रपती, स्वामी विवेकानंद, योगी अरविंद, स्वातंत्र्यवीर सावरकर, महात्मा गांधी, डॉ. आंबेडकर, महात्मा जोतीराव फुले, कर्मवीर भाऊराव पाटील आदी महापुरुषांच्या कार्याचा परिचय घडविणाऱ्या २१ भाषणांचा समावेश असेल. दुसऱ्या भागात प्रामुख्याने विविध वैचारिक विषयांवरील चिंतन आहे. साहित्य आणि समाज, धर्म आणि विज्ञान, शिक्षण : काल, आज आणि उद्या, चरित्रे अशी घडतात आदी अकरा विषयांवरील व्याख्याने त्यात असतील.

पुण्यात ऑगस्ट महिन्यात प्रा. भोसले यांचा सत्कार सोहळा होणार असून, त्याप्रसंगी 'शब्द जैसे कल्लोळ अमृताचे' ही विशेष स्मरणिका प्रसिद्ध होणार आहे. त्यात राजकारण, पत्रकारिता, भाषा, लिपी, लोकसाहित्य, संतसाहित्य, शिक्षण, अभिनय, व्यवस्थापन, इतिहास, स्त्रीसाहित्य, कीर्तन आदी विविध क्षेत्रांतील मान्यवरांचे 'वक्तृत्व' या विषयावरील लेखन समाविष्ट असेल. तसेच 'वक्तृत्व संमेलन' हा वेगळा उपक्रम करण्याचा मानस असल्याचे प्रा. जोशी यांनी सांगितले.

मध्यंतरी प्रा. भोसले जीवघेण्या आजारातून वाचले. त्या काळात वैद्यकीय उपचारांसाठी लागणारा खर्च पाहून, अशा प्रसंगी गरजू शिक्षकांना मदत मिळावी, या हेतूने 'विश्वस्त निधी' उभारण्याची योजना प्राचार्यांचे चिरंजीव संजीव भोसले यांनी आखली आहे.

## * पुणेकर लेखिकेच्या पुस्तकाचे 'रँडम हाऊस'तर्फे प्रकाशन

वादग्रस्त पुस्तक 'द दा विन्ची कोड'ची प्रकाशनसंस्था अर्थात न्यूयॉर्कचे 'रँडम हाऊस' मंजिरी प्रभू या अस्सल पुणेकर मराठी लेखिकेची 'द ॲस्ट्रल अलबाय' आणि 'द कॉस्मिक क्ल्यूज' ही इंग्रजी पुस्तके भारतीय बाजारपेठेत आणते आहे.

दोन्ही पुस्तके यापूर्वीच न्यूयॉर्कमध्ये प्रकाशित झाली आहेत आणि त्यांना वाचकांचा चांगला प्रतिसाद मिळतो आहे. प्रभू यांनी वयाच्या फक्त सातव्या वर्षी मुलांसाठी साहसकथा लिहून लेखनप्रांतात प्रवेश केला. फ्रेंच भाषेमध्ये एम.ए. केल्यानंतर त्या 'बालचित्रवाणी'मध्ये निर्मात्या म्हणून रुजू झाल्या. अर्थात, लेखनाची ऊर्मी त्यांना स्वस्थ बसू देईना. त्यातूनच १९९४ मध्ये 'अ सिम्फनी ऑफ हार्टस' हे त्यांचे पहिले पुस्तक नवी दिल्लीच्या 'रूपा अँड कंपनी'ने प्रसिद्ध केले. 'रूपा रोमान्स सिरीज'चा हिस्सा असलेल्या या पुस्तकाला चांगला प्रतिसाद मिळाला. 'मिल्स अँड बून्स' या पाश्चात्त्य प्रणयकथांच्या धर्तीवर 'रूपा अँड कंपनी'ने ही मालिका आणली होती. २००५ मध्ये प्रभू यांचे 'सिल्व्हर इन द मिस्ट' हे पुस्तक प्रकाशित झाले.



त्यापाठोपाठ 'हिंदी चित्रपटातील स्त्री-भूमिका' या विषयावरील पीएच.डी.मध्ये गुंतलेल्या प्रभू यांनी बऱ्याच कालावधीनंतर नव्या पुस्तकासाठी प्रयत्न सुरू केले. अमेरिकी प्रकाशक शोधण्यासाठी मध्यस्थाची मदत घेणे भाग असते. तब्बल दीड वर्षांनी प्रभू यांना मध्यस्थामार्फत रुकार मिळाला तो थेट 'रँडम हाऊस'कडून. मग साकारले 'द कॉस्मिक क्ल्यूज' आणि त्याच मालिकेतील 'द ॲस्ट्रल अलबाय'. भारतीय मातीतील या पुस्तकांमध्ये रेखाटलेले मध्यवर्ती पात्र आहे सोनिया समर्थ. सोनिया गुप्तहेर आहे आणि ती पुण्यातच काम करते. ज्योतिषाच्या आधारे गुन्ह्यांचा तपास लावणारी सोनिया रंगवताना प्रभू यांना त्यांची आई आणि फलज्योतिषाच्या अभ्यासक शोभा प्रभू यांची खूप मदत झाली. सोनियाचा सहायक जतिन सिंग आणि तिची निधी नावाची मांजर ही मालिकेतील अन्य दोन पात्रे. दोन्ही पुस्तकांच्या रूपाने मालिकेच्या स्वरूपातील कादंबरी असा निराळाच आकृतिबंध भारतीयांना वाचायला मिळणार आहे.

## * 'मनातले सारे' पुस्तकाचे प्रकाशन

''व्यंगचित्रे साहित्यात मोडत नाहीत. त्यामुळे साहित्य आणि चित्रकला असा दोन्ही क्षेत्रांमधून मी बाहेर फेकलो गेलो आणि कलेच्या प्रांतातील भटक्या आणि विमुक्त जातीचा सदस्य बनलो,'' असे मनोगत ज्येष्ठ व्यंगचित्रकार मंगेश तेंडुलकर यांनी व्यक्त केले.

नाट्य-अभिनेता संजय डोळे यांनी लिहिलेल्या 'मनातले सारे' या पुस्तकाचे प्रकाशन अभिनेत्री स्मिता तळवलकर यांच्या हस्ते झाले. यावेळी तेंडुलकर बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक डी. एस. कुलकर्णी हे होते. व्यासपीठावर डॉ. सतीश देसाई, संजय डोळे, गंगाधर महांबरे आदी यावेळी उपस्थित होते.

डोळे यांच्या पुस्तकामुळे एक वेगळे काम माझ्या हातून झाले आहे. पुस्तकातील कवितांना व्यंगचित्रे काढण्यास सुरुवात केली आणि प्रत्येक कवितेतून एक वेगळी कल्पना जन्माला आली. या पुस्तकामध्ये पुरोहिताची भूमिका बजावली आहे. मंगलाष्टक म्हणणारा मी आहे, लग्नाला वेगळेच उभे राहिले आहेत, असे तेंडुलकर म्हणाले.

श्रीमती तळवलकर पुस्तकाविषयी बोलताना म्हणाल्या, ''कविता, व्यंगचित्रे, एसएमएस आणि लेख यांचे मिश्रण या पुस्तकात असल्याने एक नवीनच प्रकार तयार झाला आहे. पुस्तकात संजयमधला अभिनेता संवाद करताना दिसतो. विश्वात सगळेच जगतात परंतु कठीण परिस्थितीत जगणारे वेगळेच.''

सृजा प्रकाशनने हे पहिलेच पुस्तक प्रकाशित केले आहे.

प्रकाशनाचा कार्यक्रम झाल्यानंतर 'कल्पक' निर्मित मनातील सारे... हा कार्यक्रम सादर करण्यात आला.

## * 'तंत्रज्ञान युगातही संस्कृतचे महत्त्व टिकणार'

संगणक, तंत्रज्ञान युगात संस्कृत कालबाह्य झाले नसून, नवनवीन शब्द तयार करण्यासारख्या महत्त्वपूर्ण कार्यामुळे त्याचा संदर्भ वाढला आहे, असे मत पुणे विद्यापीठात आयोजित कार्यशाळेत व्यक्त करण्यात आले.

प्रगत संस्कृत अध्ययन केंद्रातर्फे 'संस्कृत फॉर इनोव्हेशन' या विषयावर कार्यशाळा घेण्यात आली. प्रभारी कुलगुरू रत्नाकर गायकवाड यांच्या उपस्थितीत तिचे उद्घाटन करण्यात आले. ज्येष्ठ अभ्यासक पं. सत्यव्रत शास्त्री, भगवान जोशी आदींनी उद्घाटनाच्या दिवशी विचार व्यक्त केले. केंद्राचे प्रमुख डॉ. वसिष्ठ झा यांनी प्रास्ताविक केले.

संगणक, तंत्रज्ञानाच्या युगात संस्कृतसारख्या प्राचीन भाषेचे काय स्थान, असा सवाल उपस्थित करण्यात येत आहे. त्याचा संदर्भ देऊन पं. शास्त्री म्हणाले की, तंत्रज्ञानाच्या संज्ञा समाजाच्या सर्व स्तरापर्यंत पोहोचत नाहीत. त्यामुळेच पारिभाषिक शब्दकोश ही काळाची गरज आहे. नवनवीन शब्दसंपदा तयार करणे हे संस्कृत भाषेचे बलस्थान आहे. त्यामुळे पारिभाषिक कोशासारख्या कार्यात संस्कृतच्या योगदानाला अनन्यसाधारण महत्त्व आहे.

भारतीय गणिताने जगाल नवीन दृष्टी दिली. यापुढील काळात संस्कृतसारखी प्राचीन, संस्कृतीवर आधारित भाषा हे कार्य करेल, असा विश्वास जोशी यांनी व्यक्त केला. संस्कृतसारख्या विषयामधील संशोधनाला नवीन दिशा सापडण्यासाठी अशा प्रकारच्या कार्यशाळा उपयुक्त ठरतील, असे मत प्रभारी कुलगुरू गायकवाड यंनी व्यक्त केले.

## * टिळकांच्या ग्रंथांचा इंग्रजीत अनुवाद

लोकमान्य टिळकांच्या शतकोत्तर सुवर्णजयंतीनिमित्त त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर प्रकाश टाकण्यासाठी त्यांच्या विविधांगी लेखनाचा इंग्रजी अनुवाद करण्याचे काम टिळक स्मारक ट्रस्टच्या वतीने सुरू आहे. अर्थतज्ज्ञ, शिक्षणतज्ज्ञ आणि कृषितज्ज्ञ टिळक नेमके कसे होते हे समजण्यास त्यामुळे मदत होईल, असे ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. दीपक टिळक यांनी सांगितले.

लोकमान्यांच्या दीडशेव्या जयंतीनिमित्त 'टिळक आणि भारतीय विद्या' यावर एक स्वतंत्र चर्चासत्र होत आहे, असे सांगून डॉ. टिळक म्हणाले की, लोकमान्यांनी अनेक विषयांवरील संशोधन मराठीत केल्याने ते इंग्रजीत करणे आवश्यक आहे.

शेतकरी केंद्रस्थानी ठेवून भारतीय अर्थशास्त्राबद्दल विचार मांडणारे ते तेव्हाचे एकमेव राजकीय पुढारी होते. याशिवाय राष्ट्रीय शिक्षणाबाबत त्यांचे विचार यापूर्वी डॉ. चित्रा नाईक यांनी पुस्तकरूपात आणले आहेत. लंडनमधून हाती आलेल्या सिक्रेट डॉक्युमेंटचा आधार घेऊन ब्रिटिशांच्या दृष्टिकोनातून लोकमान्यांचे चित्रण



प्रसिद्ध इतिहासतज्ज्ञ डॉ. जे. व्ही. नाईक यांनी केले आहे. ते पुस्तकही इंग्रजीतून ट्रस्टतर्फे नुकतेच प्रकाशित करण्यात आले. याशिवाय यंदाच्या लोकमान्यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त पुणे आकाशवाणी केंद्रावर आयोजित करण्यत आलेल्या व्याख्यानमालेवर 'टिळकांचे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व' हे पुस्तकही प्रकाशित होत आहे. 'रेव्होल्यूशनरी महाराष्ट्र' या डॉ. वा. द. दिवेकर यांनी लिहिलेल्या इंग्रजी पुस्तकाचे प्रकाशन एक ऑगस्टला 'इस्रो'चे संचालक माधवन नायर यांच्या हस्ते होणार आहे. दिवेकर यांचे 'लोकमान्य टिळक इन इंग्लंड' हे पुस्तकही ट्रस्टच्या वतीने यापूर्वी प्रकाशित करण्यात आले होते, असे डॉ. टिळक यांनी सांगितले.

## * 'प्राचीन साहित्याचा आधार शिल्पांच्या अभ्यासास पूरक'

शिल्पांच्या अभ्यासासाठी केवळ शिल्पशास्त्र आधारभूत न मानता उपलब्ध प्राचीन साहित्याचाही अभ्यास आवश्यक आहे, असे मत प्रसिद्ध फ्रेंच शिल्प अभ्यासक प्रा. पिअरी सिल्व्हेन फिलिओझा यांनी व्यक्त केले.

भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिराच्या वतीने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

'संस्कृत साहित्याच्या प्रकाशात कर्नाटकमधील मंदिरांचा अभ्यास' या विषयावर प्रा. फिलिओझा यांनी विचार मांडले. हा विषय त्यांनी विविध शिल्पांच्या प्रकाशचित्रांच्या सहाय्याने स्पष्ट केला. संस्थेचे मानद सचिव डॉ. मो. गो. धडफळे यांनी प्रास्ताविक व स्वागत करून प्रा. फिलिझोआ यांचा परिचय करून दिला.

प्रा. फिलिओझा यांनी कर्नाटक तसेच कंबोडिया येथील प्राचीन मंदिरांतील विविध शिवमूर्तींची उदाहरणे दिली. "नटराज रूपातील शिवमूर्तींची मापे जुन्या संस्कृत ग्रंथात जशी दिली आहेत त्या मापांशी जुळतात," असे निरीक्षण नोंदवून ते म्हणाले, "सदाशिवाच्या मूर्तीचे ईशान, सत्पुरुष, अघोर, वामदेव आणि सद्योजात असे पाच प्रकार 'संगीतरत्नाकर' ग्रंथात सांगितलेले दिसतात. पंचमुखी शिव मृदंग वाजवत आहे, अशी सोळाव्या शतकातील मूर्ती, तर ग्रंथ वाचूनच घडवली असावी इतके साम्य आहे.

## * कीर्ती शिलेदारांचा मुक्त संवाद

संगीत नाटकाची गोडी कायम ठेवूनही काळाप्रमाणे बदलण्याचा प्रयत्न आम्ही केला आहे. पण नवीन जे करतो ते प्रयत्न पाहायला मात्र टीका करणारे येत नाहीत. त्यांचे कोरडे उपदेश पचनी पडणारे नाहीत, असे परखड प्रतिपादन संगीत रंगभूमीवरील ज्येष्ठ अभिनेत्री-गायिका कीर्ती शिलेदार यांनी केले.

'आशय सांस्कृतिक'तर्फे शिलेदार यांच्या गप्पांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. मानसी मागीकर यांनी त्यांच्याशी संवाद साधला. "संगीत नाटक करणे हा आमचा आनंद आहे. तो आम्ही गमावलेला नाही. पारंपरिक नाटके

सातत्याने करणे, नवी नाटके निर्माण करणे, नवे लेखक-नवे कलाकर तयार करणे सुरू आहे. मात्र कान बधीर करणारे संगीत लोकांना आवडू लागले आहे, याची खंत वाटते,'' असे त्या म्हणाल्या.

''संगीत नाटक म्हणजे कीर्तनकारांची परंपरा आहे. ते एक माध्यम आहे आणि कृत्रिम आहे, हे लक्षात घेऊन या परंपरेकडे पाहिले पाहिजे,'' असे सांगून त्या म्हणाल्या, ''एकच प्याला नाटकातील सिंधूच्या दु:खाला हसणारे प्रेक्षक पाहिले की मनाला वेदना होतात. अर्थात, नाटकाचा भाव आणि गती टिकवणे ही कलाकारांची जबाबदारी असते.''

संगीत नाटकाचा वारसा जन्मजात असला, तरी प्रत्यक्षात समर्थ गुरू लाभल्यानेच या माध्यमात सहजतेने वावरता आले. आई, नाना (जयमाला व जयराम शिलेदार), पंडित नीलकंठ अभ्यंकर असे गुरू मिळाले. त्यांच्या मार्गदर्शनाने रंगभूमीवरील हालचालींचा मोकळेपणा आला. वेगवेगळ्या छटांच्या भूमिका करता आल्या. गडकरी, खाडिलकर, देवल, खानोलकर अशा भाषाप्रभूंच्या नाटकांचे संस्कार लाभले. दाक्षिणात्य संगीत ऐकताना तान तयार झाली. गाण्यात, अभिनयात भावना कशी निर्माण करावी, विरामातून अर्थच्छटा कशा बदलाव्यात हे शिकता आले. संगीत नाटक करण्याचा आनंद इतका मोठा होता, की भालजी पेंढारकर, राज खोसला अशा मान्यवरांच्या चित्रपटांच्या 'ऑफर्स' मी नाकारल्या.

### * युरोपीय मराठी संमेलनात 'आश्ना'चे प्रकाशन

हॉलंडमधील आल्मेलो येथे २८ ते ३० जुलैदरम्यान सहाव्या युरोपीय मराठी संमेलनात पुण्यातील प्रसिद्ध निवेदिका मंजिरी धामणकर यांच्या 'आश्ना: उर्दू शायरीची मराठी सखी' या पुस्तकाचे प्रकाशन झाले.

पुस्तकाच्या धामणकर यांनी त्यांना आवडलेल्या निवडक शेरांचे मराठी भाषांतर केले आहे. पुस्तकाच्या शीर्षकाविषयी त्या म्हणाल्या, '''आश्ना' म्हणजे स्नेही किंवा परिचित. उर्दू शायरांनी विविध 'शेर'मधून व्यक्त केलेल्या उत्कट भावनांची खुमारी मी अनुभवली. केवळ उर्दू भाषा येत नाही म्हणून या आनंदापासून दूर राहिलेल्या मराठी रसिकांसाठी हे भाव मराठीतून व्यक्त करावेत, असे वाटले. अर्थात हे भाषांतर मूळ शेरप्रमाणे वृत्तबद्ध नाही. ते लयबद्ध गद्य आहे. उर्दू भाषेच्या व्याकरणाची जुजबी तोंडओळखही करून देण्याचा प्रयत्न आहे. पुस्तकासाठी मेधा खासगीवाले यांनी रेखाचित्रे काढली आहे. ज्येष्ठ संगीतकार यशवंत देव यांची प्रस्तावना आहे.''

### * अमेरिकी मुलांसाठी भारतीय 'सुपरहिरो'

भारतीय देवतांकडे असलेल्या अद्भुत शक्तींनी पाश्चिमात्य देशांतील मुलांनाही भुरळ पाडली असून, भारतीय ॲनिमेटर देवदेवतांना डिजिटल स्वरूपात परदेशात



नेण्याच्या तयारीत आहेत. 'भारतीय सुपरहिरो' ॲनिमेटेड कादंबऱ्या आणि पुस्तकांच्या स्वरूपात परदेशातही करामती दाखवण्यास सज्ज झाले आहेत. त्यामुळे हिंदी आणि इंग्रजीसह सात प्रादेशिक भाषांत प्रदर्शित होऊन बच्चे कंपनीचा पहिला भारतीय 'हिरो' बनलेला हनुमान चित्रकथांद्वारे अमेरिका आणि युरोपमध्येही पोहोचणार आहे.

चित्रकथांच्या स्वरूपातील पुस्तके आणि कादंबऱ्यांची निर्मिती होत आहे. देवदेवता आणि दैत्यांचेही डिजिटल स्वरूपात सादरीकरण होणार असून हनुमान, शक्ती, देवी, पृथ्वी, आकाश यांसारख्या पौराणिक कथांमधील संकल्पना कथेतून मांडल्या जाणार आहेत. चित्रकथांद्वारे भारतीय संस्कृती आणि समृद्ध वारसा परदेशात पोहोचण्यास मदत होईल.

भारतीय सुपरहिरोंच्या करामतींनी अमेरिकी आणि युरोपीय मुलेही आकर्षित झाली असून भारतासह उत्तर अमेरिका, लॅटिन अमेरिका, युरोप आणि आशियातही पुस्तकांचे वितरण.

तुफान प्रसिद्धी मिळविलेले 'स्पायडरमॅन' आणि 'बॅटमॅन' यांच्याशी स्पर्धा.

जागतिक पातळीवरील वाचकांना आणि श्रोत्यांना डोळ्यांसमोर ठेवून मांडणी आणि रचना केली जात आहे.

### * महाराष्ट्र तत्त्वज्ञान परिषदेतर्फे आवाहन

'महाराष्ट्र तत्त्वज्ञान परिषदे'तर्फे दरवर्षी 'विश्वनाथ विनायक ओक स्मृतिनिबंधस्पर्धा' हा उपक्रम राबवण्यात येतो. संतांच्या तत्त्वज्ञानाची जी सामाजिक फलश्रुती आहे, त्यावर विचारमंथन व्हावे, हा त्यामागील हेतू आहे.

विश्वनाथ विनायक ओक स्मृतिनिबंधस्पर्धा 'संत गाडगेमहाराज : विचार व कार्य' या विषयावर घेण्याचे ठरविले आहे. सदर निबंधस्पर्धा विनाशुल्क असून सर्वांसाठी खुली आहे. निबंध संशोधनात्मक, चिकित्सक आणि यापूर्वी प्रकाशित न झालेला असावा. मराठी भाषेतील निबंधाची मर्यादा चार ते पाच हजार शब्दांपर्यंत आहे. सुवाच्य अक्षरात कागदाच्या एकाच बाजूला लिहिलेला आपला निबंध ३१ ऑगस्ट, २००६ अगर तत्पूर्वी संयोजकांना पुढील पत्त्यावर पोहोचणे आवश्यक आहे. प्रा. शर्मिला वीरकर. द्वारा, सुधा रमाकांत मुळे, १७, अमोघ सोसायटी, 'चंद्रमुखी'जवळ तळेपाखाडी, एक्सर रोड, बोरिवली (पश्चिम) मुंबई - ४०००९१ (दूरध्वनी क्र. २८९५७०३९) निबंधाच्या दोन प्रती पाठवणे आवश्यक आहे. स्पर्धेचा निकाल ऑक्टोबरअखेरीस जाहीर केला जाईल. उत्कृष्ट ठरणाऱ्या पहिल्या दोन निबंधांना अनुक्रमे रु. ५००/- आणि रु. ३००/- अशी पारितोषिके व प्रशस्तिपत्रक दिले जाईल. माननीय परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील. याबाबत पुन्हा पत्रव्यवहार केला जाणार नाही. ❒

## लवकरच.....

# परमवीर चक्र

रणांगणावरील आपले
महान योद्धे

**मेजर जनरल इयान कारडोझो**
**अनु. ज्योत्स्ना लेले**

**किंमत १८०रु.**
**पोस्टेज २५रु.**




युद्ध हे जरी राष्ट्राने हाती घेतलेल्या राजनीतीचे पुढचे पाऊल असले तरी, रणधुमाळीत तोलले जाते ते सैनिकांचे नशीब!

युद्धातील सर्व आव्हाने अंगावर झेलून, अत्यंत प्रतिकूलतेतूनही मार्ग शोधून, अशक्यप्राय वाटणारा विजय खेचून आणणारे आपले भारतीय सैनिक.

त्यांची जडणघडण, ध्येयधारणा, निर्भिडता आणि कर्तृत्व याचा सर्वंकष वेध घेणारा हा गौरवग्रंथ.....

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**

दखल

## श्याम भुर्के - क्लार्क ते साहित्यिक



बँकिंग क्षेत्र म्हटले की, किचकट हिशोब, आकड्यांचे जंजाळ आणि फायलींचा डोंगर! या चाकोरीतून काम करताना विनोदबुद्धी बाजूला ठेवून चेहऱ्यावर गंभीर भाव आणावा लागतो. कालांतराने त्याची एवढी सवय लागते की मूळ स्वभाव विसरला जातो. मात्र, स्वीकारलेला करिअरचा मार्ग कितीही कंटाळवाणा असला, तरी त्याला सृजनशीलतेची छटा दिल्यास कंटाळवाणे कामही आनंददायी होत असते. नव्याने कोणत्याही क्षेत्रात येणाऱ्या तरुणांनी या तत्त्वाची कास धरली, तर जीवनातील आनंदाचा अत्युच्च शिरोबिंदू गाठायला वेळ लागत नाही. याची प्रचिती या क्षेत्रात काम करणारे श्याम भुर्के यांच्या उदाहरणातून मिळते!

बँक अधिकारी, साहित्यिक, कलावंत आणि वक्ता अशा चौरंगी भूमिकेत वावरणारे हे अवलिया व्यक्तिमत्त्व. अधिकारी पदावर ध्येयवादी वृत्तीने काम करत त्यांनी अन्य क्षेत्रांशी मैत्रीचे धागे जुळवले.

मूळचे साताऱ्याचे असलेले भुर्के यांचे शालेय शिक्षण सातारा नगरपालिकेच्या न्यू इंग्लिश स्कूल शाळेत झाले. कॉलेजमध्ये गेल्यावर त्यांच्यातील कलावंत जागा झाला. ते नाटकांत काम करू लागले. १९६८ मध्ये त्यांची बँक ऑफ महाराष्ट्रमध्ये क्लार्क म्हणून निवड झाली आणि नाटक, कवितांचा प्रांत सोडून त्यांना साताऱ्यात रेहमतपूरमधील बँकेच्या शाखेत रुजू व्हावे लागले.

अधिकारी पदाची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर भुर्के यांची नेमणूक कोल्हापूरमधील लक्ष्मीपुरा येथील शाखेत व्यवस्थापक म्हणून झाली आणि त्यांच्यातील साहित्यिक मन उफाळून आले. अधिकारी म्हणून बँकेचा विकास करण्याबरोबरच साहित्यिकांशी जवळीक साधण्याची त्यांची हातोटी वाखाणण्याजोगी म्हणावी लागेल. वि. स. खांडेकर यांना 'ज्ञानपीठ पुरस्कार' मिळाला आणि खांडेकरांच्या साहित्याचे गुणगान गायले जाऊ लागले. मात्र, भुर्के यांच्या डोक्यात ज्ञानपीठ पुरस्काराची रक्कम घोळत होती. ही रक्कम आपल्याच बँकेत ठेव म्हणून यायला पाहिजे, यासाठी त्यांनी खटाटोप सुरू केला. त्यांच्या प्रयत्नांना यश आले आणि खांडेकरांनी तब्बल ५० हजार रुपये महाराष्ट्र बँकेत ठेवले.

बँकेत नोकरी करत असतानाच त्यांनी सामाजिक भान राखले होते. त्यासाठी त्यांनी काही वैशिष्ट्यपूर्ण उपक्रम राबवले. त्यात 'टोळी फायनान्स' ही आगळीवेगळी योजना म्हणता येईल. कोल्हापूर आणि परिसरात ऊस तोडणीसाठी अनेक मजूर येत असत. त्यांना पैशाची गरज असायची. त्यांच्या गटाला टोळी म्हटले जायचे म्हणून त्यांच्यासाठी 'टोळी फायनान्स' ही योजना सुरू करून त्यांना कर्जपुरवठा करण्यात आला.

बँकेच्या माध्यमातून समाजाशी नाळ जुळवत असताना भुर्के यांनी लिखाणकाम सुरू ठेवले आहे. 'सभेत कसे बोलावे', 'मंत्र श्रीमंतीचा', 'पुणं एक साठवण', खुमासदार अत्रे', 'बँकेत शेखर सुमन' ही पुस्तके लिहिली आहेत. सध्या ते बँकेच्या कर्मचारी प्रशिक्षण महाविद्यालयाच्या प्राचार्यपदाची धुरा सांभाळत आहेत. बँकेत नोकरी करत विविधांगी कलागुण जोपासणारे भुर्के यांचे व्यक्तिमत्त्व करिअर करण्यासाठी धडपड करणाऱ्या तरुणांना नक्कीच मार्गदर्शक ठरेल.

**सौजन्य- महाराष्ट्र टाइम्स (२१ जुलै)**

❒



# थॉट लीडर्स

श्रीनिवास पंडित

**अनु. सुप्रिया वकील / विलास वाडकर**

**३००रु.**

**पोस्टेज ३०रु.**




भारतातील २२ द्रष्ट्या, उद्योगपतींच्या व्यवस्थापकांच्या कार्याचा आलेख. या अधिकारी व्यक्तींना असं खास स्थान कशामुळे मिळालं, यांच्या जीवनाला कलाटणी देणारी महत्वपूर्ण वळणं, प्रेरक ठरलेले घटना-प्रसंग, या सर्वांतून सुरू झालेला त्यांच्या नेतृत्वाचा प्रवास, त्याचीच ही प्रेरक यशोगाथा

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**




**पुस्तक परिचय**

# दोन ध्रुव

**भाऊसाहेब खांडेकर यांची एक खूप नावाजली गेलेली कादंबरी**

## वि. स. खांडेकर

दोन ध्रुव ही भाऊसाहेब खांडेकर यांची एक खूप नावाजली गेलेली कादंबरी १९३४ साली म्हणजे सुमारे ७२ वर्षांपूर्वी ती प्रथम प्रकाशित झाली.

नवरा-बायको यांच्यात दोन ध्रुवाचे अंतर असले तर?

त्यांचे वैवाहिक जीवन यशस्वी किंवा सुखावह होण्याचा संभव एकूण कमीच!

आता हे दोन ध्रुवाचे अंतर म्हणून जे काही आहे, ते खरोखर भौगोलिक दृष्टीने प्रचंड असले तरी मानसिक पातळीवर कितपत प्रचंड असते?

वि. स. खांडेकर आपल्या 'दोन ध्रुव'चा कादंबरीत हे मानसिक अंतर प्रचंड असल्याचे गृहीत धरून, रमाकांत-वत्सला या दांपत्यातील दुरावा स्पष्ट करीत आपल्या कादंबरीचा प्रारंभ करतात.

रमाकांत लग्नानंतर आपल्या पत्नीला जवळून बघतो. कोकणातल्या मजुरांच्या बायका परळवर दिसतात, त्यात सहज खपून जाईल अशी काळीसावळी स्त्री बघून रमाकांतच्या मनाला मोठा धक्का बसतो. तो स्वत: कलावंत-लेखक-कथाकार. त्याला कला आणि सौंदर्य हे आपले जीवन वाटते. आणि वत्सलेचा काळासावळा वर्ण बघून त्याला तिच्याबरोबर जन्म घालवण्यापेक्षा जीव दिलेला काय वाईट असे वाटते. ही धर्मपत्नी म्हणजे पायातली बेडी वाटते. एक पुरुष म्हणून आपण ही बेडी एका क्षणांत तोडू शकतो, अशी त्याची ठाम धारणा. ''तू काय केलं आहेस ते आरशाला विचार. तुझ्या साऱ्या पापांचा पाढा तो वाचील...'' असे तो तिला म्हणतो. मुलगी सावळी आहे असे आपल्या पोलीसखात्यात काम करणाऱ्या वडिलांनी सांगितले आणि रमाकांतने वत्सलेला न पाहताच, त्या काळातील सर्वसामान्य रिवाजाप्रमाणे लग्नाला संमती दर्शविली.



प्रत्यक्षात वत्सलेला बघितल्यावर त्याच्या कलाप्रेमी रसिकमनाला तिचा वर्ण आणि तिचे सौंदर्य अपेक्षाभंग करणारे, भ्रमनिरास करणारे वाटले. तिच्यात आणि आपल्यात दोन ध्रुवांचे अंतर आहे असे वाटले आणि या दोन ध्रुवाचे मीलन होणे अशक्यप्राय वाटले.

> **सत्तर-ऐंशी वर्षांपूर्वी वडीलधारी मंडळीच लग्न ठरवत आणि लग्नानंतरच पतिपत्नींना एकत्र येण्याची संधी मिळे- हे सामाजिक वास्तव लक्षात घेऊन, खांडेकरांनी आपल्या नायकाचा हा जो भ्रमनिरास झाला, त्याचे स्वरूप उघड केले आहे.**

मुलीला प्रत्यक्ष न पाहताच लग्नाला होकार देणे हे आज एकविसाव्या शतकात आपल्याला आश्चर्यकारक वाटेल; पण सत्तर-ऐंशी वर्षांपूर्वी वडीलधारी मंडळीच लग्न ठरवत आणि लग्नानंतरच पतिपत्नींना एकत्र येण्याची संधी मिळे– हे सामाजिक वास्तव लक्षात घेऊन, खांडेकरांनी आपल्या नायकाचा हा जो भ्रमनिरास झाला, त्याचे धगधगीत स्वरूप उघड केले आहे. वत्सला ही काळीसावळी आहे म्हणून त्याच्या सौंदर्याच्या कल्पनेत ती त्याज्य ठरते. तिच्या नाकीडोळी नीटस असण्याची मातबरी त्याला तिच्या वर्णापुढे तुच्छ वाटते असे खांडेकरांना वाटते का?

त्यातच भरीला भर म्हणजे सुरंगाचे गाणे आणि सुलोचनेची चित्रकला या दोहोंचे त्याला भयंकर आकर्षण आहे. वत्सलामध्ये गायन व चित्ररेखाटन यासारख्या कलांचाही अभावच आहे. साप्ताहिकाच्या कचेरीत भेटलेली चित्रकार सुलोचना ही त्याला रंभा वाटते. ब्रह्मदेवानं स्फूर्तीनं घडवलेली तिची मूर्ती बघून वत्सलेलाही वेड लागेल असे रमाकांत म्हणतो. त्या रंभेपुढे वत्सला म्हणजे कुब्जा– सौंदर्यलाभ हा जीवनाचा हेतू असे रमाकांतचे मत.

सुलोचनाप्रमाणेच सुरंगा. त्याच्या पहिल्या नाटकात काम करणारी नायिका. अभिनेत्री. तिच्याबद्दलही त्याला आकर्षण वाटतं. तिच्या भूतकाळाची कल्पना त्याला नाही. त्याच्या नाटकाची नायिका म्हणून रंगीत तालमी बघायला तो जातो.

रमाकांतच्या डायरीतून त्याची 'सौंदर्यासक्ती'ची ओढ वेगवेगळ्या स्वरूपात कशी आविष्कृत होते हे लक्षात येते. नाटके व सिनेमा बघून काळ्या व कुरूप व्यक्तींविषयी त्याला तिटकारा वाटतो. मुलांच्या शाळेतली अधिक पगाराची नोकरी सोडून तो मुलींच्या शाळेत कमी पगारावर काम करणे पसंत करतो. 'विशुद्ध सौंदर्यदृष्टीचे पोषण करण्यासाठी, मुलींचा वर्ग म्हणजे सुंदर फुलबागच! आपल्या सौंदर्यदृष्टीचे पोषण होण्यासाठी मुलींपेक्षाही कलाचतुर तरुणींचा सहवास अधिक उपयुक्त– हेही आता रमाकांतला जाणवू लागलेले आहे. शेणकाच्या घरात कुडाळदेशकराची मुलगी करून घेण्याचा बाबांचा निर्णय म्हणजे बापाच्या पापाचे

**सौंदर्याची सुंदर चित्रे रेखाटणाऱ्या कथालेखकाला न शोभणारी ही जोडी. आपण कलासंपन्न, प्रतिभावान, रसिक; तर ही अरसिक, कलाहीन, सातवीपर्यंत शिकलेली, काळीसावळी...**

मुलीला प्रायश्चित्त असे रमाकांतला वाटते. वत्सलेशी लग्न तर झाले; पण कोणी राजाला कोळसा नजर केला म्हणून राजा त्या कोळशाला आपल्या मुकूटात स्थान देतो असे नाही. ब्राह्मणात जन्माला आली आणि बाबांची कृतज्ञता जागी झाली म्हणून दहाजणींसारखी दिसणारी ही काळीसावळी मुलगी आपली बायको झाली... सौंदर्याची सुंदर चित्रे रेखाटणाऱ्या कथालेखकाला न शोभणारी ही जोडी. आपण कलासंपन्न, प्रतिभावान, रसिक; तर ही अरसिक, कलाहीन, सातवीपर्यंत शिकलेली, काळीसावळी... अक्षता टाकल्या म्हणून अशी दोन भिन्न प्रकृतीची माणसे एकरूप होऊ शकतील का? अशी रमाकांतची विचारसरणी. हे सगळे वत्सलेला सांगून कळेल असे त्याला वाटत नाही. म्हणून तो ते एका वहीत लिहून ती वही वत्सलेला देतो... वत्सला ती वाचते आणि आपल्याला रमाकांतच्या जीवनात स्थान नाही, हे सत्य स्वत:च्या गळी उतरवते. 'या फुलावरून त्या फुलावर उडत जाणाऱ्या फुलपाखरासारखा रमाकांतचा स्वभाव तर दिव्यावर झेप घालून जळून जाणाऱ्या पतंगासारखा आपला मनोभाव...' हे तिला कळून चुकते (३२).

त्याचवेळी तिच्या वाचनात वृत्तपत्रातील एक जाहिरात येते. कामापूरच्या काजूच्या कारखान्यातल्या काजूंची निर्यात परदेशातही होत असते. काजू हाताने फोडण्यासाठी पाचशेवर कामगार ठेवूनही मागणी पूर्ण करता येत नाही; म्हणून काजू फोडणारे यंत्र तयार करण्यासाठी पाच हजार रुपयांचे बक्षीस कारखान्याने जाहीर केलेले असते... संशोधकांनी आपली कन्या सुलोचना हिच्याशी मुंबईत संपर्क साधावा असेही नमूद केलेले असते... असे यंत्र तयार करण्यासाठी पाच हजार रुपयांचे बक्षीस कारखान्याने जाहीर केलेले असते... संशोधकांनी आपली कन्या सुलोचना हिच्याशी मुंबईत संपर्क साधावा असेही नमूद केलेले असते... कारखान्याचे मालक दादा... असे यंत्र मिळाले की बऱ्याच कामगारांना कमी करून जास्त फायदा मिळवण्याचे मनोरथ रंगवत असतात... दादांनी पत्नीच्या ऐन तिशीत झालेल्या मृत्यूनंतरही पुन्हा लग्न करण्याचे टाळलेले असते. सावत्र आई मुलीचा, सुलोचनेचा जाच करील, अशी त्यांची भावना असते (५०).

हे आव्हान स्वीकारून विद्याधर हा तरुण संशोधक सुलोचनाला भेटतो. ती त्याला घेऊन कामापूरला येते. काजू फोडण्याच्या प्रक्रियेचे निरीक्षण-विश्लेषण



करण्यासाठी तो त्या प्रक्रियेच्या वेगवेगळ्या टप्प्यांची छायाचित्रे घेतो. त्याच्या मुक्कामाच्या स्थळी चहापाण्याची व्यवस्था बघण्याचे काम कृष्णा या तरुणीकडे येते. ही कृष्णा म्हणजे वत्सला. ती या कारखान्यात नाव बदलून काम करण्यासाठी आपले घर सोडून येते. काशी नावाच्या बाईकडे राहते. काजू फोडण्याच्या प्रक्रियेची छायाचित्रे घेण्यासाठी मॉडेल म्हणून विद्याधर तिचाच वापर करतो. त्यामुळे विद्याधर आणि वत्सला यांचा परिचय दृढावत जातो.

**गोष्टीतील नायिका शांता लग्नापूर्वी पतीला देव मानत असते; पण लग्नानंतर तिला इतके कटू अनुभव येतात की ती विधवा झाल्यावर लिहिते... पतीच्या निर्दय वर्तनाने तिचा जीव अर्धमेला झाला आहे.**

इकडे रमाकांत बेळगावला नाटक कंपनीच्या रंगीत तालमी बघण्यासाठी सुरंगा आणि सुलोचना यांना घेऊन येतो. सुरंगाच्या अभिनयावर तो खूष असतो. सुलोचनाच्या चित्रकलेवरही तो फिदा असतो. त्याच्या कथांना ती चित्रे काढून देत असते.

नाटकाचा प्रयोग अप्रतिम होतो. सुरंगा म्हणते, ''परिसाचा स्पर्श झाला की लोखंडाचे सोने होते.'' रमाकांत प्रेमाने तिला जवळ घेतो.

काजू कारखानदार दादा यंत्राच्या शोधाबाबत जसे प्रयत्नशील असतात, तसेच आपल्या कारखान्याच्या विषयी माहितीपूर्ण पुस्तिका तयार करण्याचीही त्यांची योजना असते. त्यासाठी सुलोचनाच्या शिफारशीवरून ते रमाकांतकडे ते काम सोपवून त्याला कामापूरला येण्याचे आमंत्रण देतात. सुलोचनाला त्यासाठी लक्ष्मीचे एक सुंदर चित्र काढण्यासही ते प्रवृत्त करतात... कामापूरची जत्रा त्याच सुमारास जवळ आलेली असते... त्या भागातील गांधीवादी कार्यकर्ते बाप्पा हे अहिंसावादी. ते रेडा बळी देण्याच्या प्रथेविरुद्ध आंदोलन उभारतात. सर्वसामान्य जनता त्यामुळे अस्वस्थ असते...

रमाकांत, सुलोचना व सुरंगा आंबोली या निसर्गरम्य स्थळी जाऊन दादांचा पाहुणचार घेतात. रमाकांतच्या वाचनात त्याचवेळी वत्सलाच्या मृत्यूची बातमी तिच्या मामाने दिल्याचे वृत्त येते. सांगलीला ताप येऊन तिला देवाज्ञा झाल्याचे त्या बातमीत म्हटलेले असते. (पृष्ठ ६२) त्याच बातमीच्या वर कृष्णा या लेखिकेची एक गोष्ट असते. त्या गोष्टीतील नायिका शांता लग्नापूर्वी पतीला देव मानत असते; पण लग्नानंतर तिला इतके कटू अनुभव येतात की ती विधवा झाल्यावर लिहिते... पतीच्या निर्दय वर्तनाने तिचा जीव अर्धमेला झाला आहे. तिला वैधव्य हा पुनर्जन्मच वाटतो... ही कथा वाचून रमाकांतच्या मनात वत्सलेचा

**कला व सौंदर्य हे मानवी जीवनाचे नुसते अलंकार आहेत; पण जीवनाचा आत्मा प्रेम हाच आहे. कला आणि सौंदर्य यांच्याशिवाय ज्याचे पान हलत नाही, ते प्रेम नव्हे, तो उपभोग आहे...**

विचार येतो आणि ती तापाने नाही मेली, आपण तिचा खून केला असे त्याचे एक मन त्याला खडसावते. त्याने त्या खुनासाठी वापरलेली हत्यारे म्हणजे कला आणि सौंदर्य... कला व सौंदर्य हे मानवी जीवनाचे नुसते अलंकार आहेत; पण जीवनाचा आत्मा प्रेम हाच आहे. कला आणि सौंदर्य यांच्याशिवाय ज्याचे पान हलत नाही ते प्रेम नव्हे, तो उपभोग आहे... निव्वळ सुसंस्कृत उपभोग आहे'' असे त्याला जाणवते (६३).

वत्सलाच्या मृत्यूची ही बातमी चुकीची असल्याचा आणि आपण ती कधीच दिलेली नव्हती, असा खुलासा मामा देतो. मामाचे पत्र मुंबईचा शिक्का खाऊन बेळगावला आलेले असते. त्यात वत्सला माझ्याकडे आलीच नव्हती... वत्सलेच्या मृत्यूची बातमी आपण कुठेही दिलेली नव्हती, असे डॉक्टर मामाने स्पष्ट केलेले असते... (पृष्ठ १७१).

वत्सला आता कुठे असेल? असा प्रश्न रमाकांतला पडतो. मधल्या काही महिन्यांच्या काळात सुरंगाबद्दलचे त्याचे प्रेम ओसरू लागलेले असते. तिच्या पूर्वजीवनाची माहिती त्याला कळते. ती एका वेश्येची मुलगी... सावळ्या हा दारुड्या तिचा नवरा. सात वर्षांची शिक्षा भोगून तो तुरुंगातून सुटून आल्यावर सुरंगाला ब्लॅकमेल करतो. सुरंगाचा सोन्या हा मुलगा दादांपासून झालेला असतो; त्याला तिने काशीकडे ठेवून आपले नाट्यजीवन अबाधित ठेवलेले असते.

सुलोचनाही रमाकांतपासून दूर होत विद्याधरच्या जवळ जात राहते. विद्याधरला फुरसे चावल्यावर वत्सला त्याची शुश्रुषा करते; पण त्याचा ओढा सुलोचनाकडे आहे हे तिला जाणवत राहते...

तशात विद्याधरला काजू फोडण्याच्या यंत्राचे डिझाइन करण्यात यश येते... परंतु ते यंत्र वापरात आणले तर कामगार बेकार होतील म्हणून त्याचे कागदपत्र गायब करण्याची गळ वत्सला विद्याधरला घालते. भाऊबीजेची ओवाळणी म्हणून ती यंत्राचे कागदपत्र मागते. पाचशे लोकांचे जीवन मी मागते आहे असे ती म्हणते. तर लक्ष्मीचे जे चित्र सुलोचनाने काढलेले असते त्यावर स्वत: दादाच रेघोट्या ओढून ठेवतात. का? तर लक्ष्मीचा चेहरा सुरंगासारखा दिसतो. हा चेहरा आपण केलेल्या अनाचाराची सारखी आठवण देत राहील, अशी टोचणी त्यांना लागते. बाप्पा रेड्याला वाचवू पाहतात, अंधश्रद्धेविरुद्ध लढू पाहतात, पण तो रेडा त्यांनाच घायाळ करतो तेव्हा त्यांना दवाखान्यात दाखल व्हावे लागते.



त्यांचे आंदोलन फसते. सुलोचना यंत्राचे कागद आणायला विद्याधरकडे जाते, तर विद्याधर ते चोरीला गेल्याचे सांगतो. ती त्याच्या ट्रंकेचे कुलूप काढून बघते. आत कृष्णाचे (वत्सलाचे) फोटो दिसतात. त्यामुळे तिच्या मनातला मत्सर जागृत होतो. ती त्याच्याकडे तिरस्काराने बघते आणि तेथून निघून जाते. काशीही कृष्णा आणि विद्याधर यांच्या जवळिकीची हकीकत सांगते. ती लक्ष्मीच्या चित्राचे तुकडे तुकडे करते... सुरंगाला देवी येते. देवीची गावात साथ असूनही ती टोचून घेत नाही... तिची देखभाल करावी लागते.

**बापाच्या पैशावर चैन करायची आणि बापावर उलटायचं! हेच अलीकडचं शिक्षण! देव नको, धर्म नको. पाहिला खोंडा आणि हुरळली कालवड. रात्री नऊ वाजेपर्यंत वाटेल तिथं रहायला लाज नाही वाटत.**

बाप्पा बाहेरगावी, दादा उदासीन, विद्याधर लबाड ठरलेला. अशा स्थितीत सुलोचना रमाकांतशी मन मोकळे करते. तिच्या मनातली अढी दूर होते... दीपमाळेजवळ गप्पा मारत असताना वत्सला तेथे येते. रमाकांत तिच्या खांद्यावर हात ठेवतो. ती सुखावते. आपल्या कथेचे हस्तलिखित कागद त्याला देते... पुस्तकाला प्रस्तावना देण्याची विनंती करते. चार महिने काजू कारखान्यात काम करून वत्सलेने जीवन व्यतीत केलेले असते. वत्सला सुलोचनाला यंत्राच्या कागदाबद्दल व छायाचित्रांबद्दल सांगते. सुलोचनाचा गैरसमज दूर होतो... ती विद्याधरला भेटून क्षमा मागते. विद्याधरला घेऊन वडिलांकडे जाते. विद्याधरशी लग्न करायचा निर्धार व्यक्त करते. दादा चिडून म्हणतात, ''बापाच्या पैशावर चैन करायची आणि बापावर उलटायचं! हेच अलीकडचं शिक्षण! देव नको, धर्म नको. पाहिला खोंडा आणि हुरळली कालवड. रात्री नऊ वाजेपर्यंत वाटेल तिथं रहायला लाज नाही वाटत. उद्या निस्तरायची पाळी आली–''

यावर सुलोचना म्हणते, ''सात वर्षांपूर्वी तुम्ही काय केलंत? भर दिवसा त्या तुळशीला– सुरंगाला– म्हणूनच लक्ष्मीचं चित्र तुम्ही खराब केलंत. आपलं पाप दररोज डोळ्यांपुढं दिसणार म्हणून...''

दादा म्हणतात, ''सुलू, चालती हो तू या घरातून.''

आणि रामनवमीला सीता घरातून बाहेर पडते. राम बरोबर येईलच या खात्रीने.

वत्सलाही रमाकांतला भेटते. ''या कथासंग्रहाला प्रस्तावना हवीय'' म्हणते. 'वत्सले, तू माझी ना?' म्हणत तो तिला जवळ घेतो.

त्याच वेळी सुरंगाचे पत्र रमाकांतला वाचायला मिळते. रमाकांतला तिची

**शरीरसौंदर्य किंवा प्रणय हा कोणत्याही कलेचा आत्मा होऊ शकेल का? प्रणयाचे पर्यवसान वात्सल्यात करून निसर्ग नकळत एक मोठा धडाच शिकवत असतो. उपभोगाशिवाय मनुष्य जगणार नाही;**

कर्मकहाणी वाचून एकटेएकटे वाटते. करुण स्वरात तो 'वत्सले' अशी साद घालतो.

दोन ध्रुव एकमेकांना मिळतात...

खांडेकरांची ही कादंबरी... सत्तर वर्षांपूर्वीची... स्वप्नाळू आदर्शांची... भ्रमनिरासाची. हा भ्रमनिरास सौंदर्य व कला याबद्दलच्या भ्रामक कल्पनांच्या कैफात असणाऱ्या रमाकांतचा होतो. दिसायला सामान्य, काळ्यासावळ्या पत्नीबद्दलच्या नाराजीतून सुरंगा आणि सुलोचना यांच्या सौंदर्याची त्याला ओढ वाटते... पण सुरंगाचा शापित भूतकाळ, सुलोचनाचे विद्याधरवरचे प्रेम– यामुळे रमाकांतला वत्सलेचे आंतरिक सौंदर्य जाणवते... आणि दोन ध्रुवातले अंतर एकदम संपुष्टात येते.

बाप्पा हे यातले ध्येयवादी व्यक्तित्व. गांधीवादी, अहिंसावादी... गावातील जत्रेत रेड्याचा बळी देण्याच्या विरोधात ते दंड थोपटतात... तर तो रेडाच त्यांना जायबंदी करतो. यंत्रामुळे कामगार बेघर होतात; म्हणून ते यंत्राला विरोध करतात...

त्याचबरोबर खांडेकर इतरही अनेक वादग्रस्त विषयांवर सुभाषितांचा वर्षाव करतात... त्या सुभाषितांमागची आशयसूत्रे आजही आपल्याला अंतर्मुख करतात.

"वेडी आहेस तू! पाप सौंदर्याच्या वाऱ्याला सुद्धा उभं राहत नाही." (१२१)

"जीवन म्हणजे तीन भुकांसाठी चाललेली धडपड! सुख म्हणजे काय? या तीन भुकांची तृप्ती. या तीन भुकांचा त्रिवेणी संगम म्हणजे आनंदमय जीवन... पहिली भूक भागवताना कामकऱ्यांना नाकीनऊ येतात. बाप्पांसारख्या गांधींच्या भक्तांना दुसऱ्या भुकेचं महत्त्व समजत नाही. रशियासारख्या देशात तिसऱ्या भुकेला जागा नाही... रमाकांतची कला! तिला दुसरी भूक– हृदयाची भूक तेवढी ठाऊक आहे... शरीरसौंदर्य किंवा प्रणय हा कोणत्याही कलेचा आत्मा होऊ शकेल का? प्रणयाचे पर्यवसान वात्सल्यात करून निसर्ग नकळत एक मोठा धडाच शिकवत असतो. उपभोगाशिवाय मनुष्य जगणार नाही; पण उपभोग हेच मानवी जीवनाचे ध्येय नाही. या व्यापक ध्येयाच्या जीवनाशी समरस होईल तीच कला." (१७९)

"गरीब आणि श्रीमंत दोघेही पापे करतात. एक पैसा नाही म्हणून व दुसरे पैसा फार झाला म्हणून!... जगात पैशाची वाटणीच योग्य रीतीनं व्हायला हवी." (१७९)



"तिन्ही भुका लागणे हा मनुष्याचा देहधर्म आहे; पण एकाने आपली कुठलीही भूक दुसऱ्याच्या रक्तमांसाने भागविणे यात माणुसकी नाही. आज जगात खरी माणसे थोडी आहेत. मूठभर मानवदेहधारी राक्षस आणि त्यांच्याकरिता राबणारे कोट्यवधी मनुष्य देहधारी पशू यांनीच जग भरून गेले आहे." (१८०)

"पांढरपेशांचं जीवन या चांदण्यासारखं नाही का? दिसायला किती सुंदर! किती शांत; पण सूर्यच नसेल तर चंद्राला प्रकाश कुठून मिळणार?" (७२)

**"जगात जाती दोनच! शरीराने राबणाऱ्या अरसिक, कलाहीन आणि बुद्धिमंद... आणि बुद्धीवर जगणाऱ्या रसिक, कलासंपन्न, प्रतिभावान..."**

"जगात जाती दोनच! शरीराने राबणाऱ्या अरसिक, कलाहीन आणि बुद्धिमंद... आणि बुद्धीवर जगणाऱ्या रसिक, कलासंपन्न, प्रतिभावान..." (३२)

"बायको मेली म्हणून प्रेम मरते की काय? त्या प्रेमासाठी दुसरी बायको करणे प्राप्तच असते. हा महाराष्ट्रातील महाकवींचा सिद्धान्त या गावंढळांच्या गावीही नसावा." (५०)

"सौंदर्याहून जीवनाला श्रेष्ठ मानणारे लोक वेडे असले पाहिजेत. जीवन! कुठे आहे जीवन इथे! जिकडे पहावे तिकडे सौंदर्याचे साम्राज्य..." (१३४)

"जीवन म्हणजे जमीन. काळी, उंचसखल, ओबडधोबड; पण तिच्यातून पिके निघतात. कला ही आकाशासारखी! आकाशात नक्षत्रं चमकली तरी फळं जमिनीवर पिकतात." (१३८)

"प्रणयाबरोबर मानवी जीवनावर आणखी दोघांचा हक्क आहे. पोट आणि आत्मा." (१४०)

"पशूहून मनुष्य निराळा करण्याचा सृष्टीचा खटाटोप फुकट जाईल." (१४०)

"ताऱ्यात सौंदर्य खास आहे; पण जीवन– जीवन खास नाही..." (१५१)

"पुन्हा पांढरपेशा वर्गात जाऊन पडायचे? नवऱ्याच्या जीवावर चैन करीत जन्म घालवायचा?" (१६७)

"सृष्टीप्रमाणे मानवी जीवनातही ऊन हवं आणि चांदणं हवं... पण सृष्टीत तरी ऊन आणि चांदणे यांचा संगम कुठे होतो?" (१७१)

"नदी समुद्राला मिळाली नाही म्हणून तो काही आटत नाही, पण त्याने जर आपल्या पाण्याची वाफ होऊ दिली नाही तर... तर एका वर्षात सर्व नद्यांची वाळवंटे बनतील." (१७८)

> **“तुमचं हे तत्त्वज्ञान फार शिळं झालं आता. युरोप-अमेरिकेतील नवी पुस्तकं वाचा. उदात्तबिदात्त सारं थोतांड आहे... मानवी जीवनात घडामोडी करणारी शक्ती फक्त एकच आहे...**

खांडेकरांना काही गोष्टींबद्दल भयंकर चीड होती. उदाहरणार्थ, तीन चांगल्या लेखकांबद्दल प्रो. बाप्पा पुढीलप्रमाणे भाष्य करतात.

“पहिल्यानं स्त्रीस्वातंत्र्याबद्दल अशा जोरदार गोष्टी लिहिलेल्या आहेत. प्रत्येक गोष्टीत पुरुष वाईट. बायको चांगली. बायकांना उपदेश काय तर लग्न करू नका. गुलाम होऊ नका. सौभाग्यवती या शब्दाचा वेश्या शब्दाइतकाच तिटकारा माना. पुरुषजात तेवढी निमकहराम... रत्नागिरीच्या लोकांना जाऊन विचारा... दुसऱ्या कलावंत लेखकाची दारूवरची कादंबरी सुप्रसिद्ध आहे. बाटली जवळ ठेवूनच प्रत्येक प्रकरण लिहीत असे तो... कादंबरीच्या आवृत्त्यांवर आवृत्त्या आणि त्याच्या घरात दारूच्या बाटल्यावर बाटल्या खलास झाल्या... तिसरे गृहस्थ– प्रेमाचे बडे शाहीर! पवित्र प्रेम हे खंडकाव्य आणि प्रेमांजली हा काव्यसंग्रह लिहिणारे... त्यांची बायको आजारी पडली... स्वारीनं तडक रस्ता धरला तो वेश्येच्या घरचा...” (१३७)

“तुमचं हे तत्त्वज्ञान फार शिळं झालं आता. युरोप-अमेरिकेतील नवी पुस्तकं वाचा. उदात्तबिदात्त सारं थोतांड आहे... मानवी जीवनात घडामोडी करणारी शक्ती फक्त एकच आहे... ती म्हणजे सेक्स. प्रणय... स्त्रीपुरुषांचं आकर्षण...” (१४०)

“जगात कोट्यवधी लोक अर्धपोटी राहताहेत. रोगांनी तडफडताहेत. पशूंच्या स्थितीचा हेवा करताहेत. हा काय लहानसहान उत्कर्ष झाला? (१४१)

“श्रीमंती हे जगातलं सर्वात मोठं पाचक औषध आहे.” (१४१)

“पैशामुळे पोशाख आणि खाणेपिणे निराळे झाले तरी बहुतेक पांढरपेशी आतून कुरवाड्याइतकेच रानटी असतात... पहिल्या दोन भुका ठाऊक! तिसरीचा पत्ता आहे कुणाला?” (१७९)

सत्तर वर्षांपूर्वीच्या कादंबरीतील या भावना, ही निरीक्षणे आजही बहुतांशी वैध ठरतात. केवळ बाह्यवर्णावर पत्नीच्या सौंदर्याचे मूल्यमापन करणारा लेखक, कादंबरीकार माणसाच्या भावनिक, मानसिक, सांस्कृतिक, नैतिक गुणांकडे लक्ष न देण्याइतका असंवेदनशील असा त्या विशिष्ट व्यक्तीच्या संदर्भात बिनदिक्कत राहू शकतो; केवळ सुंदर व कलाकार असणाऱ्या स्त्रियांच्या गळ्यात पडू पाहतो– हे खांडेकरांचे आपल्या नायकाबाबतचे प्रक्षेपण मात्र आज काहीसे एकांगी वाटते एवढेच!

**पृष्ठे : २५६ ● किंमत : १८०रु. ● सभासदांना : १३५रु. ● पोस्टेज : २५रु.**



# द लायन्स गेम

**नेल्सन डेमिल**

**अनु. अशोक पाध्ये**




**किंमत ६८०रु.**

**पोस्टेज ३० रु.**

पॅरिसहून बोईंग-७४७ विमान सुटले. त्यातील प्रवाशांमध्ये एक शरणार्थी कैदी व दोन गुप्तचरही होते. निम्म्या वाटेत अचानक या विमानाकडून संदेश येणे बंद झाले. पुष्कळ प्रयत्न करूनही कुठलाच प्रतिसाद येईना; आणि तरीही ते अचूक न्यूयॉर्कच्या विमानतळावर पोहोचले; पण पुढे काहीच होईना... त्या विमानात भीतीने गोठून टाकणारी एक घटना घडली होती...

असद खलिल नामक तो अतिरेकी त्या विमानातून निसटला होता आणि एक विध्वंसक कामगिरी त्याला पार पाडायची होती......

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**




# प्रतिद्वंद्वी

**लहानमोठ्या संघर्षांना अवसर देणाऱ्या मानवी वृत्तिप्रवृत्तींचे द्वंद्व**

**आशा बगे**

आशा बगे यांच्या 'प्रतिद्वंद्वी' या कथासंग्रहात दुसरा, किती दूर, निर्मोही आणि सखी या चार दीर्घकथा आहेत. प्रतिद्वंद्वी हे पुस्तकाचे नाव असले तरी त्या नावाची कथा यात नाही. हे नाव या संग्रहाला देण्यामागे काही हेतू असावा का, असा विचार सहजच मनात येतो. या कथांतील मुख्य पात्रे एकमेकांशी संघर्षात्मक पवित्रा घेणारी, एकमेकांना आव्हान देणारी, एकमेकांवर कुरघोडी करू पाहणारी, स्पर्धा करणारी अशी असावीत; या चारही कथांमधील हा द्वंद्वाचा भाव प्रभावशाली असावा असा अंदाज आपण करतो, आणि तो बराचसा बरोबर आहे, हे या कथा वाचताना जाणवते. अगदी निकटवर्ती नात्यांतील व्यक्ती असल्या तरी त्यांच्यामध्ये आचार, विचार, मूल्ये, आशा-अपेक्षा यात सूक्ष्मतरल पातळीपासून ते पराकोटीचे दुरावे असू शकतात. एकमेकांच्या वागण्याबोलण्यात काहीतरी विसंवादी, विसंगत, विध्वंसक, तुटलेपणा यांचाच अनुभव वरचढ होताना दिसतो; आणि आपला मुलगा, आपला पती, आपला सहकारी, आपला मित्र किंवा कारणवशात् परिचय झालेला एखादा माणूस हा आपल्याहून किती वेगळा, किती परका आहे याच्याच खाणाखुणा पदोपदी जाणवत, सलत, टोचत राहतात. दोन व्यक्तींचे स्वभाव, वृत्ती, वर्तन, विचारांची धाटणी यातील लहानमोठ्या भेदांनी त्यांच्या परस्परांकडे पाहण्याच्या दृष्टिकोनात, मूल्यमापनात, एकमेकांना जोखण्याच्या क्षमतेत फरक पडत जातो. कधीकधी त्याकडे उडत उडत, उथळपणे, क्षमाशील वृत्तीने पाहिले जाते; तर कधी त्या व्यक्तीचे अस्तित्व हेच आपल्या अस्तित्वाला धोकादायक आव्हान असल्याचे जाणवून, शत्रुत्वाच्या पातळीपर्यंत ताणले जाते... सहजीवनाची शक्यताच मग असंभवनीय ठरते... समोरच्या माणसाकडे आपण सखा सहकारी म्हणून बघतो की स्पर्धक, प्रतिस्पर्धी, प्रतिद्वंद्वी म्हणून बघतो, यावर बरेच काही



अवलंबून असते. प्रथमदर्शनी प्रेमासारखेच काहीतरी याबाबतही घडत असते. एखाद्या व्यक्तीला पाहताक्षणीच आपला तिच्याबद्दल अनुकूल ग्रह होतो; तर कोणाबद्दल प्रतिकूल ग्रह होतो... त्यात बदल होऊ शकतो; पण पहिलेवहिले दर्शन दीर्घकालीन ठसा उमटवणारे असते.

आशा बगे यांच्या कथांमधून आपल्याला अशा काही व्यक्ती आमनेसामने उभ्या राहिलेल्या दिसतात. लहानमोठ्या संघर्षांना अवसर देणाऱ्या वृत्तिप्रवृत्तींची मूल्यविवेकाची झटापट त्या व्यक्तींच्या परस्पर व्यवहारात कळत-नकळत होत राहते.

> **एखाद्या व्यक्तीला पाहताक्षणीच आपला तिच्याबद्दल अनुकूल ग्रह होतो; तर कोणाबद्दल प्रतिकूल ग्रह होतो... त्यात बदल होऊ शकतो; पण पहिलेवहिले दर्शन दीर्घकालीन ठसा उमटणारे असते.**

डॉक्टर मनोहर आणि डॉ. ललिता या दांपत्याला सुजय हा एकच मुलगा. मेडिकलच्या दुसऱ्या वर्षाला तो आहे; पण त्याला एकूणच मेडिकलमध्ये रस नाही. हॉस्टेलमधून त्याला काढण्यात येते; कॉलेजातूनही रस्टिकेट करण्याची पूर्वसूचना देण्यात येते. तो बाहेर खोली घेऊन राहतो; बाहेरचे मेसमध्ये जेवतो. हवे तेव्हा पैसे मागण्यासाठी घरी येतो. वडील त्याच्याशी बोलायलाही तयार नसतात. वडील आपल्या नर्सिंग होममध्ये मग्न, तर आई गायनॅक... प्रसूतिगृहात मग्न. त्यामुळे तो घरी येतो तेव्हा स्वयंपाकीण-कम-हाऊसकीपर असणाऱ्या मनुताईंशीच त्याचा सारखा संबंध येतो. पन्नाशीतल्या गोऱ्या, देखण्या; मॅट्रिक पास मनुताई... सोनार... विधवा... एकच मुलगी पण तिने पळून जाऊन लग्न केले म्हणून तिचे नाव टाकून दिलेले... भजनी मंडळ... देवळात प्रदक्षिणा... मनुताईंचा सुजयला धाक वाटतो... तो बाहेरून येऊन तसाच जेवणाच्या टेबलाशी बसून वाढा असे म्हणतो; तर मनुताई म्हणतात, "अरे, बूट-मोजे काढ. हात धू. स्कूटरने आलास. नुसती धुळीची पुटं बसली सगळी." तेव्हा तो म्हणतो, "तुम्हाला फार बोलायची सवय आहे मनुताई. वाढा म्हणजे वाढा." "वाढणं भागच आहे मला. पण तूच बघ. स्वत:ची किळस येत नाही तुला?" या ताशेऱ्यावर तो तिथेच बूट-मोजे काढतो. मोज्यांचा वास यतो तेव्हा मनुताई तोंड फिरवतात. तो वास त्यालाही येतो. तो गुरगुरात हात धुवून येतो. मनुताई वाढतात. बूट-मोजे उचलून ठेवतात. नंतर आईवडील येतात... तो झोपलेला असतो... जाग आल्यावर आईकडे पैसे मागतो... "मी तुमचा मुलगा आहे हे मी कुणाला सांगत नाही. तुम्हीही सांगू नका" असे तो म्हणतो तेव्हा आई विचारते, "मग हे पैसे तू कोणत्या हक्काने

**पैशाची गरज लागली की सुजय घरातल्या कुंड्या, देव्हाऱ्यातले चांदीचे देव यांच्याकडेही नजर टाकायचा... कधी रद्दी विकायचा? मनुताई विचारत, ''किती येतील पैसे? किती दिवस ते पुरतील?...**

मागतोस?'' त्याचे उत्तर– ''मी मागितले तर काम झालं? द्यायचे की नाही ते तुम्ही ठरवू शकता. नाहीच दिले तर माझी पुष्कळ ठिकाणं आहेत. तुमच्याकडे प्रथम मागितले इतकंच.''

वडील येतात. आरडाओरडा करतात; पण उर्मटासारखा बघत राहतो. इतर कुणी धड जेवत नाही; पण सुजय चापून जेवतो... किती दिवसांचा उपाशी असल्यासारखा... मनुताई काहीतरी गुणगुणत असतात तेव्हा संतप्त ललिता विचारते, ''कुठल्या खुशीनं गुणगुणतात मनुताई?'' मनुताई मनात म्हणतात, ''खुशी कशाची? मी तर तुमच्याच सुखदु:खाशी बांधली गेलीय हो! माझं बोचकं मी केव्हाच बाहेर वेशीवर टांगून ठेवलंय.'' नंतर ललिताला मनुताई विचारतात, ''काय करायचं ठरवलं?... मी विचारू नये पण राहवत नाही.'' तेव्हा न रागावता, ललिता म्हणते, ''काही ठरवता आलं नाही वाटतं की हे ठरवणं आपल्या हाती नाही.'' मनुताई म्हणतात, ''मी सांगू का? पैसे द्या तुम्ही त्याला. म्हणावं. ही शेवटची संधी.. ती शेवटची नसतेच. पण आपण आपल्याकरताच म्हणायचं. या मुलाचा कशावर विश्वास नाही; पण आपल्याला ठेवावाच लागेल. विश्वास ठेवून पाहणं हेच जास्त सोपं जाईल, बाई.''

...पुढच्या वेळी सुजय सामानासकट येतो. मनुताईच रिक्षाचे पैसे देतात.

लहानपणापासून सुजयला मनुताईंनी सांभाळलेले. तो कुणी परका थोडाच होता? बाईंइतका नसला तरी जवळचाच होता. सुखदु:खाचे तेच ते अनुभव. तेच ते वळसे. त्या विचारतात, ''राहणार आहेस ना? सामान घेऊन आलास म्हणून म्हणते...'' ''मी, मी परत आलो आहे. तुमची काय हरकत आहे?'' ''माझी कशाची हरकत असणार बाबा?... तू काय नवं देणारं? आम्हीच नवे होत असतो. भोगताना, सहन करताना...''

पैशाची गरज लागली की सुजय घरातल्या कुंड्या, देव्हाऱ्यातले चांदीचे देव यांच्याकडेही नजर टाकायचा... कधी रद्दी विकायचा? मनुताई विचारत, ''किती येतील पैसे? किती दिवस ते पुरतील?... त्यापेक्षा स्वत:ला विक. कर स्वत:ची किंमत... या पेपरच्या रद्दीइतकी तरी येते का बघ...''

कधी कोणी अनोळखी पोरे सुजयची चौकशी करायला येतात. ''सुजयने



माझ्याकडून पन्नास रुपये घेतलेत– ते हवेत...'' मनुताई सुजय घरी नाही म्हणून त्यांना परत पाठवतात. सुजयला म्हणतात, ''तुला काय वाटतं? तुझ्याकरता खोटं बोलले मी! डॉक्टर येतील आता. भुकेले, थकलेले. त्यांच्यासमोर तमाशा नको.''

मनुताईंचे हे साधेच शब्द, पण ते आपल्या अंगावर कुत्र्यासारखे वस्सकन् येताहेत असे सुजयला वाटते. या बाईंचे इमान आहे ते आपल्याशी नाही, त्या आपल्याला तेवढ्या लायकीचा समजतच नाहीत हे सुजयला जाणवतं... खटकतं... सलतं... सुरीपेक्षाही धारदार शब्द... त्याला वाटतं, दुपारी त्या झोपतात तेव्हा तोंडावर उशी दाबून मारून टाकावं त्यांना. मालकाच्या दारातलं कुत्रं आणि रुबाब केवढा! चोवीस तास पहारा देत बसते...

**नायक-खलनायक असा प्रकार येथे नाही. पण एकमेकांना समजावून घेताना दोन वेगवेगळ्या भूमिकांमध्ये वावरणाऱ्यांना जी अपरिहार्य कसरत करावी लागते, ती मानवी पातळीवर** आपल्याला आणून सोडते.

मनुताई एकदा त्याला खडसावतात, ''अरे मालक आहेस तू. मालकासारखं वाग. व्यसनं करायची ती स्वाभिमानानं कर नं! या चोऱ्यामाऱ्या कशाला आपल्याच घरात?''

''मी एकटा आहे... आय ॲम अलोन ॲंड प्लीज लीव्ह मी अलोन'' असे सुजय एकदा म्हणतो तेव्हा मनुताई ताडकन् त्याला खडसावतात, ''माहीत आहे मला. सगळीच एकटी असतात. कोणी नसतं दुकटं. उगीच इंग्रजीत बोलला की खरं होत नाही ते!''

...या मनुताईंना गर्भाशयाची पिशवी काढण्यासाठी हॉस्पिटलमध्ये दाखल केले जाते. सुजयलाही आई बरोबर नेते... तो ऑपरेशनबद्दल चौकशी करतो. मनुताईंच्या मुलीला बोलावून का घेत नाही असे विचारतो... ''त्या जिद्दी आहेत. मरणार असेल तर बोलवा म्हणाल्या,'' असे आई म्हणते तेव्हा तिला प्रथम जाणवते– आज कितीतरी दिवसांनी सुजय साध्या माणसासारखा बोलतो आहे...

एका मर्यादित अर्थाने प्रतिद्वंद्वी म्हणून येथे मनुताई आणि सुजय आपल्यासमोर येतात... नायक-खलनायक असा प्रकार येथे नाही. पण एकमेकांना समजावून घेताना दोन वेगवेगळ्या भूमिकांमध्ये वावरणाऱ्यांना जी अपरिहार्य कसरत करावी लागते, ती मानवी पातळीवर आपल्याला आणून सोडते हे मान्य करावेच लागते.

'निर्मोही'मध्ये आशा बगे यांनी अशाच एका अनोळख्या नात्यातले वाढते भावबंध टिपले आहेत आणि एकमेकांना समजून घेण्याच्या प्रक्रियेत कितीही समंजसपणा असला तरी एकमेकांचे वेगवेगळे अस्तित्व भान अबाधितच असे

**कृष्णा आणि आपण यांच्यातला फरक त्यावेळी अनुराधाला जाणवतो. कृष्णा निर्भय आहे. आपण भीतीने मरतो आहोत. कृष्णाला मृत्यूचा भयगंड नाही. पावसाचा आनंद नाही. जमिनीचे तापणे नाही. धारांनी निवणे नाही...**

वाटते; पण आई आपले घर सोडायला तयार नसते. तेव्हा वृद्धाश्रमातून एका बाईला तिच्यासोबत राहण्यासाठी 'भाड्याने' आणण्याचे ठरते. त्याप्रमाणे पन्नाशीतली कृष्णा पाचशे रुपये महिना पगारावर अनुराधाबाईंच्या घरी येते... ती विनापाश असते. बिनलाजाची... कृश, उंच, गबाळपणे बांधलेल्या केसांची... उपरपेंडीसारखी रया असलेली... कमालीची निर्विकार नजर...

अनुराधा तिला स्वयंपाक करायला सांगते तर ती म्हणते, ''मला स्वयंपाक करता येत नाही.'' भात-डाळ, जाड रोट्या... एवढेच तिला येते. भाजी, आंबटगोड वरण, पोळ्या-फुलके, भाकरी काही येत नाही... अनुराधा तिला हळूहळू हे शिकवते...'' हिला शिकवण्याच्या निमित्ताने अनूला पुन्हा हुरूप येतो... समोर काही अनागर, उघडेवाघडे, आकारहीन असे होते. बाईंना ते घडवायचे होते... हिला घडायचे होते की नाही माहीत नाही; पण बाईंना ते करायचे होते. किती दिवसांनी करता यावे असे काही समोर आले म्हणून अनुराधा सुखावते.

कृष्णा हळूहळू रुळत जाते... कामे करू लागते... सिनेमाला जाते... पैसे घेऊन बाजारात वडापाव वगैरे खाऊन येते... सायकलवरूनही फेरफटका मारायला सरावते... ''पाऊस पडला की रसाचे आंबे संपतील... आणा न एकदा आंबे.'' असे म्हणण्याइतकी मोकळी होते. शाळेजवळ जाऊन बुड्ढी के बाल खाते... हिचं लहानपण सुरू झालं का नव्यानं– असं अनूला वाटत राहतं... एकदा साप अंगणात येतो. चाफ्याला लगडतो. अनुराधा घाबरते. कृष्णा म्हणते, ''बाई, सापानं बेडूक गिळला आहे... सुस्त आहे. घरात येणार नाही. जरा हवा खाईल आणि निघून जाईल आपल्या वाटेनं. काही करत नाही. आपणहून कुणाच्या वाट्याला जात नाही.''

कृष्णा आणि आपण यांच्यातला फरक त्यावेळी अनुराधाला जाणवतो. कृष्णा निर्भय आहे. आपण भीतीने मरतो आहोत. कृष्णाला मृत्यूचा भयगंड नाही. पावसाचा आनंद नाही. जमिनीचे तापणे नाही. धारांनी निवणे नाही... आयुष्यभराची सगळी वासना फक्त खाण्यातच एकवटली आहे... कृष्णा भरतकाम उत्तम करते; कोष्ट्यांच्या वस्तीत जाऊन विणकाम बघत बसते... हाका न मारता सकाळी लवकर उठू लागते... फेसाळ दुधात चहा गाळायला शिकते...



महिनाभर अनुराधाला हॉस्पिटलात रहावे लागते. त्यांची जगण्याची इच्छा दुप्पट वेगाने तरारून येते. मुलगी नीना आणि तिचे यजमान अनूचा मृत्यू गृहीत धरून चाललेले; पण ती वाचते. तिला मरायचेच नसते.

कृष्णा अनूच्या सहवासात आश्वस्त होऊन आपल्या अतृप्त इच्छा-आकांक्षा पूर्ण करीत राहते... एके दिवशी कृष्णा म्हणते, ''आता मी इथून जाईन म्हणते. बाईंना बरं वाटतंय. तब्येत चांगली आहे... रागावू नका बाई. इथं जन्म थोडी काढायचा होता?... माझ्या नावानं बँकेत पैसे भरत होता ते काढून द्या. मी आज जाते.'' अनूचा ती निरोप घेते. जाताना पाया पडेल असे अनूला वाटते; पण ती तसे काही करीत नाही... त्या रखरख उन्हात ती नेहमीच्या आपल्या चालीने झपाझप चालत राहते...

**ग्रामीण जीवनशैलीत वाढलेली, निराधार, निराश्रित कृष्णा... सुसंस्कृत, संपन्न मध्यमवर्गीय सेवानिवृत्त स्त्रीच्या सहवासात राहते... खूप काही नवे शिकते आणि पुन्हा आपल्या मार्गाने जाते...**

काही दिवसांसाठी मोलकरीण, कंपॅनिअन म्हणून आलेली, ग्रामीण जीवनशैलीत वाढलेली, निराधार निराश्रित कृष्णा... सुसंस्कृत, संपन्न मध्यमवर्गीय सेवानिवृत्त स्त्रीच्या सहवासात राहते... खूप काही नवे शिकते आणि पुन्हा आपल्या मार्गाने निघून जाते... तेथेच चिकटून रहात नाही. हक्क सांगत नाही. उलट मुलगी नीना तिच्या घरावर लाखोंचे कर्ज काढण्यासाठी तिच्यावर दबाव आणू पाहते. तिचे मरणही गृहीत धरून तिला हॉस्पिटलात नेते...

अपघातात मल्टिपल फ्रॅक्चर झालेल्या कार्तिकला हातापायांच्या बोटांची हालचाल करणे त्रासदायक ठरते; हॉस्पिटलमध्ये महिनाभर राहून आल्यावर घरी फिजिओथेरपी करणे क्रमप्राप्त. त्यासाठी फिजिओथेरपिस्ट बाई रोज घरी येते. कृश, काटकुळी, ठेंगणी, अनाकर्षक, सपाट छातीची, नि:सत्त्व डोळ्यांची, रोड, कोरडी अशी ही पन्नाशीतली बाई... सदैव पंतोजीपण प्रकट करणारी म्हणून, निर्विकार म्हणून कार्तिकला आवडत नाही. तो तिच्याशी काही संवाद साधू पाहतो; पण ती त्याबाबत उदासीन. ''तुम्ही बरं होईपर्यंत आम्ही तुमच्याशी बांधलेले असतो... तुम्हाला आता माझी फार दिवस गरज नाही. महिन्याभरात तुम्ही स्वतंत्रपणे सगळं करू शकाल'' असं प्रोफेशनली सांगणारी... वक्तशीर वागणारी. ती अविवाहित असते आणि तिच्याजवळ तिचा सावत्रभाऊ रहात असतो. तो सहावीत असतो. आम्ही दोघंच आहोत असं ती सांगते.

**आपण एखादी संस्था काढतो. फाउंडर म्हणून ती संस्था वाढवतो... आणि एक दिवस आपल्याच त्या संस्थेची सूत्रे दुसऱ्यांच्या हाती गेल्याचे बघून त्या संस्थेत उपरे ठरतो.**

कार्तिक एकदा तिला विचारतो, ''तुम्ही लग्न का केलं नाही?'' तो तिला आपल्या ब्रह्मचारी मामाचे स्थळ सुचवतो. ती त्यावर लगेच प्रतिक्रिया देत नाही; पण नंतर एकदा म्हणते, ''तुमच्या मामांबद्दल तुम्ही बोलत होता... माझी तयारी आहे. पण भाऊ मार्गी लागेपर्यंत माझ्याजवळ राहील हे मान्य असेल तर...'' परंतु कार्तिकलाच नंतर आपला मामा यासाठी तयार होणार नाही असे वाटते– निरोप घेताना म्हणते, ''मामांबद्दल विचारलं होतं. ते काही खरं नाही. यू फरगेट इट...'' आणि ती खळखळून हसते. पहिल्यांदाच...

एक पेशंट आणि एक फिजिओथेरपिस्ट... महिना दोन महिन्यांची ही प्रोफेशनल सेवा. पण त्यातही गुरू-शिष्य, पुरुष-स्त्री, मालक-सेवक असे काही भावबंध अंतर्निहित असतातच. येथे पेशंटने आपण सांगतो ते निमूट ऐकायला हवे, तसे वागायला हवे हा आग्रह असतो. कधी कधी तो संघर्षमय ठरतो. पेशंट व उपचार करणारा यांच्यातले संबंध प्रतिद्वंद्व्यासारखे तेथे दिसतात...

परदेशात राहणारी आपली मुलं... आपल्याला दुरावतात... आपल्याला न विचारता लग्नासारखे निर्णय घेतात...

आपण एखादी संस्था काढतो. फाउंडर म्हणून ती संस्था वाढवतो... आणि एक दिवस आपल्याच त्या संस्थेची सूत्रे दुसऱ्यांच्या हाती गेल्याचे बघून त्या संस्थेत उपरे ठरतो.

शशी बिझनेसमन... देवयानी त्याची पत्नी... शाळेत शिक्षिका... मुलगा जय. बी.कॉम. संगीताची आवड.

शशीची धाकटी बहीण उर्मी. तिचा मुलगा मिहिर शशीच्या फॅक्टरीत काम करतो. उर्मीनं आधी घरातला शेअर मागितला होता; पण अण्णांनी घर पूर्णपणे शशीच्या नावावर केले, तरी ती हक्काची जाणीव दाखवते. मिहिरला मुद्दाम फॅक्टरीत चिकटवले... शशीला त्याबद्दल राग वाटतो. दोघे भाऊबहीण... पण दोघांचे संबंध तणावाचे.

तीच अवस्था खरं तर देवयानीची हवी; पण तसं नव्हतं. देवयानीला एकच बहीण नंदिनी. पण दोघींचं जग लहानपणापासून एकत्र होऊन गेलेलं... अतूट...

देवयानीला शशी-उर्मी यांच्यातलं कोरडेपण खटकते... घरासंबंधी वाद...



उमलून सहजपणे जुळून आलेलं, विस्तारून दृढ झालेलं नातं त्यांच्यात कधी दिसत नाही म्हणून आश्चर्य वाटते.

ही फॅक्टरी उभी केली... माझ्यानंतर ती मिहिरला दान करून टाकायची का? शशीला प्रश्न पडतो... पण काही दिवसांनी मिहिरच फॅक्टरी सोडून अमेरिकेत जातो.

जय बी.कॉम. होऊन, काही वेगळं करायचं ठरवतो... संगीतात नाव काढायची त्याची इच्छा. घर सोडून तो जातो. संधीची वाट बघत राहतो. ''आपल्या मस्तकातल्या तुफानाची कदर करणारं कुणीतरी शोधत राहतो... आईनं दिलेलं स्वातंत्र्य... आईनं काही लादलं नाही, कशाची अपेक्षा केली नाही. माझी तडफड तिला समजते... मला काय हवं ते तिला कळतं... म्हणून तिच्याकडे आपल्या अडचणी घेऊन जायचे नाही'' ही जयची भावना. मनोधारणा.

**तू कुठल्या परिस्थितीत या घराला, मला सतत गृहीत धरावं हे नको आहे मला. तुझ्यासारखी काही करायला म्हणून बाहेर पडलेली माणसं असे आधार मागत नसतात...**

एकदा जय घरी येतो. देवयानीला शशी सांगतो, ''जयला इथं घरी बोलव. जे प्रयोग करून पहायचे ते इथं कर म्हण. तुझ्या देखरेखीखाली. घराचं छप्पर सुदैवानं आहे. इतकं भणंगासारखं राहून उपयोगाचं नाही. सांग त्याला.''

पण जय पुन्हा निघून जातो. शशी आणि देवी यांच्यात एक तणाव निर्माण होतो.

टीव्ही सीरियल्स, पिक्चरला म्युझिक... वगैरे जयची धडपड चालू असते. एका मुलीशी त्याची मैत्री जुळते... आर्थिक अडचण असते.

जयचं नाव टीव्हीवर झळकू लागते. टायटल साँग्ज, पार्श्वसंगीत, सीरियलमध्ये काम... सगळं अगदीच नगण्य होतं असं नाही...

तो घरी पत्र पाठवू लागला. मुलीचा फोटोही त्याने पाठवला. लग्न करायचा बेत असावा...

एकदा तो स्वतःच एका मुलीसह घरी येऊन धडकला; पण ही मुलगी फोटोतली नव्हती. वेगळीच. नेहा.

रात्री जय आईशी बोलतो. ''मला जरा पैसे हवे होते. जास्त. थोडी भांडी. गॅसची शेगडी.''

पण ती म्हणते, ''मी पैसे देऊ शकत नाही. इतरही काही नाही... तू कुठल्या परिस्थितीत या घराला, मला सतत गृहीत धरावं हे नको आहे मला.

> **जीवन हे कुठल्याही चौकटीच्या, चाकोरीच्या आत बद्ध होऊ शकत नाही; नात्यांमधली बांधिलकीही साच्यात बसवता येत नाही. जे येईल ते स्वीकारण्याएवढी लवचिकता हवी.**

तुझ्यासारखी काही करायला म्हणून बाहेर पडलेली माणसं असे आधार मागत नसतात...''

त्याच रात्री जय कोणालाही कल्पना न देता निघून जातो. घरातील टेपरेकॉर्डर, शशीचे भारी सूट, घरातली कॅश, तिच्या डायऱ्या, संगीताची पुस्तकं... घेऊन जातो.

एकदा जयचा फोन येतो, ''आई, मी लग्न करतोय... रजिस्टर... तू असायला हवं... पण सगळं घाईत झालं.'' तो मुलीचं नाव सांगत नाही... पण नंतर फोटो पाठवतो. मुलीचं नाव असतं चेतना... दृष्टी निबर. वय जास्त. नाटकात किरकोळ भूमिका...

नंतर एकदा कोणीतरी सिनेमाचे पास आणून देतो. ''जयसाहेबांचा पिक्चर आहे पंचशीलला. प्रिमियर शोचे पास वर्मासाहेबांनी दिले आहेत.''

चित्रपटाच्या श्रेयनामावलीत जयचे संगीत, छोटी भूमिका, सहदिग्दर्शक... निर्माती चेतना.

सुरुवातीला ज्ञानेश्वरीतली ओवी... देखे विश्वसंभ्रमा ऐका... जयचे आजोबा म्हणायचे ती ही ओवी...


नॉट बॅड... शशीचे मत...

...असे हे नात्यातले अनेक ताणतणाव... आणखीही खूप काही... निरर्थक, निरुद्देश... अगम्य... अनोळखी... सगळं बदलतं... की काही बदलत नाही? हे कळायचीही एक वेळ यावी लागते. ही वेळ प्रत्येकाची वेगवेगळी असते.

आशा बगे यांच्या या कथांमधले हे मानवी नात्यांचे पदर, गुंते बघताना काहीही तर्कसंगत अन्वयार्थ लावण्याचा आपला प्रयत्न कसा फोल आहे हे लक्षात येते... जीवन हे कुठल्याही चौकटीच्या, चाकोरीच्या आत बद्ध होऊ शकत नाही; नात्यांमधली बांधिलकीही साच्यात बसवता येत नाही. जे येईल ते स्वीकारण्याएवढी लवचिकता हवी. ती असली तर आयुष्याचे कोडे थोडेफार उलगडेल. दु:खाची धग कमी होईल. सुखाची प्रतीती येईल. आपणच नात्यानात्यामध्ये, माणसामाणसामध्ये द्वंद्व निर्माण करतो. प्रतिद्वंद्वी म्हणून एकमेकांसमोर दंड थोपटून उभे राहतो... ते सारे द्वैत निरर्थक असते. नि:संग असते... पण हे कळण्यासाठी अवघ्या आयुष्याचीच वाटचाल खर्ची घालावी लागते.

**पृष्ठे : १५२ ● किंमत : १२०रु. ● सभासदांना : ९०रु. ● पोस्टेज : २०रु.**






# असे घडले सहस्रक


**निरंजन घाटे**
**डॉ. प्रमोद जोगळेकर**

**३००रु.**
**पोस्टेज ३०रु.**

पिरॅमिड ते इ. स. २००० असा साधारण पाच हजार वर्षांचा मानवी प्रगतीचा पट या ग्रंथातून मांडला आहे.

ही प्रगती आश्चर्यकारक आहे. हे सर्व एकत्रित वाचलं की आपण कोण होतो, काय झालो आणि कसे वागतो, याचा चित्रमय इतिहासच आपल्या डोळ्यासमोर उभा राहील......

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**



# वेरूळलेण्यातील शिल्पवैभव

**वेरूळलेण्यातील प्रत्येक शिल्पाची नेमकी माहिती**

**राधिका टिपरे**

'वेरूळलेण्यातील शिल्पवैभव' या अभ्यासपूर्ण पुस्तकात वेरूळ येथील बौद्ध, ब्राह्मणी आणि जैन गुंफांची, त्या गुंफातील प्रत्येक शिल्पाची नेमकी माहिती देण्यात आलेली आहे. वेरूळच्या लेण्यांना भेट देऊन तास दोन तासात केवळ वरवर शिल्पे बघून बहुतेक पर्यटक समाधान मानतात; परंतु त्यातील लहानमोठ्या शिल्पांच्या सौंदर्याची कल्पना त्यांना येतेच असे नाही. या पुस्तकामुळे कुठल्याही लेण्याला भेट देताना त्या-त्या मूर्तींमध्ये विशेष निरीक्षण करण्यासारख्या बाबींची सुस्पष्ट पूर्वसूचना मिळत असल्याने, आपल्या आकलनाला चालना मिळते. त्या-त्या मूर्तींतील केशरचना, वेषभूषा, अलंकार यांची पुस्तकाच्या शेवटी दिलेली शंभरावर रेखाचित्रे बघितल्यावर अगदी लेटेस्ट फॅशन्सच्याहीपेक्षा नावीन्यपूर्ण फॅशन्स दीडदोन हजार वर्षांपूर्वीच्या भारतीय ललना करीत होत्या, हे आपल्याला उमगते आणि आश्चर्य वाटते. नागकन्यांच्या केशरचनेत डोक्यामागे नागफणा तर वेगवेगळ्या प्रकारच्या दिसतातच; केशरचनेचेही चमत्कृतिपूर्ण आकार समोर येतात. कानातली मोठमोठी गोल व लोंबणारी कुंडले आज आपण सास-बहूंच्या सीरियल्समध्ये बघतो; या शिल्पातील स्त्रियाही त्याकाळात तशीच कर्णकुंडले घालत होत्या हे दिसते आणि हजार-दीड वर्षात फॅशनच्या क्षेत्रात पाश्चयात्त्यांच्या अनुकरणाने आपण फार मोठी प्रगती केल्याचा आपला भ्रम दूर होतो. केसामध्ये वेगवेगळे दागदागिने, अलंकार घालण्यातही या प्राचीन भारतीय महिलांचा हात कोणी धरू शकणार नाही. मोत्याचा कंठा, स्तनहार, कमरबंध, किरीट मुकुट, रत्नजडित पदके, नक्षीदार बाजूबंद, नुपूर, उदरबंध, घंट्या लावलेला पट्टा... असा साजशृंगार केलेल्या या शिल्पाकृतीतील सौंदर्यवती आजही भुरळ घालू शकतात, हे या पुस्तकातील ही रेखाचित्रे पाहिल्यावर लक्षात येते आणि वेरूळच्या त्या पाषाणमूर्तींही आपल्यापुढे



सजीव होऊन, आपल्या आकर्षक, मोहक अंगविभ्रमांनी, मादक कटाक्षांनी बेहोश करू पाहतात... वेरूळच्या लेण्यांना तुम्ही पूर्वीही भेट दिली असेल; पण आता हे पुस्तक वाचून पुन्हा भेट द्यायला जा; आणि तिथले प्रत्येक लेणे, प्रत्येक शिल्प, प्रत्येक मूर्ती आपल्या पूर्वजन्माशी ऋणानुबंध सांगत आहे असे तुम्हाला जाणवू लागेल. आपल्या त्या पाषाणमूर्ती तुमच्याशी बोलू लागतील. भारतीय पूर्वपरंपरेचा विशाल पट तुमच्यापुढे खुला करतील.

**तिथले प्रत्येक लेणे, प्रत्येक शिल्प, प्रत्येक मूर्ती आपल्या पूर्वजन्माशी ऋणानुबंध सांगत आहे असे तुम्हाला जाणवू लागेल. आपल्या त्या पाषाणमूर्ती तुमच्याशी बोलू लागतील.**

राधिका टिपरे यांनी वेरूळचे कैलासलेणे हा विषय पत्रकारितेच्या अनुषंगाने लघुप्रबंधासाठी निवडला; त्यासाठी भरपूर अभ्यास केला. त्याचे परिणत स्वरूप 'वेरूळ लेण्यांतील शिल्पवैभव'मध्ये आपल्याला दिसते. हे पुस्तक मेहता पब्लिशिंग हाऊसने एक उत्तम संदर्भग्रंथ वाचकांपुढे ठेवण्याच्या जिद्दीने काढले आहे. साठावर छायाचित्रे, शंभरावर रेखाचित्रे, विविध लेण्यांचा तलविन्यास दाखवणाऱ्या आकृत्या जागोजाग दिल्याने या पुस्तकाची उपयुक्तता आणि दर्शनीयता वाढली आहे. त्यामानाने किंमत माफक आहे.

इ.स. पाचवे शतक ते बारावे शतक या कालावधीत वेरूळची लेणी निर्माण झाली असे अनुमान आहे. वाकाटक, चालुक्य आणि राष्ट्रकूट राजांच्या राजवटी त्यावेळी दक्षिणेत कार्यरत होत्या. वेरूळच्या गुंफांमध्ये बौद्ध, हिंदू आणि जैन या तिन्ही धर्मांच्या या गुंफांच्या निर्मितीत सहभाग आहे. धर्मप्रसारासाठी बौद्धांनी गिरिशिल्पांचा वापर इ.स.पू. तिसऱ्या शतकात सुरू केला. धर्मप्रसाराबरोबर कलाप्रसारालाही चालना मिळाली. बौद्ध धर्माचा गिरिशिल्पांद्वारे संदेश सर्वदूर जातो आहे, हे लक्षात आल्यावर हिंदू धर्मीयांनी त्याला तोडीस तोड काम हाती घेतले... नंतर जैनही त्यात उतरले. वेरूळची लेणी आणि त्यातील शिल्पवैभव हे भारतीय इतिहासाचे आणि सांस्कृतिक परंपरेचे एक अभिमानास्पद प्रतीक आहे.

राधिका टिपरे यांनी प्रथम शिल्पकलेचा सामाजिक संदर्भ विशद केला आहे. शिल्पकलेचा आरंभ धर्मसंदेश सर्वदूर पोहोचवण्यासाठी झाला; मंदिरांतून शिल्पकलेला मुक्त अवसर मिळत गेला. मंदिरांच्या सुशोभनासाठी शिल्पकला उपयुक्त ठरली. शिल्पे व चित्राकृती यांच्या माध्यमातून तत्कालीन समाजजीवन, पोशाख, अलंकार, विधी, रुढीपरंपरा यांचेही चित्रण होत राहिले. सांस्कृतिक, आर्थिक, सामाजिक

> **शिल्पकला अभिजात जीवनशैलीचा प्रत्यय देते. संवाद साधत निर्जीवतेकडून सजीवतेकडे नेते. धर्म, अध्यात्म, आत्मा यांचे परस्पर नाते शिल्पाकृतीतून अधोरेखित केले जाते.**

जीवनाचे त्यामधून चिरस्थायी प्रकटीकरण होत गेले. शिल्पांद्वारे पुराणकालीन मिथकांना, कथाकल्पनांना, व्यक्तींनाही नवे रूप लाभत गेले.

कागद, काष्ठ, मृदा या माध्यमांपेक्षा शिल्पकला ही अधिक टिकाऊ आहे. कुठल्याही लेण्यावर वा शिल्पकाराचे नाव नसले तरी या कलाकृती चिरंजीवी आहेत. ह्या शिल्पाकृती आपल्याशी संवाद साधत असतात. हीनमान काळात शैलशिल्पांचा स्तूप निर्मितीचा, विहारांचा आरंभ भारतात बौद्ध धर्मीयांनी केला. महायान पंथाने त्याला गर्भगृहाची, मूर्तींची जोड दिली. पुढे हिंदू व जैन यांनीही शिल्पकलेला आश्रय दिला. कला आणि धर्म यांचा समन्वय साधला. सहिष्णुतेचा नवा आदर्श उभा केला. शिल्पकला अभिजात जीवनशैलीचा प्रत्यय देते. संवाद साधत निर्जीवतेकडून सजीवतेकडे नेते. धर्म, अध्यात्म, आत्मा यांचे परस्पर नाते शिल्पाकृतीतून अधोरेखित केले जाते. गौतम बुद्ध, तीर्थंकर, भगवान शिवशंकर, राम, कृष्ण प्रत्यक्षात कसे दिसत होते हे आज कोणालाच ठाऊक नाही; परंतु शिल्पाकृतीतून त्यांचे जे रूपदर्शन होते ते जनसामान्यांनी स्वीकारलेले दिसते. शिल्पकारांनी या सर्व देवदेवतांना रंगरूप दिले.

भारतात सुमारे बाराशे गुंफा आढळतात. त्यातील ९०० गुंफा बौद्धांच्या आहेत.

दख्खनच्या पठारावर भाजे, कोंडाणे, पितळखोरा, अजिंठा, बेडसे, नाशिक, जुन्नर, कर्ल्ला, कान्हेरी, वेरूळ येथील गिरिशिल्पे आढळतात.

अजिंठा येथील तीस गुंफा या अत्यंत गाजलेल्या आहेत.

वेरूळच्या लेण्यांनी दीड-दोन किलोमीटरचा परिसर व्यापलेला आहे.

१) दक्षिण भागाकडे बौद्ध लेण्या आहेत.- क्रमांक १ ते १३

२) उत्तरेकडील जैन धर्मीयांच्या लेण्या- क्रमांक ३० ते ३४

३) मध्यभागी हिंदू लेण्या- क्रमांक १४ ते २९

कैलास लेणे हे सर्वात भव्य म्हणून जगभरात अजोड मानले जाते. डोंगराच्या पोटातून खोदवलेले एक पाषाणी पद्धतीचे व शिल्पकलेतील कलाकुसरीची परिसीमा गाठणारे हे विलक्षण शिल्प पाहताना आजही आपण चकित होतो.

* वेरूळच्या बहुतांश बुद्धप्रतिमा आकाराने भव्य आहेत; पण त्यात कलात्मकता



कमी आहे. त्या काहीशा बोजड वाटतात. दया, क्षमा, शांती या भावना त्यांच्या मुखावर दिसत नाहीत.

> **कैलास लेणे हे संपूर्ण काळ्या अखंड कातळातून कोरलेले अप्रतिम लेणे म्हणजे वास्तुशास्त्राचा एक अजोड नमुना आहे. येथील प्रत्येक मूर्ती, प्रत्येक शिल्प म्हणजे कातळातून जिवंत झालेले आहे.**

* बोधिसत्त्वाच्या मूर्ती मात्र कलात्मक व सुंदर आहेत.

* स्त्री देवतांच्या मूर्ती आकर्षक आहेत; पण त्या उत्तरकालीन असाव्यात.

* बुद्ध मूर्तींच्या आजूबाजूला यक्ष, गंधर्व यांच्या मूर्ती आहेत. त्या आकर्षक आहेत.

* स्त्री-पुरुष शिल्पामध्ये कुठेही उत्तरीय वस्त्रांना महत्त्व दिले गेलेले दिसत नाही. स्त्रियाही आपले वक्ष व उरोज झाकत नसत; तलम वस्त्र मानेवरून शरीराच्या दोन्ही बाजूंना सोडत.

* बहुतांशी स्त्रीमूर्तींमध्ये स्तनाग्रे कोरलेली नाहीत.

* उरोजांचा आकार बांधीव आहे. चोळी, कंचुकी घातल्यावर उरोजांचा आकार जसा गोल आणि घाटदार दिसतो, तसाच आकार या शिल्पातील वक्षांचा दिसतो.

* पुष्ट नितंब आणि उन्नत उरोज असलेल्या कमनीय स्त्रीदेहाला शक्य तितके अनावृत्त दाखवण्याचा कल कलाकार दाखवतात.

कैलास लेणे हे संपूर्ण काळ्या अखंड कातळातून कोरलेले अप्रतिम लेणे म्हणजे वास्तुशास्त्राचा एक अजोड नमुना आहे. येथील प्रत्येक मूर्ती, प्रत्येक शिल्प म्हणजे कातळातून जिवंत झालेले रेखीव, प्रमाणबद्ध आणि संपन्न असे सौंदर्य आहे. सुंदर वेशभूषा, केशभूषा आणि अलंकारांनी परिपूर्ण स्त्रीपुरुष शिवशंकर-पार्वती यांच्या जीवनातील अनेकविध कथाकल्पना प्रकट करून शिवमाहात्म्याचा प्रभाव दाखवतात.

कांचीपुरमच्या कैलासमंदिरातील अनेक शिल्पं वेरूळच्या या लेण्यात हुबेहूब जसेच्या तसे आढळतात, यावरून कैलास लेणे खोदण्याची स्फूर्ती आणि कलाकारांची फौज कांचीहून प्राप्त झाली असावी असे राधिका टिपरे यांचे प्रतिपादन आहे.

चालुक्यांनी पल्लवांवर जय मिळवल्यावर कांचीच्या या कैलासमंदिराची प्रतिकृती बदामीजवळ पट्टदकल येथे विरुपाक्ष मंदिराच्या रूपात उभी केली. कारागीर सर्व पल्लवांचेच... या विरुपाक्ष मंदिरावरचा द्रविड शैलीचा प्रभाव स्पष्ट दिसतो.

पुढे चालुक्यांचा पराभव करणाऱ्या राष्ट्रकूट राजांनी या विरुपाक्ष मंदिरासारखे

**हिंदू, बौद्ध व जैन अशा तिन्ही लेण्यांतील शिल्पांची, मूर्तींची वैशिष्ट्ये या पुस्तकात नेमकी दिलेली आहेत. त्यामुळे तो सगळा भूतकाळ डोळ्यांपुढे उभा राहतो.**

भव्य शिल्प आपल्याही राज्यात असावे असे ठरवून वेरूळच्या कैलास लेण्याचा घाट घातला. कांचीच्या मंदिरातील महिषासुरमर्दिनी दुर्गेची प्रतिमा, हिरण्यकश्यपू आणि नरसिंह यांचे शिल्पपट येथेही हुबेहूब कोरलेले दिसतात.

एका अखंड पाषाणातून कोरलेल्या या मंदिराच्या दर्शनी भागातील भिंतीच्या मध्यभागी द्रविड पद्धतीच्या गोपुरमचे प्रवेशद्वार आहे. त्यात वादकांना बसण्यासाठी जागा आहे. अष्टदिक्पाल आणि अन्य देवदेवता यांच्या मूर्ती आहेत. उदा. विष्णू, गंगा-यमुना, नागराज-नागी, दुर्गा, सातफणी नागाचे छत्र असणारा नागराज.

गुंफेच्या प्रवेशद्वारातून आत आल्यावर चौकोनी दालन लागते. त्यातील चार स्तंभ, दोन्ही बाजूंना लहान खोल्या व उंच ओसऱ्या... कुबेराचे दोन प्रतिनिधी... महिषासुरमर्दिनी व गणेश यांच्या प्रतिमा... ओसरीवरून आत गेल्यावर गजलक्ष्मी, द्वारपाल, कामदेव, राम-सीता, इ. शिवलीलांवर आधारित शिल्पपटात ४३ वेगवेगळ्या प्रसंगांची शिल्पे पहायला मिळतात...

हिंदू, बौद्ध व जैन अशा तिन्ही लेण्यांतील शिल्पांची, मूर्तींची वैशिष्ट्ये या पुस्तकात नेमकी दिलेली आहेत. त्यामुळे तो सगळा भूतकाळ डोळ्यांपुढे उभा राहतो.

वेरूळच्या लेण्यांच्या भव्य सौंदर्याची प्रतीती येण्यासाठी हे पुस्तक अप्रतिम मार्गदर्शक म्हणून बहुमोल ठरेल.

**पृष्ठे : २९६ ● किंमत : २००रु. ● सभासदांना : १५०रु. ● पोस्टेज : २५रु.**





वक्तृत्वकला अंगी कशी बाणवावी यासंदर्भात सखोल मार्गदर्शन करणारे पुस्तक

**सभेत कसे बोलावे** **श्याम भुर्के**

**६०रु. / पोस्टेज २०रु.**

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**





## दर्जेदार कादंबरी / उत्कृष्ट अनुवाद



## डॉक्टर झिवागो

**बोरिस पास्तरनाक | अनु. आशा कर्दळे**

रशियन राज्यक्रांतीच्या अस्थिर कालखंडातील, समाजाच्या सर्व स्तरावरील व्यक्तिंच्या जीवनात घडलेला उध्वस्त बदल टिपणारी नोबेल पारितोषिक विजेती कादंबरी

**२५०रु. | पोस्टेज २५रु.**



## डायरी ऑफ ॲन फ्रँक

**ॲन फ्रँक | अनु. मंगला निगुडकर**

दुसऱ्या महायुद्धाच्या कालखंडात ज्यूं समुदायावर झालेल्या अत्याचाराची, कटू वास्तवासोबतच मानवी संवेदना रेखाटणारी अनुभवगाथा

**१७५रु. | पोस्टेज २५रु.**





## चाईल्ड ऑफ द होलोकॉस्ट

**जॅक कूपर | अनु. सिंधु जोशी**

दुसऱ्या महायुद्धात लाखो निरपराध ज्यूंच्या कत्तलीची जीवघेणी पार्श्वभूमी चितारणारे आत्मकथन

**१३०रु. | पोस्टेज २०रु.**

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**




# माझे माझ्यापाशी काही नाही : ओशो

### प्रेमाच्या तीन तऱ्हा वस्तूवरचे प्रेम, व्यक्तीवरचे प्रेम आणि परमात्म्याचे प्रेम

**अनु. भारती पांडे**

ओशो कुठल्याही विषयाकडे अगदी वेगळ्या दृष्टिकोनातून बघतात.

संत कबीर यांच्या दोह्यांवर ओशोंनी अनेक प्रवचनांमध्ये मार्मिक भाष्य केले आहे. त्यापैकी प्रेमविषयक दोह्यांवरचे विवेचन या पुस्तकात एकत्रित स्वरूपात बघायला मिळते. 'प्रीति लागी तुम नाम की पल बिसरे नाही। नजर करो अब मिहर की मोहि मिलो गुसाई' या दोह्याच्या अनुषंगाने प्रथम संत कबीर प्रेमाची संकल्पना पुढे मांडतात.

प्रेम ही जीवनाच्या सार्थकतेची निशाणी; जीवनाची परम साधना; जीवनाच्या ऊर्जेचे सर्वोच्च शिखर. प्रेम मिळाले तर सर्व काही मिळाले. प्रेमापासून वंचित राहणे म्हणजे अवघे जीवनच व्यर्थ, कुचकामी, तुच्छ...

प्रेम प्रत्येकजण करतो. परत ते चुकीच्या पद्धतीने किंवा चुकीच्या व्यक्तीवरही केले जाऊ शकते. प्रेम ही जीवनाची नैसर्गिक अभिव्यक्ती असते.

ओशोंच्या मते तीन तऱ्हेचं प्रेम असतं.

१. शंभरापैकी ९९ लोक प्रेम करतात ते वस्तूवर, संपत्तीवर, घरावर. हे सर्वात खोटं प्रेम. या प्रेमाचं वैशिष्ट्य म्हणजे या प्रेमासाठी तुम्हाला तुमचं समर्पण करावं लागत नाही. तुमची कार, तुमचं घर– या वस्तूच तुमच्यासाठी समर्पित करून घेता; पण त्या वस्तूंच्या समर्पणाला काही अर्थ नाही. कारण त्या वस्तू आज आपल्या असल्या तरी उद्या त्या दुसऱ्याच्या होऊ शकतात. आज रुपाया तुमच्याजवळ आहे. तुम्हांला तो समर्पित आहे. तो भिकाऱ्याला दिलात तर भिकाऱ्याला समर्पित होईल. वस्तूच्या प्रेमात काही धोका नाही. वस्तूच्या प्रेमात अहंकार सुखरूप राहतो. वस्तूवर प्रेम करणारा माणूस हळूहळू वस्तूंसारखाच होऊ शकतो. धन आणि वस्तू यांच्यावर प्रेम करणारा माणूस माणसांची घृणा करतो. माणसांपासून दूर राहतो. परमात्म्यापासूनही दूर राहतो.

> **प्रेम करणाऱ्याला दुसऱ्याकडून शरणागतीची अपेक्षा असते. त्यामुळे व्यक्तीवर प्रेम करणे हा एक संघर्ष ठरतो. पुरुष स्त्रीवर प्रेम करतो तेव्हा स्त्रीला झुकवू पाहतो.**

२. वस्तूच्या प्रेमापेक्षा वरच्या स्तरावरचे प्रेम हे व्यक्तीवरचे प्रेम असते. जो व्यक्तीवर प्रेम करतो त्याच्या जीवनात वस्तूबद्दल उपेक्षा असते; परमात्म्याबद्दल तटस्थता असते. व्यक्तीवर प्रेम करणाऱ्याला उच्च दर्जाच्या प्रेमाचा रस चाखता येतो. व्यक्तीवर प्रेम करणारा माणूस कृपण रहात नाही. त्याच्या जीवनात आनंद असतो, उत्साह असतो; पण व्यक्तीचे प्रेम हे कधी पूर्ण प्रेम होऊ शकत नाही. प्रेम करणाऱ्याला दुसऱ्याकडून शरणागतीची अपेक्षा असते. त्यामुळे व्यक्तीवर प्रेम करणे हा एक संघर्ष ठरतो. पुरुष स्त्रीवर प्रेम करतो तेव्हा स्त्रीला झुकवू पाहतो. स्त्री पुरुषावर प्रेम करते तेव्हा ती पुरुषाला झुकवू पाहते. पत्नीचं संपूर्ण समर्पण केले तर तिच्यातला त्याचा रस आटून जातो... ती मग एक वस्तू बनून जाते. म्हणून हिंदू लोक स्त्रीला संपत्ती मानतात... पुरुष संपूर्णपणे झुकला तर स्त्रीला तो पुरुष वाटतच नाही. व्यक्तींच्या प्रेमामध्ये दोन पर्याय कायम उपलब्ध असतात. प्रेमात रस मिळतो; तसाच संघर्षही मिळतो. या प्रेमात अहंकार असतो. गुरूकडे तुम्ही जाता तेव्हा त्याच्या ठायी समर्पित व्हावे लागते. पण कृपण व्यक्ती समर्पण करू शकत नाही... गुरू हा एकप्रकारे मृत्यू आहे आणि पुनर्जन्मही आहे. व्यक्तीवर प्रेम करणाऱ्या माणसाच्या आयुष्यात गुरू येण्याची दाट शक्यता असते. प्रेमामध्ये मिळणारे सुख ज्याला कळते तोच परमात्म्याच्या दिशेने जातो.

३. तिसऱ्या प्रकारचे प्रेम म्हणजे परमात्म्यावरील प्रेम. ते प्रेम पूर्ण प्रेम असते कारण तेथे तुम्ही झुकता. तुम्हाला झुका असे सांगणारा तेथे कोणी नसतो तरी तुम्ही झुकता. परमात्मा असा कोणी नसतोच. परमात्मा ही एक परम अनुपस्थिती आहे. म्हणून तुम्ही त्याला शोधले तरी तो कुठेच सापडत नाही. तो शून्यवत आहे. आकाशासारखा आहे. कबीर आकाश असा शब्द वारंवार वापरतात. परमात्म्याची प्राप्ती करून घेण्याचाही मार्ग नाही. लढण्याचा काही मार्ग नाही. फक्त स्वत: हरवून जाणे एवढेच आपल्या हाती असते. जो स्वत:ला गमवायला तयार असतो, त्यासाठी स्वत:चा अहंकार सोडायला तयार असतो, त्या क्षणी

**हिंदू, मुस्लीम, ख्रिश्चन हे सर्व मनाचे खेळ आहेत. गुरुद्वारा, मंदिर, मस्जिद या सर्वांची निर्मिती ही मनाची करामत आहे. धर्माकडे आपण मनाच्या दृष्टीतून बघतो म्हणून धर्मसुद्धा वाटला गेला आहे. मन ही तुकडे करण्याची प्रक्रिया आहे.**

प्रेमाचा परमअंश प्रकट होतो... सगळीकडे प्रकाशच प्रकाश मिळू लागतो.

व्यक्तीचे प्रेम द्विधा मन:स्थिती देते. व्यक्तीच्या प्रेमाचा रस्ता वस्तूच्या प्रेमाकडे जातो, किंवा नरकाकडे जातो...

व्यक्तीच्या प्रेमाच्या पलीकडे माणूस जातो तेव्हा परमात्म्याचे प्रेम जागृत होते. प्रीती लागी तुम नाम की– अशी नावाची प्रीती निर्माण होते... ही प्रीती गुरूमुळे निर्माण होते... गुरूबद्दलचे प्रेम वाढत जाते तसतसे परमात्म्याबद्दलच्या विरहाचे दाहकपण जाणवणे सुरू होते. हा विरह म्हणजे अर्धे मीलन– म्हणून त्याचा आनंद; पण समाधी अजून लाभलेली नाही याचे दु:ख. याची तळमळ. गुरू भेटला आता भीती नाही; आता तू भेटणे दूर नाही. गुरूची प्राप्ती झाली आता परमात्म्याची प्राप्ती होणारच... अब कबीर गुरू पाइया, मिला प्राण पियारा...

हे जग आहे असे आपण म्हणतो; पण हे जग कुठे आहे? दाही दिशा म्हणजे जग नव्हे. तिथे तर परमात्मा आहे. अकरावी दिशा म्हणजे जग नव्हे. तेथेही परमात्मा आहे. मग हे जग आहे कुठे?... जग म्हणजे मन. मनापासून मुक्त होणे म्हणजे जगापासून मुक्त होणे. हिंदू, मुस्लीम, ख्रिश्चन हे सर्व मनाचे खेळ आहेत. गुरुद्वारा, मंदिर, मस्जिद या सर्वांची निर्मिती हा मनाची करामत आहे. धर्माकडे आपण मनाच्या दृष्टीतून बघतो म्हणून धर्मसुद्धा वाटला गेला आहे. मन ही तुकडे करण्याची प्रक्रिया आहे. मन हा भ्रम आहे. आपण मनाला माया म्हणतो. मायेचा अर्थ भ्रम. खरं आणि खोटं यांच्यामधली स्थिती. म्हणूनच मनाला खोटं म्हणता येत नाही... नाही म्हणता येत नाही. मन क्षणभंगुर आहे. बुडबुड्यासारखं ते सारखं तयार होत असतं. सारखं नष्ट होत असतं. मन ही स्वप्नसदृश अवस्था आहे. झोपेमध्ये स्वप्न नष्ट होते. जागेपणी विचार नष्ट होतो– अशी अवस्था म्हणजे जगापासून मुक्ती.

मुक्ती हिमालयात जाऊन, बैरागी होऊन मिळत नाही. घर म्हणजे जग नाही. कुटुंब-प्रपंच म्हणजे जग नाही.

मनात जोपर्यंत अहंकार आहे, वासना आहे, विकार आहे तोपर्यंत जग आहे. मनाची विकृत अवस्था हा तुमच्या जगाचा मूलाधार आहे. जग सोडून पळू नका.



विकाराचा त्याग करा. मनाचा संबंध जगाशी आहे. आत्म्याचा संबंध परमात्म्याशी आहे. मन असेल तर चारी बाजूंना जग असेल. आत्मा झालात तर मन शिल्लक राहणार नाही... मन निर्मळ झाले तर कुठलेही स्वप्न उरत नाही. भ्रम नाही. विकार नाही. जब निर्मल करि जाना तब निर्मल माहि समाना... जब पापपुण्य भ्रमजारि, तब भयो प्रकाश मुरारी...

**परमात्मा म्हणजे अस्तित्व. परमात्मा ही व्यक्ती नाही. परमात्म्याला नाव गाव पत्ता काही नाही. सर्वांच्या आत लपून असलेला मूळ गुण- तो असण्याचा गुण हाच परमात्मा.**

नीतीचा परमात्म्याशी काही संबंध नाही.

नीतीचा धर्माशीही काही संबंध नाही.

नीतीचा संबंध समाजव्यवस्थेशी, सामाजिक चेतनेशी आहे.

चांगलं वागल्यानं चांगलं वागण्याची शक्यता वाढेल.

जगानं तुमच्याशी कसं वागावं असं तुम्हाला वाटतं, तसंच तुम्ही जगाशी वागा.

मन संपून जातं तेव्हा फुलातला परमात्मा फूल हे कळतं. दगडामधला परमेश्वर दगड दिसतो... सागरामध्ये सागर. वृक्षामध्ये वृक्ष.

परमात्मा म्हणजे अस्तित्व. परमात्मा ही व्यक्ती नाही. परमात्म्याला नाव गाव पत्ता काही नाही. सर्वांच्या आत लपून असलेला मूळ गुण– तो असण्याचा गुण हाच परमात्मा.

भ्रम गळून पडला की माझ्याकडे तोच जगतो आहे हे कळून येते. 'मी'चा शेवटचा आधारही गळून पडतो तेव्हा कर्तेपणाचेही विसर्जन होते...

तुम्ही नष्ट व्हाल, जीवन नष्ट होत नाही.

तुम्ही मराल, जीवन कधी मरत नाही.

ज्या दिवशी तुम्हाला आतली ज्वाला दिसेल त्या दिवशी तुम्ही म्हणाल; ''चालवा तुमची करवत... मी कापला जाणार नाही.''

मृत्यूचं भय नष्ट झालं की मृत्यूच्या क्षणीही अमृताचा वर्षाव होत राहील.

**पृष्ठे : १६० ● किंमत : १२०रु. ● सभासदांना : ९०रु. ● पोस्टेज : २०रु.**

## स्वातंत्र्यलढ्याचा संदर्भ असलेल्या कादंबऱ्या




१५ ऑगस्ट १९४७, भारताच्या या स्वातंत्र्यदिनाआधी आणि नंतर, राष्ट्रीय राजकारणावर, समाजकारणावर झालेल्या अंतर्बाह्य बदलांचा तसेच परिणामांचा सर्वंकष, अभ्यासपूर्ण आढावा.

### फ्रीडम ॲट मिडनाईट

**डॉमिनिक लॅपिए / लॅरी कॉलिन्स**


**अनु. माधव मोर्डेकर**

**३००रुपये**

---

भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील महत्वपूर्ण सहभाग असूनही इतिहासापासून अनाम अशा काही धीरोदात्त स्त्रीयांची अभ्यासपूर्ण दखल

### भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील स्त्रिया



**नवाझ मोदी**

**अनु. वासंती फडके**

**३००रुपये**

---




अखंड हिंदुस्थानची फाळणी हा एक रक्तलंछित काळा इतिहास. या इतिहासाच्या भयानक पर्वाचं; फाळणीच्या दाहक वास्तवाचं दर्शन घडवणारं अभ्यासपूर्ण पुस्तक

### द अदर साईड ऑफ सायलेन्स

**उर्वशी बुटालिया**

**अनु. नारायण आवटी**

**२५०रुपये**

**पोस्टेज प्रत्येकी २५रु.**

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**



## चला जाणून घेऊ या!
## चालणे




**चालण्याच्या व्यायामाविषयी विविध पैलूंतून दिलेली अनुभवसिद्ध माहिती**

**मोतिया बसर्गेकर**

चालणे हे माणसाच्या अस्तित्वाशी अटळपणे निगडित आहे. चालणे थांबले की माणसाचे सर्वत्र संचार करण्याचे सगळे सामर्थ्य व स्वातंत्र्य संकुचित होते. जन्मत: चालणे येत नसले तरी वर्ष-दीड वर्षाच्या मुलाला चालणे येऊ लागते. तोल सांभाळता येऊ लागतो आणि त्याला सर्वत्र सहजपणे जाण्यायेण्याची मुभा मिळते... प्रत्येकजण चालत असतो. रोजच्या रोज. तरीही चालणे या विषयावर एखादे पुस्तक कोणी लिहितो तेव्हा चिरपरिचित बाबीचेही एका नव्या रूपात आपल्याला दर्शन घडणार ही अपेक्षा राहतेच. नित्य परिचयाच्या व्यक्तीलाही आपण संपूर्ण जाणलेले असते असे नाही. निसर्गातील अनेक गोष्टी नित्यनियमित डोळ्यांपुढून जात असल्या तरी त्यांची कार्यपद्धती आपल्याला उमजलेली असतेच असे नाही. त्यामुळे चालणे या विषयावरचे हे छोटेखानी पुस्तकही काही नवे तंत्र-मंत्र देणारे असावे ही आपली कल्पना योग्यच म्हणावी लागेल.

चालण्याचे काही अनुभवसिद्ध ठोकताळे आहेत. त्यांचा अवलंब केल्यास शारीरिक दृष्ट्या फायदाच होईल.

उदाहरणार्थ,

* सकाळची वेळ चालण्यासाठी सर्वोत्तम. वर्दळ कमी असते, हवा शुद्ध असते.
* सकाळी चालणे हे वजनावर नियंत्रण ठेवण्यासाठी उपयुक्त आहे.
* दुपारी दहा-पंधरा मिनिटे जोरदार चालण्याने दुपारची झोप टाळता येते; आणि संध्याकाळपर्यंत कार्यक्षमता, उत्साह टिकून राहतो.
* रात्रीच्या जेवणानंतर चालल्याने झोप शांत व स्वस्थ लागते. तसेच पचनक्रियेचा वेग वाढतो; शरीरातील चरबी जिरवण्यास मदत होते. मात्र जेवणानंतर एका तासाने चालणे हितकारक.
* सार्वजनिक बागांमध्ये फेरफटका मारणे आदर्श होत. हिरव्यागार हिरवळीवर

**आयुष्यभराचा चालणं हा नित्यक्रम असल्याने पादत्राणांची निवड चोखंदळपणे करा. जास्तीत जास्त आराम देणारी पादत्राणे निवडा. मोज्याप्रमाणे पादत्राणे टाचेवर आणि पावलाच्या पृष्ठभागावर घट्ट बसली पाहिजेत.**

अनवाणी चालणे फारच सौख्यकारक ठरते.

* रानातही चालणे आनंददायक ठरते. तेथील शांतता व प्रसन्नता अपूर्व.

* वेळ असेल तर कामाला जाताना चालत जा.

* संधी मिळेल तेव्हा लिफ्टऐवजी पायऱ्यांनी जा.

* दर आठवड्याला वजन बघा. नियमित चालल्याने अतिरिक्त वजन हळूहळू कमी होताना दिसेल. चालण्याची मग अधिकच लज्जत वाटू लागेल.

* चालणं हा सर्वोत्तम व स्वस्त व्यायाम प्रकार आहे.

* सावकाश व हळूहळू, मंद गतीने चालण्यास सुरुवात करा. पुढे वेग झेपेल तसा वाढवा. स्वत:च्या क्षमतेपलीकडे स्वत:ला नेऊ नका.

* आरामशीर पादत्राणांचा वापर करा.

* आयुष्यभराचा चालणं हा नित्यक्रम असल्याने पादत्राणांची निवड चोखंदळपणे करा. जास्तीत जास्त आराम देणारी पादत्राणे निवडा. मोज्याप्रामाणे पादत्राणे टाचेवर आणि पावलाच्या पृष्ठभागावर घट्ट बसली पाहिजेत. तळपायाच्या नैसर्गिक आकाराशी तंतोतंत जुळली पाहिजेत.

* लांब पल्ल्याचा रस्ता चालण्यासाठी उंच टाचांचे पादत्राण टाळा.

* पादत्राण खरेदी करताना रूपापेक्षा उपयुक्ततेवर भर द्या.

* मोजे सुती अथवा लोकरीचे असावेत. बोटे हलवायला सोयीस्कर इतपत घट्ट असावे.

* पाठदुखी, सांधेदुखी, कोलेस्टेरॉलचे प्रमाण, हाडाची झीज, व्हेरिकोज् व्हेन्स आणि मधुमेह कमी करण्यासाठी चालण्याचा व्यायाम उपयुक्त ठरतो.

* लठ्ठ असणाऱ्यांनी सावकाश चालायला आरंभ करून नंतर वेग वाढवत न्यावा... मात्र त्या वेगानं चालताना त्रास जाणवता कामा नये.

* चालण्यानं पचनक्रियेचा वेग वाढतो. ३० मिनिटांच्या जोदार चालण्याने २०० उष्मांक जिरवता येतात.

* पायांच्या बोटांना खालच्या बाजूने थोडी पेट्रोलियम जेली लावा. फोड येण्याचे टळू शकेल.

* चालणे हे मुळातच सुरक्षित आहे. इतर खेळांप्रमाणे चालण्याने दुखापतीचा संभव नाही.

* कंबरेचे, मांड्यांचे व नितंबाच स्नायू बळकट करण्यासाठी चालण्याचा



**चालणाऱ्याने स्निग्धांश काटकसरीने खाणे हे आपल्या आहाराचे उद्दिष्ट ठेवले पाहिजे. उष्मांक साठवणे आणि कर्बोदके जिरवणे, पचनक्रियेला चालना देणे, फळे व भाज्या खाणे, चरबी, साखर आणि मीठ यांचा अतिरिक्त वापर टाळवा**

उपयोग होतो.

* ताणमुक्तीसाठी चालणे फारच श्रेयस्कर ठरते.

* नियमित जोमदार चालण्याची सवय– हृदयविकाराचा धोका ५० टक्के कमी करते.

* पायाने आपण चालतो. पायांद्वारे आपल्याला पृथ्वीची ऊर्जा मिळते.

* श्वास रोखून धरण्याप्रमाणेच चालण्याने ध्यान साधते.

* चालण्याने ध्यान व आध्यात्मिक प्रगतीचा पाया तयार होतो.

* चालण्याने झोप उत्तम लाभते. मानसिक, शारीरिक आरोग्य वाढते.

* चालण्याने त्वचेची छटा सुधारते. ही एक प्रतिबंधक औषधोपचार पद्धती आहे.

उत्तम आरोग्य राहण्यासाठी चालण्याचा बिनखर्चिक असा हा मार्ग उपलब्ध असूनही अनेकजण त्याबाबत अनभिज्ञ असतात. चालण्याबरोबर आहाराकडेही लक्ष दिले तर शारीरिक-मानसिक दृष्ट्या निकोप, निरामय जीवन जगणे शक्य होते. चालणाऱ्याने स्निग्धांश काटकसरीने खाणे हे आपल्या आहाराचे उद्दिष्ट ठेवले पाहिजे. उष्मांक साठवणे आणि कर्बोदके जिरवणे, पचनक्रियेला चालना देणे, फळे व भाज्या खाणे, चरबी, साखर आणि मीठ यांचा अतिरिक्त वापर टाळणे, प्राणवायूच्या मदतीने पचनक्रियेचा वेग वाढवून अन्नाचे रूपांतर उष्णता व ऊर्जेत करणे ह्या सर्व गोष्टी चालण्याचा व्यायाम आणि योग्य आहार यामुळे साध्य होऊ शकतात.


अन्न मार्गदर्शक पिरॅमिडची संकल्पना त्यासाठी अमेरिकेत वापरली जाते.

(अ) ब्रेड, धान्ये, भात (ब) भाज्या, फळे (क) दूध, दही, चीज,मासे, अंडी, सुकामेवा (ड) चरबी तेले (इ) साखर, गोड पदार्थ, कार्बनडायऑक्साइड मिश्रित पेये– असे पिरॅमिडचे तळापासून वर पाच भाग केले तर तळाशी असणारे पदार्थ जास्त खा आणि टोकाशी असलेले पदार्थ कमी खा; असा साधा-सोपा सल्ला त्याद्वारे दिला जातो. सॅलड, आल्याच्या शेंगा, टोमॅटोची पचडी, दहीबटाटे, भाज्यांचे आम्लेट, सँडविचेस्, कोबी रोल, व्हेज पुलाव, पास्ता, भाज्यांचे सांबार, टोमॅटो भात, कोफ्ता, मुळापराठा, मेथी रोटी, मँगो राइस इ. पदार्थांच्या कृतीही देण्यात आल्या आहेत.

चालण्याविषयी अशी वेगवेगळ्या पैलूतून दिलेली या पुस्तकातील माहिती तुमच्या आरोग्याचा नवा पाया घालून तुमच्या जीवनात आरोग्यमय परिवर्तन घडवून आणू शकेल.

**पृष्ठे : १०४ ● किंमत : ३०रु. ● सभासदांना : २२रु. ● पोस्टेज :२०रु.**

## विश्वसाहित्यातील दर्जेदार..... जेफ्री आर्चर



जेफ्री आर्चर... पाश्चात्य जगतातले एक सिद्धहस्त कादंबरीकार. इंग्लंडमधील सॉमरसेट या परगण्यात त्यांचा जन्म झाला. उच्चशिक्षण ऑक्सफर्ड विद्यापीठात.

१९६९ साली ब्रिटीश पार्लमेंटचे सर्वात तरुण सभासद म्हणून ते निवडून आले. १९७३ साली एका कॅनेडियन कंपनीत त्यांनी दहा लाख डॉलर्स गुंतवले त्यात त्यांची फसवणूक झाली आणि जेफ्री कफल्लक झाले.

आर्थिक दिवाळखोरीमुळे उद्विग्न झालेल्या जेफ्री यांनी आपल्या अनुभवावर आधारित 'नॉट अ पेनी मोअर, नॉट अ पेनी लेस' ही कादंबरी लिहिली. अनपेक्षितपणे ही कादंबरी तुफान गाजली आणि तिच्या तब्बल एक कोटी प्रती खपल्या. जेफ्री आर्थिक दिवाळखोरीतून बाहेर आले. या घटनेमुळे त्यांच्या आयुष्याला कलाटणी मिळाली व अत्यंत यशस्वी कादंबरीकार म्हणून त्यांनी भविष्यात नावलौकिक कमावला.

आज जेफ्री यांच्या नावावर तब्बल ३८ साहित्यकृती जमा आहेत. समाजातील गुन्हेगारी, देशांतर्गत राजकारण, आंतरराष्ट्रीय संघर्ष यांचे प्रतिबिंब त्यांच्या कादंबऱ्यात आढळते.


जेफ्री यांच्या सर्वाधिक गाजलेल्या व तब्बल एक कोटी प्रती खपलेल्या या कादंबऱ्यांचा हा उत्कृष्ट अनुवाद.....

### नॉट अ पेनी मोअर, नॉट अ पेनी लेस

**अनु. अंजनी नरवणे**

**१२०रु.**

**पोस्टेज २०रु.**




### सन्स ऑफ फॉर्च्यून




**अनु. अजित ठाकूर**

**३५०रु.**

**पोस्टेज ३०रु.**


**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**




# कादंबऱ्या

### वज्रकमल घननील

धनंजय देशपांडे

**२००रु.**

**पोस्टेज २५रु.**




श्रीकृष्णाच्या अद्‌भुत जीवनावरील विविध कथाभागातून त्याचे एकमेवाद्वितीयत्व प्रकट करणारी कादंबरी.

महाभारताचा व त्यातील दैवी व्यक्तीरेखांचा वास्तव आणि मानवी दृष्टीकोनातून घेतलेला मूलगामी परामर्ष




### पर्व

डॉ. एस. एल. भैरप्पा

अनु. उमा कुलकर्णी

**३५०रु.**

**पोस्टेज ३०रु.**

### एकलव्य

शरद दळवी

**२००रु.**

**पोस्टेज २५रु.**




निष्ठेचे, सत्याचे, समर्पणाचे नवे मानदंड सिद्ध करणारा पहिला सर्वोत्तम शिष्य! त्याची ही चरितकहाणी


**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**

**खास दीपावलीनिमित्त** **फक्त सभासदांसाठी**

# दीप योजना

आमच्या प्रकाशनाची कोणतीही
दर्शनी २५००रु. किंमतीची पुस्तके घ्या व त्यावर मिळवा
दर्शनी ८७५रु. किंमतीची पुस्तके मोफत!
दर्शनी २०००रु. किंमतीची पुस्तके घ्या व त्यावर मिळवा
दर्शनी ६००रु. किंमतीची पुस्तके मोफत!
दर्शनी १५००रु. किंमतीची पुस्तके घ्या व त्यावर
मिळवा दर्शनी ४००रु. किंमतीची पुस्तके मोफत!

म्हणजेच २५००रु. द्या व ३३७५रु. ची पुस्तके मिळवा.
२०००रु. द्या व २६००रु. ची पुस्तके मिळवा.
१५००रु. द्या व १९००रु. ची पुस्तके मिळवा.

**पोस्टखर्च वेगळा अंदाजे १००रु.**

**मुदत १ सप्टेंबर २००६ ते ३१ डिसेंबर २००६**

योजनेचा लाभ घेण्यासाठी आजच सभासद व्हा.
संपूर्ण सूची मागवा.
योजना पुस्तके उपलब्ध असेपर्यंतच!

## दीप योजनेतील मोफत पुस्तकांची यादी

| | | |
|---|---|---|
| अभोगी | रणजित देसाई | १५०/- |
| पावनखिंड | रणजित देसाई | १००/- |
| समिधा | रणजित देसाई | १००/- |
| प्रतिक्षा | रणजित देसाई | ८०/- |
| आलेख | रणजित देसाई | १२०/- |
| तुझी वाट वेगळी | रणजित देसाई | ६०/- |
| संचित (निवडक अध्यक्षीय भाषणे) | रणजित देसाई | ६०/- |



| | | |
|---|---|---|
| पहिले प्रेम | वि. स. खांडेकर | ९०/- |
| दोन ध्रुव | वि. स. खांडेकर | १८०/- |
| क्रौंचवध | वि. स. खांडेकर | १८०/- |
| फुले आणि काटे | वि. स. खांडेकर | ६०/- |
| प्रसाद | वि. स. खांडेकर | १५०/- |
| वेचलेली फुले (अनु.) | वि. स. खांडेकर | ५०/- |
| अविनाश | वि. स. खांडेकर | ५०/- |
| रानफुले | वि. स. खांडेकर | ७०/- |
| आस्तिक | वि. स. खांडेकर | ६५/- |
| माऊली | आनंद यादव | १२०/- |
| नटरंग | आनंद यादव | १४०/- |
| माळावरची मैना | आनंद यादव | ११०/- |
| उखडलेली झाडं | आनंद यादव | १५०/- |
| भूमिकन्या | आनंद यादव | ९०/- |
| झाडवाटा | आनंद यादव | ९०/- |
| उगवती मने | आनंद यादव | १००/- |
| पाणभवरे | आनंद यादव | १२५/- |
| ग्राम संस्कृती | आनंद यादव | १२५/- |
| वपु ८५ | व. पु. काळे | ६०/- |
| सखी | व. पु. काळे | १२०/- |
| रंग मनाचे | व. पु. काळे | १८०/- |
| तू भ्रमत आहासी वाया | व. पु. काळे | ७०/- |
| ही वाट एकटीची | व. पु. काळे | १२०/- |
| पाणपोई | व. पु. काळे | ५०/- |
| प्लेझर बॉक्स भाग-१ | व. पु. काळे | १६०/- |
| प्लेझर बॉक्स भाग-२ | व. पु. काळे | २००/- |
| चिअर्स | व. पु. काळे | १००/- |
| कथा ही दिवावादळाची (अनु.) | वि. स. वाळिंबे | १००/- |
| वॉर्सा ते हिरोशिमा | वि. स. वाळिंबे | ३००/- |
| नेताजी (सुभाषचंद्र बोस) | वि. स. वाळिंबे | ३५०/- |
| ध्यानसूत्र | अनु. माधव कर्वे | १००/- |
| मी धार्मिकता शिकवतो, धर्म नाही | अनु. मृणालिनी गडकरी | १००/- |
| विद्रोही | अनु. माधुरी काबरे | १२०/- |
| लज्जा | अनु. लीना सोहोनी | १२५/- |
| नष्ट मेयेर नष्ट गद्य | अनु. मृणालिनी गडकरी | १२०/- |
| निर्बाचित कबिता | अनु. मृणालिनी गडकरी | ७०/- |

| | | |
|---|---|---|
| फरासि प्रेमिक | अनु. सुप्रिया वकील | २००/- |
| चौघीजणी | शान्ता शेळके | ३००/- |
| पूर्व संध्या | शान्ता शेळके | ५०/- |
| कविता स्मरणातल्या | शान्ता शेळके | १२०/- |
| सांगावेसे वाटले म्हणून | शान्ता शेळके | १००/- |
| मजल दरमजल | अनु. भारती पांडे | ८०/- |
| ॲज आय सी... | अनु. माधुरी शानभाग | २००/- |
| निसर्गपुत्र (अनु.) | निरंजन घाटे | ८०/- |
| पर्यावरण प्रदुषण | निरंजन घाटे | १३०/- |
| वेध पर्यावरणाचा | निरंजन घाटे | १५०/- |
| वसुंधरा | निरंजन घाटे | २५०/- |
| यंत्रलेखक | निरंजन घाटे | ११०/- |
| फार फार वर्षापूर्वी | निरंजन घाटे | १२०/- |
| युगंधर (विज्ञान) | निरंजन घाटे | १००/- |
| विदेशी विज्ञान चित्रपट | निरंजन घाटे | १२०/- |
| नवे शतक | निरंजन घाटे | १५०/- |
| हॅलो, मी इन्स्पेक्टर प्रधान बोलतोय | व. कृ. जोशी | १२०/- |
| रक्तदान | व. कृ. जोशी | १३०/- |
| निर्मनुष्य | रत्नाकर मतकरी | १००/- |
| मध्यरात्रीचे पडघम | रत्नाकर मतकरी | १००/- |
| मुलांसाठी गमती-जमतीचा स्वयंपाक : रोहिणी सिंग | अनु. आशा परुळेकर | ६०/- |
| मायक्रोवेव्ह ओव्हन | राजश्री नवरे | ७०/- |
| अन्नसंरक्षण | राजकुमार कांबळे | १२०/- |
| अंतराळ | अनु. उमा कुलकर्णी | १००/- |
| अवस्था | अनु. उमा कुलकर्णी | ११०/- |
| डोंगराएवढा | अनु. उमा कुलकर्णी | ८०/- |
| नियती | माधवी देसाई | ६०/- |
| धुमारे | माधवी देसाई | ७०/- |
| किनारा | माधवी देसाई | ९०/- |
| शुक्रचांदणी | माधवी देसाई | १००/- |
| अणसार | अनु. अंजनी नरवणे | १८०/- |
| वडवाई | अंजनी नरवणे | २००/- |
| तत्त्वमसि | अंजनी नरवणे | १४०/- |
| टेक् २५ | अनु. अंजनी नरवणे | ४००/- |



| | | |
|---|---|---|
| गहाण पडलेली टेकडी | अनु. अंजनी नरवणे | १२०/- |
| कॉंगो : मायकेल क्रायटन | अनु. अरुण मांडे | १६०/- |
| डिस्क्लोजर : मायकेल क्रायटन | अनु. माधव कर्वे | २२०/- |
| ज्युरॅसिक पार्क : मायकेल क्रायटन | अनु. डॉ.प्रमोद जोगळेकर | २५०/- |
| द फोर्थ के : मारिओ पुझो | अनु. वनिता सावंत | २००/- |
| क्रोमोझोम-६ : रॉबिन कुक | अनु. वैशाली जोशी | ३५०/- |
| द हॉट झोन : रिचर्ड प्रेस्टन | अनु.डॉ.प्रमोद जोगळेकर | २००/- |
| काळोखाची लेक : कॅथरीन दी जीजस | अनु. सरिता पदकी | १५०/- |
| द ब्रेडविनर : डेबोरा एलीस | अनु. अपर्णा वेलणकर | १००/- |
| द ब्लाइन्ड असॅसिन : मार्गरेट ॲटवूड | अनु. चारूता नानिवडेकर | २५०/- |
| चाईल्ड ऑफ द होलोकॉस्ट : जॅक कूपर | अनु. सिंधू जोशी | १३०/- |
| देवदास : शरच्चंद्र चट्टोपाध्याय | अनु. मृणालिनी गडकरी | ९०/- |
| ब्लास्फेमी : तेहमिना दुर्रानी | अनु. भारती पांडे | १००/- |
| शिवा डान्सिंग : भारती कर्चनर | अनु. मंजुषा गोसावी | २५०/- |
| संस्कार : यू. आर. अनंतमूर्ती | अनु. लोकापूर/कानिटकर | ८०/- |
| द कंपनी ऑफ विमेन | खुशवंत सिंग | २००/- |
| स्पीड पोस्ट : शोभा डे | अनु. अपर्णा वेलणकर | २५०/- |
| द्वंद्व : विजयदान देथा | अनु. वनिता सावंत | १५०/- |
| रावीपार : गुलजार | अनु. पाडळकर/वेल्हाळ | १५०/- |
| अंतर-पर्व (रशियन कथा) | अनु. सुनीती देशपांडे | १३०/- |
| द स्ट्रीम विदिन (बंगाली कथा) | अनु. मीना वैशंपायन | १३०/- |
| इंटरप्रिटर ऑफ मॅलडीज् : झुंपा लाहिरी | अनु. भारती पांडे | १७०/- |
| रेशीमगाठी | कांचन घाणेकर | १००/- |
| भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील स्त्रिया : नवाझ मोदी | अनु. वासंती फडके | ३००/- |
| योद्धा शास्त्रज्ञ : राष्ट्रपती ए.पी.जे. अब्दुल कलाम | माधव मोर्डेकर | ४०/- |
| मोरावळा | शिवाजी सावंत | ६०/- |
| थॉट लीडर्स : श्रीनिवास पंडित | अनु. वकील / वाडकर | ३००/- |
| छत्रपती राजर्षी शाहू महाराज | तु. बा. नाईक | १००/- |
| मदर टेरेसा : ॲन सेबा | अनु. अनंत बेदरकर | २५०/- |
| चेहऱ्यामागचे चेहरे | महादेव मोरे | १५०/- |
| देव जो भूवरी चालिला : साईबाबा रंगास्वामी पार्थसारथी | अनु. लीना सोहोनी | १२०/- |
| जीवनयात्रा : अभिनेता-दिग्दर्शक मा. विनायक | भाई भगत | १५०/- |

| | | |
|---|---|---|
| द जॉय ऑफ कॅन्सर : अनुप कुमार | अनु. माधुरी शानभाग | १५०/- |
| मनावर विजय : एकनाथ ईश्वरन् | अनु. वैशाली जोशी | १२५/- |
| चिंतामुक्त जीवन | आर. डी. मुनोत | १६०/- |
| असे बना अन् बनवा विद्यार्थी | शं. व्यं. काश्यपे | १००/- |
| एकच पेला शिवाम्बूचा | डॉ. शशि पाटील | ९०/- |
| रेकी | शुभदा दामले | ६०/- |
| तारकांच्या विश्वात | पराग महाजनी | ३५०/- |
| सभेत कसे बोलावे | श्याम भुरके | ६०/- |
| महिलांसाठी उद्योग व्यवसाय | गंगाधर महाम्बरे | ९०/- |
| कॉंप्युटरच्या करामती | डॉ. बाळ फोंडके | ५०/- |
| फक्त खेळण्यांसाठी | डी. एस्. इटोकर | ७०/- |
| चला, प्रयोग करू या! | | |
| उर्जा | मीना किणीकर | २०/- |
| उष्णता | मीना किणीकर | २०/- |
| अन्न | मीना किणीकर | २०/- |
| परिस्थितीशास्त्र | मीना किणीकर | २०/- |
| रसायने | मीना किणीकर | २०/- |
| अवकाश | मीना किणीकर | २०/- |
| हवास्थिती | मीना किणीकर | २०/- |
| गती : चलन | मीना किणीकर | २०/- |
| ध्वनी | मीना किणीकर | २०/- |
| वाचनातून विज्ञान | डी. एस्. इटोकर | १००/- |
| शास्त्र-गंमत जत्रेत चौकस चिंगी : | अनु. मीना किणीकर | ७०/- |
| नवचैतन्याचा झरा : डॉ. बाळ फोंडके | अनु. डॉ.प्रमोद जोगळेकर | ६५/- |
| संभव असंभव | अनु. डॉ.प्रमोद जोगळेकर | ८०/- |
| मेंदू आणि वर्तन | अनु. डॉ.प्रमोद जोगळेकर | ७०/- |
| देव?छे!परग्रहावरील अंतराळवीर | बाळ भागवत | १००/- |
| विज्ञान प्रपंच | डॉ. बाळ फोंडके | १५०/- |
| ग्यानबाचं विज्ञान | डॉ. बाळ फोंडके | १३०/- |
| नॉस्त्रादेमसची भविष्यवाणी | सुरेशचंद्र नाडकर्णी | ८०/- |
| शेतकऱ्याचा असूड | संपा.डॉ.नागनाथ कोत्तापल्ले | ७०/- |
| सुंदर आपली फुलबाग | आ. बा. पाटील | १००/- |
| सुंदर आपला रोपमळा | आ. बा. पाटील | १२०/- |
| एकवचनी | संजय राऊत | ३५०/- |
| प्रहार | प्रकाश पोहरे | १५०/- |



| | | |
|---|---|---|
| आपल्या आत्म्यांची लुटालूट : अरुण शौरी | अनु. सुधा नरवणे | ३००/- |
| द अदर साईड ऑफ सायलेन्स | | |
| उर्वशी बुटालिया | अनु. नारायण आवटी | २५०/- |
| धर्मयुद्ध | डॉ. रवींद्र ठाकूर | २५०/- |
| भंडारभोग | राजन गवस | १५०/- |
| तीन दगडाची चूल | विमल मोरे | १५०/- |
| काट्यावरची पोटं | उत्तम बंडु तुपे | १००/- |
| वज्रकमळ घननीळ | धनंजय देशपांडे | २००/- |
| मृद्गंध | इंदिरा संत | १६०/- |
| कांचनकण | शिवाजी सावंत | ८०/- |
| रंगल्या रात्री | संकलनः अरुण शेवते | ८०/- |
| स्वप्नी जे देखिले | संकलनः अरुण शेवते | ९०/- |
| सुखशांतीच्या शोधात | अंजली ठकार | १००/- |
| या सुखांनो | सुरेश नाईक | १७०/- |
| भारतीय शिल्प वैभव | सु. र. देशपांडे | १५०/- |
| ग्रामीण बोलीचा शब्दकोश | द. ता. भोसले | ११०/- |
| पत्रकारितेची मुलतत्त्वेः प्रभाकर पाध्ये | अनु. प्र. ना. परांजपे□/ | |
| | वसुधा परांजपे | ७०/- |
| चांगदेव पासष्टी | वा. पु. गिंडे | ३०/- |
| शिवार | विजय कुवळेकर | १००/- |
| ईगीन | महादेव मोरे | १५०/- |
| सामक्षा | सुमेध वडावाला(रिसबूड) | २००/- |
| कालिंदीच्या तीरावरती | य. दि. फडके | ७५/- |
| सिरसी | सतीश सुरवसे | ७०/- |
| शोधकथा इन्सपेक्टर व्ही अनंतांच्या | अनंत वाईकर | १६०/- |
| कोंडवाडा | दया पवार | ४०/- |
| उत्सव | सुप्रिया वकील | ५०/- |
| काळोख देत हुंकार | दिलीप परदेशी | ४०/- |
| नाटक | दिलीप परदेशी | १२/- |
| अखेरचा सवाल | वसंत कानेटकर | ७०/- |
| मराठी व्याकरण परिचय | राजशेखर हिरेमठ | ८०/- |
| कुसुमाग्रज/शिरवाडकर एक शोध | डॉ. द. दि. पुंडे | ७०/- |
| निवडक 'भाषा आणि जीवन' | संपा. कल्याण काळे/ | |
| | मृणालिनी शहा | २००/- |
| एकनाथांची निवडक भारुडे | डॉ. वसंत जोशी | ४०/- |

## सार्धसुधं...

### मैत्री म्हणजे काय रे?

**प्रमोदिनी वडके-कवळे**

दोन दिवसांची जोडून रजा मिळाली म्हणून एकटीच बंगलोरला मुलाकडे निघाले होते. लांबलचक कंटाळवाणा प्रवास. झोपेतले किमान सात तास काही चिंता नव्हती; पण उरलेले अकरा तास एकटीने काढायचे, मुख्य म्हणजे इतका वेळ तोंड बंद ठेवायचं हे माझ्यासाठी मोठं संकट होतं. पण सुदैवाने माझ्या डब्यात माझ्यासारखीच एक एकटी होती. आणि तिलाही बोलण्याची इच्छा दिसत होती. ओळख झाली आणि दोघी सुटलोच. विषयांचा तुटवडा नव्हताच. आवडलेल्या पुस्तकाच्या कथेपासून ते बिघडलेल्या पदार्थाच्या रेसिपीपर्यंत सगळे विषय हाताळून झाले आणि गाडी मैत्रीवर येऊन थांबली. शाळेतली गाभुळल्या चिंचेची निष्कपट 'मैत्री', कॉलेजमधली फुलपाखरी वृत्तीची तरुण 'कंपनी', नोकरीतला समजूतदार 'सहयोग', शेजारणींशी जुळून येणारा व्यवहारी 'सोयसंवाद'... अशा वेगवेगळ्या कोनातून तो विषय फिरत राहिला आणि इतका रंगला की रात्रीची जेवणं झाल्यावर इतर सहप्रवाशांनी दिवे मालवले तेव्हा नाइलाज होऊन आम्ही थांबलो. झोपायला आडव्या झालो तरी सहज गप्पांच्या निमित्ताने छेडला गेलेला तो विषय दिव्याबरोबर विझला नाही. झोप येईपर्यंत अधूनमधून हवापाण्यावर थोडंफार बोलत राहिलो तरी, मनात त्या मैत्रीवर भरभरून बोलण्याची ओढ तशीच जागी राहिली.

शाळेत असताना पुस्तकातली आणि सिनेमातली मैत्री मोहवून जायची. एकमेकांसाठी प्रेयसी प्रियकरापासून अगदी प्राणांचाही त्याग करायला एका पायावर तयार असणारी मैत्रीच खरी असं वाटायचं. मी आणि विभा. एरवी आमची दोघींची फार मैत्री नव्हती. पण आम्हाला दोघींना वाचनाचा खूप नाद होता. वाचलेली प्रत्येक कथाकादंबरी एकमेकींना सांगून त्यावर अगदी तत्त्वज्ञानाचा आव आणून गंभीर चेहऱ्याने साग्रसंगीत चर्चा केल्याशिवाय आमचं वाचन पूर्ण व्हायचं नाही.

नात्यांच्या विविध छटांमधून व्यक्त होणाऱ्या प्रेमाने भारावण्याचं ते वय होतं. व्यवहार किंवा वास्तव या नुसत्या शब्दाबद्दलसुद्धा दुष्ट खलनायकाइतका राग यायचा.

त्यावेळी आम्ही दोघींनी एक कादंबरी वाचली होती. गाढ मैत्री असलेल्या दोन मित्रांमध्ये एका स्त्रीवरून शत्रुत्व येतं. पण नंतर त्या दोघांनाही आपली चूक



समजते आणि आपल्या मैत्रीपुढे या जगातल्या धन-दौलत, स्त्री असल्या गोष्टी केवळ फिजूल आहेत असं ठरवून ते दोघं पुन्हा पूर्वीपेक्षा अधिक घट्ट मित्र होतात. असं त्या कादंबरीचं कथानक होतं. खरं म्हणजे हा जगात कथा लिहायला सुरुवात झाल्यापासून चालत आलेला, चघळून अगदी चोथा झालेला विषय! पण आम्ही दोघींनी अशा प्रकारची पहिलीच कथा वाचली होती. लेखकाचं शब्दसामर्थ्य आणि कथानक विणण्याचं कौशल्य आमच्या कोवळ्या विचारांना जबरदस्त भारावून टाकणारं होतं. खूप दिवस ती कादंबरी आमच्या मनात आणि गप्पांतही घोळत राहिली होती. त्यावेळी आम्ही मोठ्या विचारवंतांच्या थाटात अगदी टोकाचा निष्कर्ष काढला होता. अशी दिव्य मैत्री केवळ पुरुषांच्यातच होऊ शकते. बायका मत्सरी असतात. एवढेतेवढे रागलोभ मनात धरून ठेवणाऱ्या असतात. भेकड असतात. कुणासाठी स्वत:ला झोकून त्यागबिग करणं ही त्यांच्या बसकी बात नसते. त्यामुळे त्यांच्या मैत्रीला मर्यादा असतात. घरातल्या माणसांच्या तालावर त्यांचं वागणं अवलंबून असतं. पुरुषांसारखी त्या मैत्रिणींशी (त्यावेळी स्त्री आणि मित्र हे दोन शब्द एकत्र आणायला व्याकरणाचीसुद्धा बंदी होती.) आयुष्यभराची बांधिलकी ठेवूच शकत नाही... इ. इ. हा सिद्धांत पुढे कितीतरी खाजगी वादचर्चा आणि अगदी जाहीर वक्तृत्व स्पर्धेतही आम्ही दोघी ठासून मांडत राहिलो होतो. पुढे आमच्या सिद्धांतानुसार आम्ही दोघी वडिलांची बदली, नोकरी, लग्न अशा वेगवेगळ्या कारणाने एकमेकींपासून दूर गेलो आणि आमचा सिद्धांत खराच असल्याचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. आज गाडीतल्या गप्पांच्या निमित्ताने ते सगळं आठवलं. कथाकादंबऱ्यांत कितीही रंगवलं तरी, अशी मैत्री प्रत्यक्षात कधीच शक्य नसते हे सत्य आता वयाअनुभवानुसार पटून गेलं होतं. त्यामुळे तेव्हाच्या भाबड्या विश्वासाचं मनापासून हसू आलं. आणि रात्रीच्या अंधारात आणि रेल्वेच्या हलत्या लयीत अकस्मात एक भलंमोठं प्रश्नचिन्ह मनात शिरलं. मैत्री म्हणजे नेमकं काय? त्या त्या क्षणापुरती असलेली अनिवार ओढ? की जन्मभरासाठी एकमेकांशी बांधून घेणं? शरीराने दूर गेलं तरी एकमेकांच्या सुखदु:खावर स्वत:च्या अस्तित्वाची सावली धरून राहणं? की स्वत:च्या व्यापातून जमेल तेव्हा सोयीसवडीने एकमेकांची सुखदु:खं विचारणं?

सकाळच्या चहाबरोबर माझ्या त्या सहप्रवासिनीने पुन्हा सुरू केलं. आजपर्यंतच्या आयुष्यातली तुझी सगळ्यात जवळची मैत्रीण कोण? 'माधवी.' एका क्षणाचाही विलंब न लावता मी उत्तर दिलं... आणि मग ओल्या जखमेवरची खपली काढावी तशी माधवीबद्दल भरभरून बोलत सुटले.

माधवी ना माझ्या वर्गातली, ना शाळेतली, ना गावातली... तिच्या मामाचं घर आमच्या घराजवळच होतं. सुटीत ती मामाकडे यायची तेव्हा ओळख झाली. तिच्या मामाकडे सगळी मुलंच म्हणून आमचं दोघींचं गूळपीठ जमायचं. पण ते

त्या सुटीच्या दिवसांपुरतंच असायचं. सुटी संपली की, पुन्हा ती मामाकडे येईपर्यंतच्या दिवसांत आमची मैत्री हिवाळ्यातल्या छत्रीसारखी मिटून रहायची. माधवी प्रेमात पडली. तरुण वयातलं ते गुलाबी गुपित तिने पहिल्यांदा मलाच सांगितलं. कारण तो मुलगा आमच्याच गावातला होता.

मग माझ्याबरोबर बाहेर जायचं निमित्त करून दोघांच्या भेटीगाठी. दुपारच्या वेळी मला मधे घालून एकमेकांशी गप्पा, चिडवणं, लाजणं, भांडणं, समजावणं. या सगळ्याची एकमेव साक्षीदार मी. माधवीच्या घरी विरोध झाला तेव्हा माझ्यामार्फत चिठ्ठ्या पाठवणं... शेवटी त्या दोघांचं लग्न झालं. नंतर माधवीने आग्रहाने मला तिचा संसार बघायला मुंबईला बोलावलं. नंतर मीही इंटरव्ह्यू, नोकरी, लग्न अशा चक्रात पुण्याला अडकले. त्यामुळे दोघींची निवांत भेट, संवाद असं काही जमलंच नाही. श्रावणातल्या पावसात पडणाऱ्या इंद्रधनुष्यासारखी आमची मैत्री हळूहळू पुसट होत गेली.

आणि काही वर्षांनी काही ध्यानीमनी नसताना तिच्या आईचं पत्र आलं. माधवी गेली!

मी हबकलेच. आयुष्यातले ते कोवळे अलवार दिवस मनावर हुळहुळून गेले आणि माधवीसाठी मी अगदी फुटून फुटून रडले. या घटनेलाही आता दहा-बारा वर्षे होऊन गेलीयत. पण अजूनही तिची आठवण मला व्याकुळ करून जाते. तिचा विषय निघाला की मी भरभरून बोलत राहते. फारसा सहवास नसतानाही तिने मला इतकं जवळचं मानणं, माझ्यावर टाकलेला विश्वास, माझ्यावर केलेलं प्रेम सगळं सगळं समोरच्या माणसाला चक्रवाढीच्या हिशेबाने सांगत राहते. आज माझ्या सहप्रवासिनीला सांगितलं तसंच!

माझी कहाणी संपल्यावर तिनेही तिच्या एका बालमैत्रिणीबद्दल सांगून मला विचारलं, ही बालपणीची मैत्री झाली. आपल्याला कळत नसतं तेव्हा ती आपोआप होते आणि पुढे चालू राहते. पण कळत्या वयात जाणूनबुजून जिच्याशी मैत्री झाली अशी एखादी मैत्रीण. अ...

तिचं ते वाक्य पुरं व्हायच्या आधीच मला संजी आठवली.

संजीवनी पावसे. माझी ऑफिसमधली मैत्रीण.

आमची दोघींची भेट इंटरव्ह्यूच्या वेळीच झाली. त्यावेळच्या गप्पांमध्ये दोघींचीही एकमेकींवर छाप पडली तरी, मनात स्पर्धेचा सूक्ष्म ताणही होता. इथली नोकरी कुणाला मिळेल?

पण चक्क तिथल्या नोकरीसाठी आमची दोघींचीही निवड झाली. ऑफिसमधल्या वातावरणात आम्ही दोघीही नवख्या. त्यामुळे आपोआपच आम्ही समदुःखी, समसुखी झालो. दिवसभराच्या कामात घडणाऱ्या गमतीजमती बाहेर कुणाला सांगून कळायच्या नाहीत. त्यासाठी तिथलीच मैत्रीण हवी... म्हणून संवाद जुळत गेला. बाथरूम असो की, कॅन्टीन कुठेही जायला एकमेकींची सोबत लागायला लागली. आमचे- किंवा आमच्या मैत्रीचे म्हणा हवं तर- ग्रह असे की नशिबाचं दान दोघींना सारखंच पडत गेलं. प्रमोशन, लग्न, पहिलं मूल... आयुष्यातले बरेचसे महत्त्वाचे टप्पे आम्ही एकाचवेळी पार केले. त्यामुळे त्या-त्या संदर्भातल्या सुखदुःखाशी आपोआपच एकमेकींची सोबत जोडली गेली. जोडीदाराबरोबरचे रुसवेफुगवे, सासूबाईंचा स्वभाव, मुलांची आजारपणं, त्यांची शाळेतली प्रगतीष्ठ, आपल्या सामान्य स्त्रीच्या आयुष्यातली वादळं अशी मर्यादितच असतात. पण त्यासाठी आम्ही दोघींनी एकमेकींचा आधार घेतला. साहजिकच ऑफिसमधल्या दोन सहकाऱ्यांमध्ये असतो त्यापेक्षा आमच्या दोघींचा स्नेह जरा जास्त दाट होता. मनाच्या तारा अशा जुळून आल्या होत्या की एखादा सूर वेगळा उमटला तरी मैत्रीचं संगीत बेसूर होत नव्हतं.

पण कसा कोण जाणे एकदा आमच्यात जरा जोरदार वाद झाला. खरं म्हणजे तो ऑफिसमधल्याच कामाच्या बाबतीत होता, पण आम्ही दोघींनीही तो जरा जास्तच मनावर घेऊन त्याला व्यक्तिगत स्वरूप दिलं. त्यावरून अबोला आणि उगीच ताणून धरणं. दिलजमाईचा प्रयत्न दोघींकडूनही झाला नाही. दोनचार दिवसांनंतर आमच्या इतर सहकाऱ्यांनी मधे पडायचा प्रयत्न करून बघितला. पण आता पडतं घेणं हा दोघींच्याही प्रतिष्ठेचा प्रश्न होता. एकमेकींचे आधी ठाऊक असलेले दोष नव्याने आठवत राहिले. त्यावरून आडून आडून टोमणे मारून झाले आणि बाब चिघळतच गेली. कारण नसताना आम्ही दूर झालो इतक्या की रोज माझं तोंड बघायला नको म्हणून तिने दुसऱ्या ऑफिसला बदली करून घेतली. आता दोघींनाही मनातून वाटतं की कुठेतरी हा बालिशपणा थांबवावा, पण गाडं 'आधी मीच का म्हणून?' पाशी अडतं.

ती हसली. सगळ्यांच्याच बाबतीत असं होतं का ग? माझं आणि माझ्या एका दूरच्या जावेचं पण असंच झालंय. आम्ही खरं म्हणजे मैत्रिणी जास्त होतो; पण आता जावेचं नातं सांगायलाही जिवावर येतं. हा दुरावा संपायला हवा असं वाटतं; पण हातून ते घडत नाही.

आम्ही दोघीही गप्प झालो. मनात खोलवर दडलेल्या आणि आता सहज बाहेर पडलेल्या त्या घटनेकडे अंतर्मुख होऊन पहात राहिलो. नंतर बोलणं झालं अमाच्यात, पण ते गप्पा म्हणावं असं नाही. 'किती उकडतंय?' 'चहा घेणार का?' 'हे स्टेशन किती बकाल वाटतंय.' असं वरवरच्या स्वरूपाचं. पण आतल्याआत मात्र मैत्रीवरच्या गप्पांची आवर्तनं चालू होती.

स्टेशनवर उतरल्यावर निरोप घेताना माझा हात हातात घेऊन ती म्हणाली, 'आपल्या गप्पांमधून मला एक प्रश्न पडलाय. तुला त्याचं उत्तर सापडलं तर मला फोन करशील?'

'जरूर!' मी मनापासून वचन दिलं.

'माधवी आणि संजीवनी दोघीही तुझ्या जवळच्या मैत्रिणी. पण ज्याला परिपक्व मैत्री म्हणता येणार नाही अशा माधवीच्या मैत्रीची आठवण तुला जपावी वाटते. कारण ती जगातून निघून गेलीय. आणि सुखदु:ख वाटून घेणाऱ्या संजीच्या मैत्रीत मात्र अभिमान आड येतो. कारण ती नेहमी भेटते...

मग मैत्री म्हणजे नेमकं काय? कच्च्या वयातल्या कोवळ्या आठवणी की जाणत्या वयातला ताठ अभिमान?'

या गोष्टीला चार वर्षे होऊन गेलीयत. पण मी अजूनही तिला फोन करू शकले नाही.

कारण मैत्री आणि अभिमान यात जास्त ताकदवान कोण याचं उत्तर मला अजूनही सापडत नाहीये.

— — — — — — — — — — —

**प्रमोदिनी वडके-कवळे**
प्राजक्त, अपूर्वा हौ. सोसायटी, सर्व्हे नं. ६०,
सुखसागरनगर क्र. २, गल्ली क्र. १०,
कोंढवा बुद्रुक, पुणे ४११०४८

## अनुवादित कथासंग्रह

**काबुलीवाला आणि इतर कथा :**
रवींद्रनाथ टागोर (बंगाली कथा) अनु. मृणालिनी गडकरी १००

**गहाण पडलेली टेकडी :**
मारिया श्रेस (गुजराथी) अनु. अंजनी नरवणे १२०

**द्वंद्व** : विजयदान देथा (राजस्थानी कथा) अनु. वनिता सावंत १५०

**रावीपार** : गुलजार अनु. पाडळकर/वेल्हाळ १५०

**फुलांचे बोल** :
**आन्ना साक्से (रशियन कथा) अनु. सुनीती देशपांडे १००**

**अंतर-पर्व** (रशियन कथा) अनु. सुनीती देशपांडे १३०

**द स्ट्रीम विदिन** (बंगाली कथा) अनु. मीना वैशंपायन १३०

**इंटरप्रिटर ऑफ मॅलडीज्**
**: झुंपा लाहिरी अनु. भारती पांडे १७०**

**प्रत्येकी पोस्टेज २०रु.**

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**




## सामाजिक, आशयघन संहिता असणारी दिलीप परदेशी यांची प्रस्तुत नाटके आमच्याकडे उपलब्ध.....





**अबोली**
४०रु.





**नाटक**
१२रु.




**भैरवी**
५०रु.




**नको स्वातंत्र्य स्त्रीला**
५०रु.




**निष्पाप**
५०रु.




**काळोख देत हुंकार**
४०रु.

**पोस्टेज प्रत्येकी २०रु.**

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**

# २००६ साली प्रकाशित झालेल्या पुस्तकांची यादी

| पुस्तकाचे नाव | लेखक | किंमत |
|---|---|---|
| **कादंबरी** | | |
| **रिकामा देव्हारा** | वि. स. खांडेकर | १००/- |
| **दोन ध्रुव** | वि. स. खांडेकर | १८०/- |
| **क्रौंचवध** | वि. स. खांडेकर | १८०/- |
| **हिरवा चाफा** | वि. स. खांडेकर | १५०/- |
| **पांढरे ढग** | वि. स. खांडेकर | १५०/- |
| **केतकरवहिनी** | उमा कुलकर्णी | १५०/- |
| **मोहिनी** | पारू मदन नाईक | १६०/- |
| **फॉर युअर आईज ओन्ली** : इयान फ्लेमिंग | अनु. अनिल काळे | १२०/- |
| **साऊथ बाय जावा हेड** :ॲलिस्टर मॅक्लीन | अनु. अशोक पाध्ये | २५०/- |
| **लिव्हिंग हिस्ट्री :** हिलरी रॉडहॅम-क्लिन्टन | अनु. सुप्रिया वकील | ४००/- |
| **मयादा - इराकची कन्या :**जीन सॅसन | अनु. भारती पांडे | २५०/- |
| **वसंतगंधा** | अनु. माधवी कोल्हटकर | १२०/- |
| **द दा विंची कोड** : डॅन ब्राऊन | अनु. अजित ठाकूर | ३२०/- |
| **लायन्स गेम** : नेल्सन डेमिल | अनु. अशोक पाध्ये | ६८०/- |
| **व्हाईट मुघल्स** : विल्यम डॅलरिंपल | अनु. सुधा नरवणे | ३५०/- |
| **गांधर्वी** : बाणी बसू | अनु. मृणालिनी गडकरी | १७०/- |
| **कथासंग्रह** | | |
| **कुंकू पुसणारा हात** | व. कृ. जोशी | १४०/- |
| **चरित्रे** | | |
| **जे आर डी : एक चतुरस्त्र माणूस** | माधुरी शानभाग | १००/- |
| **खाली जमीन वर आकाश** | डॉ. सुनीलकुमार लवटे | १५०/- |
| **परमवीरचक्र - रणांगणावरील आपले महान योद्धे** : मेजर जनरल इयान कारडोझो | अनु. ज्योत्स्ना लेले | १८०/- |




| | | |
|---|---|---|
| **ललित** | | |
| **फुले आणि पत्री** | माधुरी शानभाग | १५०/- |
| **खगोलशास्त्र विषयक संदर्भ ग्रंथ** | | |
| **अंतरिक्षाचा वेध** | सुधा रिसबूड | १५०/- |
| **कलाविषयक** | | |
| **वेरूळ लेण्यातील शिल्पवैभव** | राधिका टिपरे | २००/- |
| **कलाकौशल्ये** | | |
| **अमृताज् मेहेंदी डिझाईन्स** | अमृता खोड्ये | ५०/- |
| **लोकरीचे विणकाम** | आशा पत्रावळी | ३५०/- |
| **व्यक्तिमत्वविकसन** | | |
| **पुढाकार घ्या** | संजीव परळीकर | २००/- |
| **अनुभव कथन** | | |
| **स्ट्रगलर्स** | मुक्ता चैतन्य | ९०/- |
| **माहिती कोश** | | |
| **असे घडले सहस्त्रक** | निरंजन घाटे<br>प्रमोद जोगळेकर | ३००/- |
| **आरोग्य** | | |
| **वजन कमी करण्यासाठी योगसाधना** | अनु. डॉ. सुभाष दांडेकर | ५०/- |
| **औषधाविना आरोग्य** | डॉ. रमा /रवि मराठे | २००/- |
| **मार्गदर्शनपर** | | |
| **चला जाणून घेऊ या!** | | |
| **चक्रं आणि नाडी :** रवींद्र कुमार | अनु. सुभाष जोशी | ३०/- |
| **क्रियायोग :** रवींद्र कुमार | अनु. सुभाष जोशी | ३०/- |
| **ॲक्युप्रेशर :** डॉ.सावित्री रमय्या | अनु. सुभाष जोशी | ३०/- |
| **ज्योतिषविद्या :** विजय कुमार | अनु. शरद गोगटे | ३०/- |
| **केसांची निगा :** मीनाक्षी सिन्हा, रिना राजगोपाल,सुश्मिता बॅनर्जी | अनु. मीना टाकळकर | ३०/- |
| **शांततेनं काम करा!** : पॉल विल्सन | अनु. सुनंदा अमरापूरकर | २४०/- |
| **राजकीय** | | |
| **पुणे ते पंतप्रधानांचे कार्यालय** : बी. जी. देशमुख | अनु. अशोक पाध्ये | ४००/- |
| **लौकिक** | महावीर जोंधळे | १३०/- |

**बाल वाङ्मय**

| | | |
|---|---|---|
| **बुडबुड्यांचे विमान आणि इतर गोष्टी** | अर्चना ओक | ३०/- |
| **चालणारा हिमपुतळा आणि इतर गोष्टी** | अर्चना ओक | ३०/- |
| **छोटुसा पांढरा ससुकला आणि इतर गोष्टी** | अर्चना ओक | ३०/- |
| **छोटु किल्लीवाला उंदीर आणि इतर गोष्टी** | अर्चना ओक | ३०/- |
| **लोखंड खाणारे उंदीर आणि इतर कथा** | वृषाली पटवर्धन | ३०/- |
| **गंपू चिंपू आणि इतर कथा** | उमा खरे | ३०/- |
| **मैत्रीचे मोल आणि इतर कथा** | उमा खरे | ३०/- |
| **सिंड्रेला आणि इतर कथा** | उमा खरे | ३०/- |
| **राजाचं गुपित आणि इतर कथा** | मंजुषा आमडेकर | ३०/- |
| **ढुम ढुम ढुमाक आणि इतर कथा** | मंजुषा आमडेकर | ३०/- |
| **खरा मित्र आणि इतर गोष्टी** | शरद दळवी | ३०/- |
| **एकमेका साह्य करू आणि इतर गोष्टी** | शरद दळवी | ३०/- |
| **आजीचं घर आणि इतर गोष्टी** | शरद दळवी | ३०/- |
| **पैज जिंकली छोट्याने आणि इतर गोष्टी** | शकुन्तला फडणीस | ३०/- |
| **पत्राचा प्रवास ाणि इतर गोष्टी** | शकुन्तला फडणीस | ३०/- |
| **आजीचा धडा आणि इतर गोष्टी** | शकुन्तला फडणीस | ३०/- |
| **बदकाचा बूट आणि इतर गोष्टी** | उज्ज्वला केळकर | ३०/- |
| **गर्विष्ठ सूर्यफूल आणि इतर गोष्टी** | उज्ज्वला केळकर | ३०/- |


# लिव्हिंग हिस्ट्री




**हिलरी रॉडहॅम-क्लिन्टन**
**अनु. सुप्रिया वकील**

आंतरराष्ट्रीय पटावर व अमेरिकी राजकारणात प्रभावी व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखल्या जाणाऱ्या हिलरी क्लिंटन यांचे 'बेस्ट सेलर' आत्मवृत्त

**४००रु. | पोस्टेज ३५रु.**

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**




## वाचकमित्रांनो,

**आगामी ग्रंथजगत दिवाळी विशेषांकातील हा घ्या 'बौद्धिक फराळ'**

काय काय असणार या अंकात.....

कला, साहित्य, व्यवस्थापन क्षेत्रातील विविध मान्यवर कशी करतात आपल्या वेळेची आखणी, कशा पार पाडतात महत्त्वपूर्ण जबाबदाऱ्या, कसे आहे त्यांच्या कार्याचे स्वरूप... वाचा. त्यांच्याच शब्दात... **'माझ्या वेळेचे व्यवस्थापन'** या सदरात.

विविध नामवंत पत्रकार, संपादक सांगत आहेत...

**माझ्या लेखणीचा लढा.. मर्यादित जागेशी / ठराविक वेळेशी**

मान्यवर मराठी शास्त्रज्ञ, शास्त्राव्यतिरिक्त त्यांचे वाचन, लेखन, मराठी साहित्याविषयीची आवड.. **''माझे वाचन'** या सदरात

परदेशातील आपले मराठी बांधव सांगणार...

**परदेशातही उफाळून येणारा माझा मराठी बाणा** या विषयी वाचकमित्रांचा प्रत्यक्ष सहभाग असणारे **'माझा वाचन प्रवास'** हे सदर.

या शिवाय बालमित्रांसाठी **धम्माल बालनगरी, विविध कोडी, जोक्स, गमतीदार कथा** यांसह सजणार ग्रंथजगतचा आगामी दिवाळी अंक.

संपादक
**मेहता मराठी ग्रंथजगत**

# पुरस्कार

### * दिलीप प्रभावळकरांना बालगंधर्व पुरस्कार

अभिनय, संगीत आदी क्षेत्रांतील योगदानासाठी देण्यात येणाऱ्या बालगंधर्व पुरस्कारासाठी यंदा चतुरस्र अभिनेते दिलीप प्रभावळकर यांची निवड झाली आहे. तर, 'युवा बालगंधर्व' पुरस्कार कविता लाड-मेढेकर यांना जाहीर झाला आहे.

मराठी संगीत रंगभूमीला सोन्याचे दिवस दाखवणारे बालगंधर्व यांचा २६ जून हा जन्मदिन. तेच औचित्य साधून 'बालगंधर्व स्मारक समिती'चे कार्याध्यक्ष शहाजी कापसे यांनी रविवारी हे पुरस्कार जाहीर केले. बालगंधर्वांचे जन्मगाव असलेल्या नागठाणे येथे १८ नोव्हेंबर रोजी दिलीप प्रभावळकर व कविता लाड-मेढेकर यांना या पुरस्कारांनी गौरवले जाईल.

### * टिळक सन्मान पारितोषिक

लोकमान्य टिळक स्मारक ट्रस्टतर्फे दिले जाणारे लोकमान्य टिळक सन्मान पारितोषिक बंगलोर येथील भारतीय अंतराळ संशोधन केंद्राचे (इस्रो) अध्यक्ष जी. माधवन नायर यांना जाहीर करण्यात आले आहे.

एक लाख रुपये, सुवर्णपदक, स्मृतिचिन्ह व सन्मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप असून, लोकमान्य टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त म्हणजे १ ऑगस्ट रोजी टिळक स्मारक मंदिरात हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. या वेळी राज्याचे मुख्यमंत्री विलासराव देशमुख, केंद्रीय मंत्री पृथ्वीराज चव्हाण, पंतप्रधान कार्यालयातील जनार्दन द्विवेदी (एआयसीसी) या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत, असे ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. दीपक टिळक यांनी सांगितले.

माधवन हे केंद्र सरकारच्या अंतराळ विभागाचे सचिव आहेत. आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून देशातील दूरचित्रवाणी प्रक्षेपणाच्या क्षमता वृद्धीत महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या इन्सॅट ४अ मालिकेत त्यांचा महत्त्वाचा वाटा आहे. या कामगिरीबद्दल त्यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. लोकमान्य टिळक यांच्या प्राचीन विद्येसंदर्भातील विविध पैलूंबाबत एक परिषद घेण्यात आली होती. या वेळी चर्चा करण्यात आलेल्या विविध पैलूंवर एक पुस्तक तयार करण्यात आले असून, त्याचे प्रकाशनही या वेळी करण्यात येणार आहे.

दिवसेंदिवस वेद म्हणणाऱ्या लोकांची संख्या कमी होत आहे.



म्हणून मागील वर्षी जाहीर केल्याप्रमाणे ऋग्वेदाची मल्टिमीडिया सी.डी.चे प्रकाशन या वेळी करण्यात येणार आहे, असे टिळक यांनी सांगितले.

### * वसुंधरा पंडित स्मृती पुरस्कार

''अलीकडे पाश्चात्य संगीताचा जनमानसावरील प्रभाव वाढतोय. पश्चिमेकडच्या या तेरड्याचा रंग तीन दिवसांत मावळेल आणि अभिजात शास्त्रीय संगीताचा सुवर्णकाळ परतल्याशिवाय राहणार नाही,'' असे मत जयपूर-अत्रौली घराण्याच्या ज्येष्ठ गायिका धोंडूताई कुलकर्णी यांनी व्यक्त केले.

पुणे भारत गायन समाजाच्या वतीने दिला जाणारा 'कै. सौ. वसुंधरा पंडित स्मृती पुरस्कार' आज कुलकर्णी यांना त्यांचे गुरुबंधू उस्ताद अजिजुद्दिन खाँ यांच्या हस्ते देण्यात आला, त्यानंतर त्या सत्काराला उत्तर देत होत्या. व्यासपीठावर संस्थेचे अध्यक्ष सुधाकर जोशी होते. कुलकर्णी म्हणाल्या, ''माझ्या गुरू सूरश्री केसरबाई केरकर म्हणजे संगीतातील कांचनगंगा शिखर होत्या, तर त्यांचे गुरू अल्लादियाखाँ साहेब म्हणजे गौरीशंकर होते. खाँसाहेबांच्या गायनात वैविध्य, विशालता होती. त्यांची सौंदर्यदृष्टी सर्व अंगांनी विकास पावलेली होती. खाँसाहेबांच्या शिष्या केसरबाईंनी त्यांचे नाव देशभर केले. जयपूर घराण्याला लोकप्रियतेच्या शिखरावर नेऊन बसवण्याचे श्रेय केसरबाईंना जाते. विसाव्या शतकातील सर्वोत्तम आवाज असे त्यांचे वर्णन करावे लागेल. संगीतातील सम्राज्ञीपद त्यांनी अखेरपर्यंत भोगले. जयपूर घराण्यातील गायकीत सूर-ताल आणि शांतीला संगम आढळतो.''

❐


**मराठी व्याकरणावर, भाषेवर प्रभुत्व मिळविण्यासाठी ही उपयुक्त पुस्तके विद्यार्थ्यांच्या तसेच अभ्यासकांच्या संग्रही असलीच पाहिजेत**

| | | |
|---|---|---|
| **मराठीचे व्याकरण** | डॉ. लीला गोविलकर | २२५/- |
| **मराठी व्याकरण परिचय** | राजशेखर हिरेमठ | ८०/- |
| **मराठी लेखन दर्शन** | चंद्रहास जोशी | ६०/- |
| **ज्ञानदा निबंधमाला** | दीपा पोरे | ७०/- |
| **मराठी निबंध ज्योती** | चंद्रहास जोशी | ८०/- |
| **ग्रामीण बोलीचा शब्दकोश** | डॉ. द. ता. भोसले | ११०/- |

**पोस्टेज प्रत्येकी २५रु.**

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**

## बुद्धिबळाचे तंत्र आणि मंत्र

**ना. रा. वडनप**

बुद्धि श्रेष्ठ की बळ या सनातन वादात नेहमी विजय झाला आहे तो बुद्धिचाच! बुद्धिबळाचा खेळ हा त्या विजयाचेच एक प्रतिक आहे. पटावरची ही लुटुपुटीची लढाई खेळताना ती मोहरी मग जिवंत होवून उठतात आणि बुद्धिचा कस लावत आपण ही लढाई जिंकण्याचा प्रयत्न करतो. शास्त्रशुद्ध बुद्धिबळ कसे खेळावे, चाली कशा रचाव्या याचे अफलातून मार्गदर्शन करणारी ही पुस्तके लहानथोरांसहित सर्वांनाच उपयुक्त ठरतील.





बुद्धिबळाचा ओनामा
८०रु.




सुसंघटित मारा
१००रु.




बुद्धिबळाचा श्रीगणेशा
१२०रु.




चतुरंग बुद्धिबळातील सापळे
१००रु.

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. **पोस्टेज प्रत्येकी २५रु.**




## वाचकांचा प्रतिसाद




### *नॉट विदाऊट माय डॉटर*

**लीना सोहोनी**

**किंमत : २००रु.**

मा. लीना सोहोनी,

आपले 'नॉट विदाऊट माय डॉटर' हे अनुवादित पुस्तक वाचले आणि अक्षरश: त्या पुस्तकात हरवायलाच झाले. आपल्या ओघवत्या अनुवाद शैलीमुळे बेट्टीची कथा सहजपणे दृष्टीपुढे साकारत जाते. मनाच्या गाभ्यात जाऊन भिडते.

गलिच्छ वातावरण, वारंवार होणारी मारहाण अन् जुलूमी परकीय संस्कृती या साऱ्यांना टक्कर देत, लाडक्या माहतोबसह अमेरिका गाठण्याची बेट्टीची जिद्द अवाक् करते. छोट्या माहतोबचं शहाणं वागणं मन व्याकूळ करतं. दोघींविषयीच्या अतीव करुणेनं मन भारावतं. बेट्टीचं अफाट धाडस थक्क करतं.

पुस्तक वाचून पूर्ण झालं तरी बेट्टी अन् माहतोब दृष्टीआड होत नाहीत. अर्थात याचं श्रेय आपल्या ओघवत्या सहजसुंदर अनुवादशैलीस जाते.

मुखपृष्ठमांडणीसाठी श्री. बाबू उडूपी यांचे खास आभार मानावेसे वाटतात. इराणी लोकवस्तीच्या पार्श्वभूमीवरील बेट्टी अन् माहतोबचे चित्र अतिशय भावुक आहे.

वास्तववादी अनुभवाचे इतके सुंदर अनुवादित पुस्तक आपण आम्हां वाचकांना उपलब्ध करून दिलेत त्याबद्दल आपले आभार मानावेत तेवढे थोडेच आहेत.

पुनश्च मन:पूर्वक आभार.

**सलमा वर्तक**
**अंधेरी, मुंबई.**




## *थॉट लिडर्स*

### अनु. सुप्रिया वकील/विलास वाडकर

**किंमत : ३००रु.**

**मा. सुप्रिया वकील,**

गेली दोन वर्षे 'थॉट लीडर्स' मराठीतील वाचल्यानंतर अस्वस्थ आहे. त्या काळात नातेवाईकांना लिहिलेल्या पत्रात त्यातील विचारांचा उल्लेख केला, अनेकांशी बोललो व ठरवले की त्याबाबत आता इतरांशी सांगण्यापेक्षा प्रथमत: श्री. पंडित ह्यांना व आपल्याला कृतज्ञता कळवावी. त्यांतील विषयाबाबत व तशा इतर व्यक्तींबद्दल माहिती घ्यावी व आपणच आपल्याला Develope करावे. त्याही पुढे जाऊन ह्यांतील अनेक व्यक्तींशी संबंध आलेला असताना ह्या पुस्तकाच्या निमित्ताने पुन: एकदा दर्शन घ्यावे, भेट घ्यावी, बोलावे, सहवास नव्याने अनुभवावा असे ठरविले आहे व त्याप्रमाणे प्रयत्न चालू आहेत. 'तसलिमा नसरीन' यांच्या पुणेभेटीत टिळक स्मारक मंदिरात प्रस्ताविकाचे वेळी आपणास प्रथम पाहिले, ती वेळ 'थॉट लीडर्स' बाबत बोलण्याची नव्हती व त्या गर्दीत आपली भेट मागणे उचित नव्हते. १५ ऑगस्ट नंतर भारतात आल्यावर आता प्राधान्याने आपणाशी संपर्क साधेन. ज्यांनी आमच्या आयुष्यात आनंद निर्माण केला, त्यांची चरित्रे आता ह्या पिढीला उपलब्ध करून द्यावी लागतील. 'थॉट लीडर्स' हे पुस्तक व त्याचे भाषांतर हे बहुमोल सामाजिक कार्य आहे.

धन्यवाद.

**शरद मांडे**
पुणे.



**मा. संपादक,**

आपल्या मेहता मराठी ग्रंथजगत जुलै २००६ च्या अंकातील बालनगरी सदरातील गोष्टी फारच छान व धम्माल आहेत.

प्रत्येक महिन्यालाच वेगवेगळ्या, छान-छान गोष्टी प्रसिद्ध करून तुम्ही आमची वाचनाची भूक वाढवित आहात. उत्तम साहित्य निर्मिती व प्रसिद्धी हे तुमच्या या अंकात आढळते आणि हे कार्य म्हणजे सुसंस्कृत समाज परिवर्तनाची कार्य आहे. असेच कार्य तुमच्याकडून होवो व हे यश तुम्हांला लाभो.

हि सदिच्छा!

**कु. गौरी प्र. साळुंके**
पुणे.


मा. संपादक,

जून २००६ च्या अंकात ज्येष्ठ साहित्यिक डॉ. आनंद यादव यांची चंद्रकांत भंडारी यांनी घेतलेली मुलाखत वाचली. 'लोकसखा ज्ञानेश्वर' या कादंबरीची निर्मितीप्रक्रिया जाणून घेता आली. लोकायत आणि वैदिक अशा दोन भिन्न परंपरांच्या मिश्रणातून निर्माण झालेल्या आपल्या मूळ संस्कृतीचा खरा शोध घेणे महत्त्वाचे ठरते. ऐहिक आणि अध्यात्मिकाच्या संभ्रमात असलेल्या समाजाला नेमकं कोणतं भान देण्याची गरज आहे. या अनुत्तरित प्रश्नाबाबत 'लोकसखा ज्ञानेश्वर' या कादंबरीतून चर्चा होईल असं लिहिलं गेलं आहे काय? हा प्रश्न उपस्थित होतो. कर्मकांड, दैवी चमत्कारांपासून ज्ञानेश्वरांना अलिप्त करण्याबाबतचा डॉ. यादव यांचा प्रयत्न महत्त्वपूर्ण असला तरी निखळ विचारांबाबतचा संभ्रम दूर होणे ही एकविसाव्या शतकाची खरी गरज आहे. या पुस्तकावर जळगाव येथील सकाळ साहित्यप्रबोधिनीत चर्चा झाली. चंद्रकांत भंडारी यांनी ही मुलाखत वाचून दाखवली होती. 'लोकसखा ज्ञानेश्वर' या कादंबरीचं स्वागत!

**प्रा. डॉ. किसन पाटील**
जळगाव.




## * वसंतराव लिमये



पुण्यामधील कलाभारती ग्रंथालय व ललित वितरण या नामवंत संस्थांचे संचालक अनंत वामन तथा वसंतराव लिमये (वय ७०) यांचे १८ जून रोजी निधन झाले.

लिमये यांनी सन १९६० मध्ये गरजू व अभ्यासू विद्यार्थ्यांसाठी कलाभारती ग्रंथालय सुरू केले. माफक दरात विद्यार्थ्यांना पुस्तके, गाईडस, नोटस् उपलब्ध करून मॅट्रिक ते पदवी (सर्व शाखा) पदव्युत्तर एम.ए., एम.कॉम. व इंजिनिअरिंग, लॉच्या विद्यार्थ्यांची सोय केली. १९६८ पासून ललित ग्रंथालयाच्या तीन शाखा चालवून वाचकांना दर्जेदार मासिके, ललित साहित्य, दिवाळी अंक मिळण्याची सोय केली. १९७० मध्ये नादब्रह्म संस्थेद्वारा रसिक प्रेक्षकांसाठी ख्यातनाम व उदयोन्मुख कलाकारांचे गायन, नृत्य, वादन, कथाकथन कार्यक्रम सादर केले. हे उदयोन्मुख कलाकार आता यशाच्या शिखरावर आहेत. स्त्री लेखिकांचा कथाकथनाचा पहिला कार्यक्रमही 'नादब्रह्म'नेच घडवून आणला होता. 'साहित्यशिल्पी' या संस्थेच्या माध्यमातून मराठी मासिकांचे वितरण भारतात व भारताबाहेरही सुरू केले. दिवाळी अंकांचे पहिले सार्वजनिक प्रदर्शनही साहित्यशिल्पी तर्फे सुरू झाले. १९७४ साली प्रकाशनक्षेत्रात पदार्पण करून 'मनमोहिनी प्रकाशन'तर्फे 'स्नेहप्रभा' हे स्त्रियांचे मासिक, 'नाईटकिंग' हे रहस्यमय मासिक तर 'हसवणूक' हे विनोदी दर्जेदार वार्षिक सुरू केले. या प्रकाशनातर्फे अनेक नवनवीन लेखक, चित्रकार, कादंबरीकार रसिक वाचकांपुढे आले. त्याचबरोबर अनेक नवनवीन प्रकाशक, ग्रंथालयचालक यांनाही मार्गदर्शन करून सुस्थापित होण्यासाठी मदत केली. १९८५ पासून 'ललित वितरण' या संस्थेद्वारे ललित साहित्य वितरण सेवा सुरू केली. अनेक नामवंत संस्था याचा लाभ घेत आहेत.



## * डॉ. वि. ग. भिडे

पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू, पंतप्रधानांचे माजी वैज्ञानिक सल्लागार आणि विज्ञानप्रसाराच्या कार्यासाठी अखेरपर्यंत झटणारे ऋषितुल्य शास्त्रज्ञ डॉ. वि. ग. भिडे यांचे नागपूरला निधन झाले.

डॉ. भिडे हे मूळचे नागपूरचे. पदार्थविज्ञान विषयात पदव्युत्तर शिक्षणानंतर त्यांनी १९५३ मध्ये नागपूर विद्यापीठामधून पीएच.डी. प्राप्त केली. त्यानंतर प्रगत संशोधनासाठी ते लंडनला गेले. तेथून दुसरी पीएच.डी. संपादन केली. भारतामध्ये परतल्यानंतर इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सेस, इंडियन ॲकॅडमी ऑफ सायन्सेस, नॅशनल ॲकॅडमी ऑफ सायन्सेस आदी संस्थांच्या अभ्यासवृत्तीच्या माध्यमातून त्यांनी संशोधन केले. दिल्लीतील नॅशनल फिजिकल लॅबोरेटरी या संस्थेच्या संचालकपदाची जबाबदारी त्यांनी समर्थपणे सांभाळली. या दरम्यान विविध राष्ट्रीय समित्यांवर त्यांनी काम केले. त्यांच्या कार्याची दखल घेऊन तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी वैज्ञानिक सल्लागार म्हणून डॉ. भिडे यांची नियुक्ती केली.

१९८० च्या सुमारास डॉ. भिडे पुणे विद्यापीठात आले. स्कूल ऑफ एनर्जी स्टडीज आणि पदार्थविज्ञान विषयातील प्रगत संशोधन केंद्राच्या स्थापनेचा आराखडा त्यंनी आखला. एम. आर. भिडे हे त्यांचे जवळचे स्नेही. त्यांच्यासमवेत डॉ. भिडे यांनी 'एनर्जी स्टडीज' या विषयातील संशोधन सुरू केले. पुढे त्याला राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रतिष्ठा लाभली.

ऑगस्ट १९८४ ते ऑक्टोबर ८८ या कालावधीत डॉ. भिडे यांना कुलगुरुपद भूषविण्याचा सन्मान मिळाला. वैज्ञानिक क्षेत्रात राष्ट्रीय पातळीवर निर्माण केलेल्या स्नेहपूर्ण संबंधांच्या जोरावर त्यांनी पुणे विद्यापीठात राष्ट्रीय संशोधन संस्था, प्रकल्प उभारले. त्यांच्याच प्रयत्नाने १९८९ मध्ये विद्यापीठाला राष्ट्रीय विज्ञान काँग्रेसचे अधिवेशन भरविण्याची प्रतिष्ठेची संधी मिळाली. डॉ. भिडे यांच्या कार्याचा गौरव करून १९९२ मध्ये त्यांना 'पद्मश्री' किताब बहाल करण्यात आला.

शालेय विद्यार्थ्यांपासून महाविद्यालयीन युवकांपर्यंत विज्ञानदृष्टी रुजविण्यासाठी डॉ. भिडे यांनी अथक प्रयत्न केले. राष्ट्रीय बालविज्ञान चळवळीचे ते अध्यक्ष होते, महाराष्ट्र ॲकॅडमी ऑफ सायन्सेसचे ते संस्थापक अध्यक्ष होते. राष्ट्रीय बालविज्ञान परिषदेच्या २००१ साली पुण्यात झालेल्या अधिवेशनाच्या ते अध्यक्षस्थानी होते. त्यांच्याच प्रयत्नाने डॉ. अब्दुल कलाम या वेळी उद्घाटक म्हणून उपस्थित राहिले होते. मुक्तांगण विज्ञानशोधिका स्थापन करण्यात त्यांचा मोलाचा वाटा होता. संशोधिकेच्या कार्यासाठी विख्यात साहित्यिक पु. ल. देशपांडे यांनी आपली सदनिका त्यांना देणगी म्हणून दिली होती. त्याचप्रमाणे डॉ. भिडे यांच्या शब्दाखातर रतन टाटा ट्रस्टने संशोधिकेसाठी सव्वा कोटी रुपयांची देणगी दिली होती. या

संशोधिकेच्या नवीन वास्तूच्या उभारणीचे काम त्यांच्या पुढाकाराने हाती घेण्यात आले. त्याची वेळोवेळी ते चौकशीही करीत. या वास्तूमध्ये औपचारिक स्थलांतर होण्यापूर्वीच डॉ. भिडे यांचे निधन झाले. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सप्रमाणे पुण्यातही विज्ञान, शिक्षण संशोधनासाठी अत्युच्च गुणवत्तेची संस्था सुरु व्हावी यासाठी डॉ. भिडे यांनी पाठपुरावा केला होता. त्यात त्यांना यश आले. या वर्षीपासून ही संस्था सुरू झाली. त्यासाठी केंद्र सरकारकडून निधी मिळविण्याकरिता डॉ. भिडे यांनी प्रयत्न केले होते.

### * मनोहरराय सरदेसाई

गोव्याचे लोकप्रिय कवी डॉ. मनोहरराय सरदेसाई यांचे निधन झाले. ते ८१ वर्षांचे होते.

सावईवेरे येथील प्रसिद्ध कथाकार लक्ष्मणराव सरदेसाई यांचे ते पुत्र होत. सावईवेरे येथे १९२५ मध्ये मनोहरराय यांचा जन्म झाला. त्यांचे शिक्षण गोवा, मुंबई व पॅरिस येथे झाले. त्यांनी पॅरिस विद्यापीठात विशेष प्रावीण्याने डॉक्टरेट मिळविली. मुंबई विद्यापीठात फ्रेंच व मराठी भाषेत त्यांनी एम.ए. केले. मुंबईत विल्सन व रूपारेल महाविद्यालयात फ्रेंचचे लेक्चरर म्हणून काम केले व नंतर गोवा विद्यापीठाच्या फ्रेंच विभागाचे प्रमुख होते. 'पिसोळे' या कविता संग्रहासाठी त्यांना १९८० चा साहित्य अकादमी पुरस्कार लाभला. मडगाव येथे १९६२ साली झालेल्या आठव्या अ. भा. कोकणी परिषदेचे अध्यक्षस्थान त्यांनी भूषविले होते. कोकणी भाषेच्या चळवळीसाठी जवळजवळ सहा दशके त्यांनी अविरत झुंज दिली. पोर्तुगीज, फ्रेंच तसेच मराठीतूनही त्यांनी कविता केल्या. 'इडबोताल्ल बेबो' हे त्यांचे बालगीत लहानमोठ्यांच्या ओठावर अजूनही असते. 'ही लोकशाय' ही त्यांची विडंबनात्मक कविता खूपच गाजली होती. त्यांची अनेक चित्रपटगीतेही गाजली आणि हिंदू तसेच ख्रिस्ती श्रोत्यांना आवडतील अशी गीते रचण्यात त्यांचा हातखंडा होता. म्हणूनच 'लोककवी'चे स्थान त्यांना प्राप्त झाले होते.

### * राजा राव

मुल्कराज आनंद आणि आर. के. नारायण यांच्याप्रमाणे इंग्रजीत भारतीय कादंबरीकाराचा अमीट ठसा उमटविणारे ज्येष्ठ लेखक राजा राव यांचे अमेरिकेतील ऑस्टिन (टेक्सास) येथे निधन झाले. ते ९६ वर्षांचे होते. गेल्या काही वर्षांपासून राव ऑस्टिन येथेच स्थायिक झाले होते. राव यांनी स्वातंत्र्यलढ्यात भाग घतला होता. महात्मा गांधी यांच्या अहिंसेच्या शिकवणीचा त्यांच्या मनावर गाढ परिणाम झाला होता. त्या अनुभवांवर आधारित 'कंठपुरा' या पहिल्याच कादंबरीने राव यांचे इंग्रजी साहित्यातील स्थान अढळ केले. त्यावेळी ते ३० वर्षांचे होते.



### * शांता बुद्धिसागर

ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक, लेखिका प्रा. शांता बुद्धिसागर यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्या ८४ वर्षांच्या होत्या. त्यांच्या अंतिम इच्छेनुसार त्यांचे देहदान सोलापूर, डॉ. वैशंपायन स्मृती वैद्यकीय महाविद्यालयास करण्यात आले.

सोलापूरच्या साहित्य, सांस्कृतिक, सामाजिक क्षेत्रात सतत कार्यरत असलेल्या प्रा. बुद्धिसागर या गेल्या चार वर्षांपासून वृद्धापकाळाने बिछान्यावर खिळून होत्या.

त्यांच्या पश्चात् बँक ऑफ इंडियामध्ये अधिकारी असलेले चिरंजीव चारुदत्त बुद्धिसागर, सून व दोन नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या निधनाचे वृत्त कळताच सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. इरेश स्वामी, कवी दत्ता हलसगीकर आदींनी त्यांच्या निवासस्थानी जाऊन अंत्यदर्शन घेतले.

### * डॉ. निर्मलकुमार फडकुले

संतसाहित्याचे श्रेष्ठ अभ्यासक, साहित्यिक आणि विचारवंत डॉ. निर्मलकुमार फडकुले यांचे दिनांक २८ जुलै रोजी हृदयविकाराच्या झटक्याने सोलापूर येथे निधन झाले. ते ७८ वर्षांचे होते.

प्रसन्न लेखनशैली, काव्यात्म शब्दरचना आणि जीवनविषयकचिंतन या वैशिष्ट्यांमुळे डॉ. फडकुले यांचे साहित्य विलक्षण रसिकप्रिय ठरले.

डॉ. फडकुले यांनी 'लोकहितवादी-काल आणि कर्तृत्व' या विषयावर प्रबंध लिहून १९७३ मध्ये डॉक्टरेट मिळवली होती. संतसाहित्याचे अधिकारी विचारवंत, अभ्यासक म्हणून त्यांची ख्याती होती. साहित्यवेध, संत कवी तुकाराम : एक चिंतन, हिरव्या वाटा, संत चोखामेळा आणि समकालिन संतांच्या रचना, संत सहवास, अमृतकण कोवळे, संताचिया भेटी, संत तुकारामांचा जीवनविचार, परिवर्तनाची चळवळ : काल आणि आज, कल्लोळ अमृताचे, चिंतनाच्या वाटा, अमृतधारा - संतकाव्यातील वेचे आदी साहित्यसंपदा त्यांच्या लेखणीतून अवतरली.

डॉ. फडकुले यांचे स्वातंत्र्यवीर सावरकर, डॉ. आंबेडकर, महात्मा फुले, आचार्य अत्रे, ना. सी. फडके, कवी कुंजविहारी हे व्याख्यानातील अभ्यासाचे विषय होते. त्यांच्या आस्वाद समीक्षेला मराठी साहित्य जगताने भरघोस प्रतिसाद दिला. 'साहित्यातील प्रकाशधारा' हे ललित साहित्यावरील त्यांचे पुस्तक अभ्यासकांना संदर्भग्रंथ म्हणून उपयुक्त ठरले आहे.

डॉ. फडकुले यांना विविध विभागीय साहित्यसंमेलनांचे अध्यक्षपदही भूषवले तसेच महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, राज्य रंगभूमी परिनिरीक्षण मंडळ, महाराष्ट्र साहित्य परिषद आदी संस्थांचे सदस्य म्हणून त्यांनी काम पाहिले.

❐



## अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| महर्षि मनु आणि कृतज्ञ मासा | ९५ |
| बेडूकरावांचा फराळ | १०२ |






# महर्षि मनु आणि कृतज्ञ मासा

बालमित्रांनो, ही गोष्ट खूप प्राचीन काळातली आहे, म्हणजे अगदी रामायण आणि महाभारताच्याही पूर्वीची.

उत्तर भारतामध्ये गंगा नदीच्या काठी महर्षि मनुंचा आश्रम होता. ते रोज सकाळी नदीकाठावर ध्यानधारणा करण्यास जात असत. एके दिवशी ध्यानधारणा करत असताना, त्यांच्याजवळ नदीतला एक छोटासा मासा आला आणि म्हणाला, ''गुरुदेव, मला वाचवा. नदीतले मोठे मोठे मासे माझ्यासारख्या लहान माशांना खाऊन टाकत आहेत. कोठे जावे कळत नाही, त्यामुळे तुम्हीच मला अभय द्या.''



ध्यानधारणा करत असलेल्या महर्षि मनुंनी त्या लहान माशाकडे पाहिले, त्यांना त्याची दया आली. त्यांनी माशाला उचलले आणि आपल्या कमंडलुमध्ये टाकले.

महर्षि मनु त्या माशाला रोज प्रेमाने खाऊ घालत,

त्याची काळजी घेत. हळूहळू तो मासा मोठा झाला. मोठा झाल्यामुळे त्याला कमंडलूत फिरता येईना. जागा अपुरी पडू लागली, तेव्हा त्याने महर्षि मनुंना पुन्हा विनंती केली, ''महाराज, आता मी मोठा झालो आहे. कमंडलू मला अपुरा पडतो त्यामुळे तुम्ही मला यापेक्षा मोठ्या जागेत नेऊन सोडावे.''

महर्षि मनु किंचितसे हसले, त्यांनी माशाला आश्रमाजवळच्या तलावात सोडले.

तलाव बऱ्यापैकी मोठा असल्याने तो मासा मजेत जगू लागला. तलावात पडणारे कीटक वगैरे खाऊन त्याची जाडी चांगलीच वाढू लागली आणि कालांतराने त्याला तलावही अपुरा पडू लागला.

त्याने पुन्हा महर्षिंना विनंती केली, ''गुरुदेव, माझे शरीर दिवसेंदिवस वाढतच आहे. आपण मला कमंडलूतून या तलावात सोडले; पण आता मला हा तलावही अपुरा पडू लागला आहे. म्हणून कृपा करा मला यापेक्षाही मोठ्या तलावात सोडून द्या.''

हे ऐकल्यावर महर्षि मनु त्याच्यासारख्या तक्रारीला वैतागले आणि त्यांनी त्या माशाला सरळ समुद्रातच सोडून दिले.


या गोष्टीला बरीच वर्षे झाली. महर्षि मनु आपल्या दैनंदिन, जप, तप, यज्ञयाग आदी गोष्टींमध्ये व्यस्त रहात असत. एके दिवशी पहाटे नित्याप्रमाणे महर्षि ध्यानधारणा करत होते. ध्यानधारणा आटोपल्यावर त्यांनी समोर नदीकडे पाहिले असता, त्यांना समोर



एक मोठ्ठा मासा तरंगत असलेला दिसला. महर्षिंनी अचूक ओळखले, तोच पूर्वीचा इवलासा लहान मासा इतका मोठ्ठा झाला होता. महर्षि मनु त्याला काही बोलणार तेवढ्यातच तो म्हणाला, ''गुरुदेव, आपण मला बरोबर ओळखले आहे. पण मी तुम्हाला काही सांगू इच्छितो, हे जग लवकरच एका महाप्रलयात बुडणार आहे. सर्व सजीवांचा अंतःकाळ जवळ आला आहे. या महासागरात निसर्गाच्या अनेक घडामोडींची मोठी उलथापालथ सुरू आहे, त्यामुळे कृपा करून तुम्ही आपल्या तसेच आश्रमातल्या इतरांसाठी एक मोठी नौका बांधून घ्यावी.''

असे म्हणून तो मासा लगेच डुबकी मारून निघून गेला. महर्षि मनुंनाही महाप्रलयाच्या आगमनाची जाणीव झाली होतीच. त्यांनी माशाच्या सल्ल्याप्रमाणे एक मोठे जहाज बांधून घेतले.

आणि खरेच एके दिवशी मोठा जलप्रलय झाला. आणि सर्व जग बुडायला सुरुवात झाली. महर्षि मनुंच्या आश्रमातील सर्व शिष्य त्या नौकेत जाऊन बसले.



तेवढ्यात तो मासा आला आणि त्याने महर्षि मनु आणि त्यांच्या शिष्यांना त्या मोठ्या नौकेतून दूरवर ओढत नेले आणि कैलास पर्वताच्या पायथ्याशी आणून सोडले. अशा प्रकारे महर्षि मनु आणि शिष्यगणांचे प्राण वाचवून माशाने उपकारांची परतफेड केली.

❐

## ओळखा पाहू



**हे आहेत आंतरराष्ट्रीय पातळीवर गाजलेले एक भारतीय लेखक. सध्या युनोच्या सरचिटणीस पदासाठी भावी उमेदवार म्हणून भारताने यांना जोरदार पाठिंबा दिला आहे.**

**यांची ओळख पटवा आणि आम्हाला पत्राद्वारे कळवा.**

जुलै अंकातील ओळखा पाहू चे उत्तर

**इन्फोसिस सॉफ्टवेअर कंपनीचे अध्यक्ष - एन. आर. नारायणमूर्ती**

अचूक उत्तर पाठवणारे वाचक -

**सौ. स्मिता तळेकर,डोंबिवली पूर्व. राजेश तायडे, अमरावती.**



## बालवाचकांसाठी धमाल स्पर्धा

**प्रिय बालमित्रांनो,**

आपले **'बालनगरी'** सदर येत्या दिवाळी अंकातही खूप सजणार आहे, धम्माल गोष्टी, भरपूर कोडी, गंमत-जमत, जोक्स आणि... तुम्ही स्वत: लिहिलेल्या गंमती-जमती, होय... तुम्हालाही या अंकात लिहिता येईल...!

**'अशी झाली माझी फजिती'** याबद्दल... तुमच्या धमाल फजितीबद्दल आम्हाला लिहून पाठवा. फजिती मित्राची नाही बरं का! तुमचीच फजिता लिहा...

*** कधी तुम्ही शर्ट उलटाच घालून बाहेर गेलात का?**

*** चुकून शर्टची बटणं खाली-वर लावली...**

*** शाळेतून घरी येताना मित्राचेच दप्तर आणले...**

*** शाळेत रस्ताच चुकला, दोन वेगवेगळ्या चपला घातल्या, सॉक्ससुद्धा वेगळ्याच रंगाचे घालून गेलात...**

*** शाळेत झालेली फजिती, घरात होणारी गडबड...**

*** अचानक लाईट गेले आणि अंधारात मनीम्याऊँच्या पाठीवर पाय पडला...**

*** आईने, आजीने चकली खाताना पकडलं...**

अशा कितीतरी वेळा तुमची फजिती झाली असेल होय ना? मग खरोखरी लिहून पाठवा.

पहिल्या पाच मुलांना धमाल बक्षीसे व स्पर्धेत भाग घेणाऱ्या प्रत्येकाला प्रशस्तीपत्रक दिले जाईल...

चला तर मग... लागा तयारीला...

**संपादक**
**मेहता मराठी ग्रंथजगत**

## कोडं क्र.२

एका कार्यक्रमाच्या नंतर सर्व वाद्यं इकडे तिकडे पसरलीत. चला त्यांना एकत्र ठेवू या.

२० वाद्यं आहेत बरे कां!

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| स | न | ई | म | म | सं | त | बों | ळ |
| ता | व | लि | अ | री | तु | ब | रा | गो |
| ना | डो | नि | स | ता | र | ला | ळ | पि |
| में | मों | बा | री | न | टा | क | मृ | या |
| हा | ड्र | झां | लि | ढी | गि | ळ | दं | नो |
| म | री | यो | ज | ल | त | रं | ग | ज |
| ई | व्हा | सं | प | क | तं | बो | रा | ल |

**उत्तर - पुढील 'बालनगरी' मधे.**

## कोडं क्र.१ चं उत्तर

१. जास्वंद २. पारिजातक ३. कर्दळ ४. तगर ५. सोनटक्का ६. बटमोगरा ७. बकुळ ८. रातराणी ९. गुलाब १०. गुलबकावली ११. लीली १२. निशीगंध १३. जाई १४. जुई १५. चमेली १६. चाफा १७. झेंडू १८. ग्लॅडूला १९. शेवंती २०. सायली २१. कुंदा



आजी म्हटली की चट्कन आठवते 'गोष्ट'. आजीभोवती कोंडाळ करून तिच्या बटव्यातल्या एकेक गोष्टी ऐकत, रंगून जात झोपी जाणं, हा प्रत्येक लहान मुलाच्या आयुष्यातला आनंदाचा ठेवाच! पाश्चात्यांच्या परिकथांसारख्या आपल्याकडेही गोष्टींचा केवढा मोठा खजिना आहे! मूळ लेखक माहित नसलेल्या त्या कितीतरी गोष्टी अजूनही मनाला भुरळ पाडतात. मग जरा नव्या भाषेत नवा साज चढवून जुन्या गोष्टींना काही नव्या गोष्टींसोबत वाचून आनंद मिळवायला काय हरकत आहे?

**राजाचं गुपित आणि इतर कथा**

**मंजूषा आमडेकर**

**३० रु.**




**आजीच्या गोष्टी**




**ढुम् ढुम् ढुमाक् ढुम्ऽऽऽ आणि इतर कथा**

**मंजूषा आमडेकर**

**३० रु.**

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.** **पोस्टेज एकत्रित २० रु.**


# बेडूकरावांचा फराळ

भांडणात खूप वेळ गेला.

लंबूटांग बगळोजी तळेगावकडे जेवणासाठी निघाले. बगळोजींना ताजे मासे खायला फार आवडत.

बाकी सगळ्यांनी आपापला खाऊ आणला होता. अंगतपंगत करायला सुरुवात केली.

सशाभाऊ तुरतुरेंनी गाजर आणले होते. राघूजी पोपटाने हिरवीगार मिरची, खारूताईने उंबराची फळे, तर टिपूनानांनी घरीच तयार केलेली बिस्किटे आणली होती. सगळ्यांनी आपापला खाऊ बेडूकरावांना दिला.





तोपर्यंत गाढवभाऊ चरायला आणि कोल्होजी लबाडे पळाले शिकारीला. हिरव्या पानांतून डोकावणारे रसरशीत गाजर पाहताच बेडूकरावांना वाटले,

व्वा! आपण थोडे गाजरच खावे.

पण बेडूकरावांना दात नसल्याने गाजर काही चावता येईना, त्यांनी गाजर सशाभाऊंना परत केले.

आपली शेपटी उडवत खारूताई म्हणाली,

"बेडूकराव, ही जंगल-मिठाई तुम्हांला नक्की आवडेल. खास तुमच्यासाठीच आणलेली, अगदी उंच झाडावरची लालेलाल फळे आहेत ही. जरा चाखून तर पाहा. अहो, एकदा खाल, तर रोज रोज मागाल."


असे बोलताना सुद्धा खारीच्या तोंडाला पाणी सुटले. तिने आपल्या झुपकेदार शेपटीने, फसकन् आपले तोंड पुसले.

पण बेडूकराव मात्र चुळबुळत राहिले. तोंड बंद ठेवून डोळे फिरवत बसले.

खारूताईने जंगल-मिठाईवर ताव मारण्यास सुरुवात केली. मिठाई पोटात जाताच खारूताई पेंगू लागली.

आपला एक पाय नाचवत राघूजी पोपट आला.

राघूजी दिसायला सुंदर, लालबुंद, बाकदार चोच, हिरवी-हिरवी पिसे, गळ्यात लाल किरमिजी रंगांची कंठी, फांदीवर बसले, की ऐटीत झुलणारे शेपूट. राघूजीचा आवाज गोड, त्याचे बोलणे सुद्धा गोड.



राघूजा म्हणाला,

"अरे बेडूकराव, ही ताजी ताजी मिरची तू चाखून तर पाहा. हिचा कुरकुरीतपणा मला फार आवडतो. ही मिरची सुद्धा माझ्यासारखी हिरवी. माझ्या शेपटीसारखी लांबेलांब. थांब. मी तुला हिचा तुकडा करून देतो."

मिरचीच्या झमझमीत वासाने बेडूकरावांच्या तोंडाला पाणी सुटले. त्यांची जीभ वळवळू लागली. बटबटीत डोळे आणखीनच मोठे झाले. डराँव डूक, डराँव डूक असे बेडूकराव घशातल्या घशात ओरडू लागले. मोठाले आवंढे गिळू लागले. डोके पुढे करून, दोन हात टेकून, खाणे पळवण्यासाठी अगदी टपून बसले.

राघूजीने मिरची पायात नीट धरली आणि मिरचीचा टक करून एक तुकडा मोडला.



बेडूकरावांनी झपकन उडी मारून मिरचीचा तुकडा मटकावला.

उरलेली मिरची राघूजी कुरतडू लागला. मन लावून, आनंदाने खाऊ लागला. राघूजीला मिरची फार प्रिय. राघूजी डोळे बंद करून, मान वाकडी करून मिरची खाण्यात रंगून गेला.



मिरची तर भयंकर तिखट. बेडूकरावांची जीभ चांगलीच भाजली. मिरची त्यांच्या घशात अडकली. बेडूकराव जोरात ओरडले;

''डरांवट डरांवट
खूप खूप लागले तिखट.
डारांवांग डारांवांग
तोंडाची झाली आग.
डरांवले डरांवले
कित्ती कित्ती तोंड भाजले.
डरांवणी डरांवणी
पाणी पाणी, पाणी पाणी.''

खूपच तिखट लागल्याने त्यांच्या डोळ्यांतून पाणी येऊ लागले.

राघूजी घाबरला. त्याला समजेना, असे काय झाले? तो भीतीने पंख फडफडावू लागला. घाबरून थरथरू लागला. स्वत:भोवतीच गिरक्या घेऊ लागला. त्याला कळेना, आता काय करावे?

बेडूकराव धीट होता. तो टणाटण उड्या मारत तळेगावात गेला. पण घशात मिरची अडकल्याने त्याला पाणी पिता येईना. तोंडाची आग कमी होईना. त्याचे डोळे पाणावले.

आता काय करावे? बेडूकराव विचार करू लागला.

बेडूकरावच्या पाठोपाठ राघूजी, टिपूनाना, सशाभाऊ पण



तळेगावात पोहोचले. खारूताई फक्त झाडाखाली होती झोपली.

राघूजीने ताबडतोब बगळोजींना बोलावले. टिपूनानांनी त्यांना नीट समजावून सांगितले.

झाला प्रकार कळल्यावर बगळोजी चोचीतल्या चोचीत हसले, म्हणाले,

''एवढेच ना? काही काळजी करू नका. मला माहीत आहे युक्ती. आता पाहाच तुम्ही. एका मिनिटात आपले बेडूकराव हसायला लागतील. नाचायला लागतील. आनंदाने गायला लागतील.''

बगळोजी लांब टांगा टाकत बेडूकरावाजवळ गेले. बेडूकरावाच्या जवळ जाताच बगळोजीने नीट निरखून पाहिले. त्याने आपले पंख फुलवले आणि मान इकडे तिकडे केली. खूप खाली वाकून त्याने आपली चोच बेडूकरावाच्या अगदी जवळ नेली.

बेडूकराव क्षणभर घाबरला.

त्याला वाटले,

मघाशी आपण बगळोजीला ओरडलो, म्हणून तो रागावला, की काय?


आता रागावून, आपल्याला तो चोचीने चिमटा काढणार, की काय? आपल्याला चोचीत धरून तो गरगर फिरवणार, की काय?

पण घशात मिरची अडकल्याने बेडूकरावांना बोलताही येईना. त्यांची अवस्था फार वाईट झाली.

बगळोबा जेवढा खट्याळ होता, तेवढाच प्रेमळ होता. बगळोबा खाली वाकून, बेडूकरावांना प्रेमाने म्हणाला,

''अरे मित्रा, असा घाबरतोस का? नीट, सावकाश तोंड उघड, पाहू. घाबरू नकोस. मी माझ्या चोचीने, तुझ्या घशात अडकलेली मिरची, हळुवारपणे काढीन. तुला समजणार सुद्धा नाही. बेडूकराव, जर तुम्ही माझे ऐकाल, तर दोन मिनिटांत हसाल. नाही तर असेच रडत राहाल. ऐकणार ना माझे?''

आपण उगाचच बगळोबावर रागावलो, म्हणून बेडूकरावांना





वाईट वाटले.

त्यांनी आपले डोळे टिपले आणि सावकाश तोंड उघडले.

बगळोजीने अगदी अलगदपणे आपल्या चोचीने बेडूकरावाच्या घशातली मिरची काढली.

बेडूकरावांचे तोंड भाजल्याची माहिती एव्हाना सगळ्यांना समजली होती.

कोल्होजी जंगलात धावत धावत गेले. द्राक्षांचा घड घेऊन पळत पळत आले.

बगळोजीने द्राक्षांचा रस बेडूकरावांच्या तोंडात टाकला. बेडूकरावांचा त्रास लगेच पळून गेला.

बेडूकरावांना बरे वाटले. बेडूकराव हसू लागले.

त्यांना हसताना पाहून सगळेच आनंदाने नाचू, गाऊ लागले.

संध्याकाळी पुन्हा सगळे चिवडोंत वनगावात जमले. मुलांसाठी व्यायामशाळा काढण्याचे पुन्हा एकदा ठरले.

बगळोजी भीत भीत म्हणाला,

''आता मला नाही ना बदडणार?''

त्यावर सगळे पोट धरधरून हसले. हसत हसत आपापल्या घरी परतले.

❐

हॅरी पॉटरची 'मराठीतील' पुस्तके आमच्याकडे उपलब्ध

**हॅरी पॉटर आणि परीस** भाग १

**हॅरी पॉटर आणि रहस्यमय तळघर** भाग २







१६५रु. अनु. बाळ उर्ध्वरेषे

१७५रु. अनु. मंजूषा आमडेकर

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.** पोस्टेज एकत्रित ३०रु.

**'हनुमान'** हा ॲनिमेशन चित्रपट आता 'मराठी पुस्तकाच्या' स्वरूपात...




**हनुमान**

किंमत **३५ रु.**


पोस्टेज २० रु.


**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**



# हे पहा करून...

उडणारे फुलपाखरू आपण सर्वजणच पाहतो, मात्र भिंतीवर चढणारे फुलपाखरू, तेही तुम्ही तयार केलेले, हे पाहण्यात नक्कीच गंमत वाटेल ना...! तर मग व्हा तयार! आणि खाली दिलेल्या छायाचित्रांप्रमाणे भिंतीवर चढणारे फुलपाखरू काढा...






यासाठी लागेल एक जुन्या वहीचे कव्हर, चार फूट लांबीच्या दोन दोऱ्या, बॉलपेन रिफीलचे दोन छोटे तुकडे, एक लहान आकाराची काडी, आणि कात्री.

१. प्रथम जुन्या वहिचे कव्हर घेवून फुलपाखराच्या आकाराप्रमाणे कापून घ्या.
२. बॉलपेन रिफीलचे छोटे तुकडे, फुलपाखराच्या पंखावर चिटकून घ्या.
३. लहान आकाराची काडी, भिंतीवरील एखाद्या खिळयाला दोरीच्या सहाय्याने लटकून ठेवा.
४. त्या लटकलेल्या काडीच्या दोन्ही बाजूंना दोन दोऱ्या आरपार ओढा.
५. हळुहळू दोन्ही दोऱ्या एकानंतर एक ओढल्यास फुलपाखरू आपोआप वर जाईल.

❐



## संस्कारक्षम कथा

| | | |
|---|---|---|
| सूर्यास्त | वि. स. खांडेकर | ३० |
| यज्ञकुंड | वि. स. खांडेकर | ३० |
| मध्यरात्र | वि. स. खांडेकर | ४० |
| घरटे | वि. स. खांडेकर | ३० |
| अस्थी | वि. स. खांडेकर | ३० |

## अमर चित्र कथा

| | | |
|---|---|---|
| राजा हरिश्चन्द्र | संपादक : अनंत पै | २० |
| अभिमन्यू | संपादक : अनंत पै | २० |
| विक्रमादित्य | संपादक : अनंत पै | २० |
| छत्रपती शिवाजी | संपादक : अनंत पै | २० |
| भीष्म | संपादक : अनंत पै | २० |
| पृथ्वीराज चौहान | संपादक : अनंत पै | २० |
| सम्राट अशोक | संपादक : अनंत पै | २० |
| राणा प्रताप | संपादक : अनंत पै | २० |
| प्रल्हाद | संपादक : अनंत पै | २५ |
| श्रीरामाची कथा | संपादक : अनंत पै | २५ |
| कर्ण | संपादक : अनंत पै | २५ |
| चाणक्य | संपादक : अनंत पै | २५ |

पोस्टेज प्रत्येकी २०रु.

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.

# बाल/कुमारवाङ्मय

| | | |
|---|---|---|
| पंचतंत्रातील मनोरंजक गोष्टी | अनिल किणीकर | २५ |
| पंचतंत्रातील रोचक गोष्टी | अनिल किणीकर | २५ |
| पंचतंत्रातील प्रेरक गोष्टी | अनिल किणीकर | २५ |
| पंचतंत्रातील बोधपर गोष्टी | अनिल किणीकर | २५ |
| हितोपदेश : बोधप्रद कथा | मोहन वेल्हाळ | २० |
| हितोपदेश : मनोरंजक कथा | मोहन वेल्हाळ | २० |
| हितोपदेश : प्रेरक कथा | मोहन वेल्हाळ | २० |
| हितोपदेश : रोचक कथा | मोहन वेल्हाळ | २० |
| जातक कथा : मनोरंजक | निर्मला सारडा | २५ |
| जातक कथा : प्रेरक | निर्मला सारडा | २५ |
| जातक कथा : रोचक | निर्मला सारडा | २५ |
| जातक कथा : शिक्षाप्रद | निर्मला सारडा | २५ |
| लाजवाब बिरबल | निर्मला सारडा | २५ |
| विनोदवीर बिरबल | निर्मला सारडा | २५ |
| बिरबलाचे चातुर्य | निर्मला सारडा | २५ |
| बिरबलाच्या रोचक गोष्टी | निर्मला सारडा | २५ |
| शेखचिल्लीचे किस्से | निर्मला सारडा | २५ |
| तेनालीरामचे चातुर्य | मंजूषा आमडेकर | २५ |
| तेनालीरामच्या रोचक गोष्टी | मंजूषा आमडेकर | २५ |
| तेनालीराम विनोदवीर | मंजूषा आमडेकर | २५ |
| तेनालीरामच्या मनोरंजक कथा | मंजूषा आमडेकर | २५ |
| मन्नो | मंजूषा आमडेकर | २५ |
| मोठ्यांच्या छोट्या गोष्टी | माधव मोर्डेकर | ३० |




मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. पोस्टेज प्रत्येकी २०रु.